
डॉ.बं.न.जाजू
सुसंगती
सदा
घडो

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# सुसंगती सदा घडो

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# सुसंगती सदा घडो

डॉ.बं.न.जाजू

# सुसंगती सदा घडो

**लेखक : डॉ.बं.न.जाजू**

पत्ता : पत्ता: डॉ.बं.न.जाजू
ए2/402, शिवरंजन टावर्स
सोमेश्वरवाडी,पाषाण,पुणे 411008
सम्पर्क: व्हाट्सॅप क्र. 8668553115
ई मेल bnjajooin@yahoo.co.in

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

.his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २३ फेब्रुवारी २०२२ (माघ कृष्ण सप्तमी शके १९४३)

# शेगांव चे गजाननमहाराज प्रकटदिन

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. बं. न. जाजू



जन्म २७ सप्टेंबर १९४३.

डॉक्टर बंकटलाल जाजू यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील एका शेती आणि व्यावसायिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात. एका लहानशा खेड्यात झाला. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण ग्रामीण भा्गात झालं. पुढे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथून बी. ई. (मेक्यनिकल ) आणि नंतर आय. आय. टी, मुंबई येथून एम.टेक. आणि पीएच. डी.पदव्या प्राप्त केल्या. 1966 ते २००१ असे पस्तीस वर्ष, महाराष्ट्र सरकारच्या तांत्रिक शिक्षण विभागात, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती, पुणे, औरंगाबाद, जळगाव येथे प्राध्यापक,विभाग प्रमुख, प्राचार्य अशा अनेक पदांवर काम केलं. त्यानंतर, जी. एच. रायसोनी इंजीनीरिंग कॉलेज ,नागपूर येथे पाच वर्ष प्राचार्य आणि पुढे ह.व्या.प्र.मंडळ,अमरावती ह्यांच्या इंजीनीरिंग कॉलेज मध्ये, पाच वर्ष प्राचार्य म्हणून काम केलं. एक ख्यातीप्राप्त ,विद्यार्थिप्रिय आणि आदरणीय प्राध्यापक व प्राचार्य.

महाराष्ट्र सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच इंडियन अचिव्हर्स फाऊंडेशन इंडिया चा शिक्षा भारती पुरस्कार प्राप्त. सी.वी.रमन अवॉर्ड फॉर एक्सलन्स इन इंजीनीरिंग अँड टेक्नॉलजी तसेच इंनस्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स इंडिया चा बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड ही मिळाला. राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय स्तरावर ६५ टेक्निकल शोध प्रबंध प्रकाशित. युरोप,अमेरिका ,ऑस्ट्रेलिया व पोर्तुगल मध्ये, शोध प्रबंध वाचन केलं तसेच काही सेशन ही चेअर केले.

इन्स्टिट्यूशन ऑफ इंजींनियर्स इंडिया चे फेलो तसेच Combustion इंस्टीट्यूट ऑफ इंडिया आणि ISTE इंडिया चे आजीवन सदस्य.

अमरावती,नागपूर,बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मेंबर ऑफ सिनेट, डीन ऑफ फॅकल्टि, मेंबर ऑफ अॅकडमिक कौन्सिल, मेंबर ऑफ बी,यू,टी.आर., मेंबर ऑफ स्पेशल Examination कमिटी म्हणून काम केले॰ जीवनातील सर्व क्षेत्राशी जवळीक. साहित्य, नाट्य , संगित ह्यात विशेष रुचि. एक ख्याती प्राप्त वक्ता. आतापर्यंत जवळ जवळ १८० इन्व्हायटेड टेक्निकल Talks दिले.

-----------------------------------

अनेक आठवणी मागे ठेवून गेलेली माझी पत्नी प्रिय प्रेम

आणि

माझी मुलं नितिन –प्राची , पराग-रचना ,

व माझी नातवंड

अदिती,रचित,प्रणित

ह्यांना

# अनुक्रम

**मनोगत : गोळा बेरीज** **पान**


- भिका मास्तर १७
- नारायण हरवला १६
- मृत्यु:स्थळ काळ आणि कारण २१
- साधी माणसं २७
- असे ही किस्से ३१
- संस्कार आणि सवयी ३५
- द शो मस्ट गो ऑन ३८
- असं ही हऊ शकतं ४३
- आठ्वणी ४८
- ए.बी.:आबा ५२
- श्रध्दा ५६
- कालय तस्मै नम: ६०
- आयुष्यात पहिल्यांदा ६२
- पारीख मँडम ६७
- छंद ७४

- दोन मित्र—दोन पत्रं ७७
- अनामिक बंधांच्या नि:शब्द भावना ८२
- ती साठ मिनिटं ८५
- सुसंगती सदा घडो ८९


**Page numbers to change after final book**

# मनोगत: गोळा बेरीज

प्रत्येक माणसाला बालपणापासून तर म्हातारपणापर्यंत किंवा मृत्यू होईपर्यंत आयुष्याची वाटचाल करावी लागते. ही वाटचाल करताना त्याला वाटेत अनेक माणसं अनेक व्यक्ति भेटतात. त्याला अनेक प्रसंगातून जावं लागत, त्याच्या जीवनात अनेक घटना घडतात.आयुश्यात भेटणाऱ्या या अनेक माणसांपैकी बरेच जण त्याच्या जीवनावर प्रभाव पाडून जातात. कधी कधी तो प्रभाव चांगला असतो तर कधी कधी वाईट असतो तसेच अनेक प्रसंगांपैकी, घटनांपैकी बऱ्याच कायम आठवणीत राहतात तर काही कायम विसरून जातात.काही विसरून जाव्यात असं सारखं वाटतं पण विसरता येत नाहीत.

माझ्या 75 वर्षाच्या वाढदिवसानंतर एक दिवस असाच या 75 वर्षांच्या आयुष्याचा मागोवा घेताना मला माझ्या जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या अनेक व्यक्ती अनेक प्रसंग आठवले. चांगले की वाईट हा मनात विचार आला. त्यापैकी काही व्यक्ती काही प्रसंग लिहून चांगले प्रसंग मी निवडले. ज्यांच्याकडून मी काही शिकलो ज्या चांगल्या प्रसंगाने मला काही चांगली शिकवण दिली असेच मी निवडले कारण जे मलाच

विसरण्यासारखे वाटले त्यांची परत उजळणी कशाला करायची? साधारण पुस्तकांची पाच पानं किंवा वर्तमानपत्राचं हाप पेज लांबी होईल इतका प्रत्येक लेख लिहायचा हे मनात ठरवून सवड मिळेल तसं लिहायला लागलो. दोन-तीन महिन्यात माझे जवळ जवळ पस्तीस लेख लिहून झाले. माझं मलाच बरं आणि हलकं वाटायला लागलं. मग मनात विचार आला की आपण हे लेख प्रकाशित केले पाहिजेत , गेली पाच वर्षं मी पुण्याला राहतो, पण दर दोन अडीच महिन्यांनी अमरावतीला जातो. नातेवाईकांना आणि मित्रांना भेटतो. हे सर्व 35 लेख घेऊन एकदा अमरावतीला गेलो. तिथे गेलो कि मी एच. वि. पि. एम. म्हणजे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला आवर्जून जातो. त्यांच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य अनंत मराठे माझे मित्र आहेत. त्यांना नेहमी भेटतो.तास दोन तास चर्चा करतो. त्यांना लेखांची मी फाईल दिली , म्हटलं “सर हे वाचून पहा तुम्हाला बरे वाटले, आवडले तर दैनिक हिंदुस्थान ला द्या. ( डॉ॰ मराठे ही “दैनिक हिंदुस्तान” परीवारतले आहेत ) त्यांनी त्यांच्या सवडीने हे प्रकाशित करावेत अशी माझी इच्छा आहे.” प्राचार्य मराठे हे जाणकार आहेत. त्यांना साहित्याची आवड आणि अंग आहे, म्हणून अन त्यांना जे वाटतं ते परखडपणे सांगणारे आहेत म्हणून,मी त्यांना परत म्हणालो सर वाचा अन फील फ्री टू से नो.खरं म्हणजे त्यांना एवढं सगळं वाचायला वेळ नसतो. पण मला माहित आहे की त्यांचं नुसतं चाळणं ही एखाद्या सुजाण वाचका

सारखा असतं.पुण्याला परत गेल्यानंतर मी काही दिवसांनी त्यांना फोनवर विचारलं," सर वाचले का लेख? कसे वाटले?" ते म्हणाले ' सर छानच लिहिलेतं तुम्ही. मला आवडले.आणि मी तुमच्या लेखांची फाईल दैनिक हिंदुस्थान कडे पाठवली आहे. मग मी एक दिवस दैनिक हिंदुस्थान चे डॉ. विलासराव मराठे यांच्याशी फोनवर बोललो. म्हणालो “विलासराव तुम्हाला आवडले तर,” काही व्यक्ती काही प्रसंग “ या मथळ्याखाली हे लेख एक एक करून तुमच्या सवडीने प्रकाशित करा अशी माझी विनंती आहे”. मग त्यांनी ते हिंदुस्थानच्या रविवारच्या ' साहित्य मैफिल' या पुरवणी मध्ये ' स्वानुभव 'या मथळ्याखाली प्रकाशित करायला सुरुवात केली.. हे मी लिहितो आहे तोपर्यंत जवळजवळ सगळे लेख प्रकाशित झाले आहेत. त्याबद्दल मी मनापासून प्राचार्य डॉ. अनंत मराठे, डॉ. विलास मराठे, विवेक आणि मनिषा मराठे व सर्व हिंदुस्तान परिवाराचे आभार मानतो.. माझा प्रत्येक लेख प्रकाशित झाल्यावर, त्या किंवा दुसऱ्या दिवशी मला काही ओळखीचे, काही अनोळखी फोन यायला लागले',’ छान लिहिलंय तुम्ही.’ लेख आवडला.'असे, तर काही सविस्तर असे फोन मला आले. मला आनंद व्हायला लागला; आपण लिहिलेलं वाचल जातं आहे, कोणालातरी ते आवडतं आहे हे लिहिणाऱ्याला मिळणारं अतीव समाधान अन आनंद असतो.. मला आवर्जून नमूद करावंसं वाटतं की ह्या लेखांमध्ये लिहिलेले प्रसंग किंवा व्यक्ती काल्पनिक नाहीत. मी जसेच्या तसे ते लिहिले आहेत

अगदी 90 टक्के तर नावंही मूळचीच आहेत.. फार थोड्या ठिकाणी ती बदलली आहेत. व त्या त्या ठिकाणी तसा उल्लेखही मी केला आहे.. मला दोन-तीन वेळा विदर्भ महाविद्यालय अमरावतीच्या अर्थशास्त्र विभागाचे निवृत्त प्राध्यापक व विभाग प्रमुख श्री जाहागीरदार सर यांचे फोन आले.. ते माझ्यापेक्षा मोठे आहेत, दैनिक हिंदुस्थान मध्ये अर्थशास्त्रावर त्यांचे अभ्यासपूर्ण लेख नेहमी प्रकाशित होतात... सर एकदा मला म्हणाले " जाजू,, तुम्ही छानच लिहिता पण मला आश्चर्य ह्याचं वाटतं की चाळीस पन्नास वर्षांपूर्वी ची सर्व नावं तुम्हाला आठवतात. कौतुकास्पद आहे," मी म्हणालो सर परमेश्वराची कृपा आणि तुमचे आशीर्वाद आहेत." आता हे सर्व लेख एकत्र करून एखादे पुस्तक किंवा सर्व एकत्र करून एकाच ठिकाणी पीडीएफ मध्ये संग्रहित करून ते सर्वांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून द्यावेत असा एक विचार डोकावतो आहे. आयुष्याची गोळाबेरीज करताना सर्वात आधी हे लक्षात आलं की परमेश्वराची आपल्यावर अनंत कृपा आहे. त्यानं आपल्याला नाही दिलं, त्यापेक्षा त्यानं जे दिलं ते फार जास्त आहे. त्यामुळे " ना तुमसे गिला कोई मुझको, न कोई शिकायत दुनिया से " असं त्या ईश्वराला म्हणावसं वाटतं. शेवटी सुख हे समाधान मानण्यात असतं. आपण आयुष्यभर सुख मिळवण्याचा प्रयत्न करत असतो. हे आपण सोयीस्करपणे विसरतो कि सुख हे मिळवायचं नसतं.मानायच असतं. समाधान हे सुख मानण्याचं मोठे साधन आहे. बराच वेळा ईश्वरानं

आपल्यावर अन्याय केला आहे असं प्रत्येकाला वाटतं. पण मागे वळून पाहिलं तर परमेश्वर ज्या ज्या वेळी जे जे करतो ते आपल्या भल्यासाठीच असतं अशी प्रचिती बहुदा सर्वांना होते. आपण सर्वसामान्य माणसं आहोत. 'साधुसंत नाही. त्यामुळे आपल्याला सर्व आकार-विकार असणारच. मग त्या त्या वेळी आपल्याला बरं किंवा वाईट वाटणारच. प्रत्येकाच्या वाट्यावर हे येतच. ह्यालाच जीवन असे नाव.' जाता जाता एक सांगावसं वाटतं की सर्व लेख माझ्या जीवनात आलेल्या व्यक्ती विषयी अन् मी अनुभवलेल्या प्रसंगांशी निगडीत आहेत. मी एक सामान्य माणूस आहे..पण माझ्यासारख्या सामान्यांच्या जीवनातही अनुभवास आलेले हे प्रसंग किंवा भेटणारी ही माणसं किती शिकवून जातात हे सांगण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यात एक छोटीशी का असेना पणे फिलॉसॉफी आहे'.( उपदेश नाही ) काहीतरी सांगून जाण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. ईथे एका गोष्टीचा.मला आवर्जून उल्लेख करावसा वाटतो. मी हे लेख वेगवेगळ्या दिवशी लिहले आहेत अन ते वेगवेगळ्या दिवशी दैनिक हिंदुस्थानमध्ये प्रकाशित झाले आहेत. काही प्रसंगांचा अन बाबींचा उल्लेख एकापेक्षा जास्त लेखात आलेला आहे.वाचकांनी कृपया ती पुनरावृत्ती समजू नये. त्या त्या प्रसंगाचा, त्या बाबिचा, दुसर्या लेखातही संदर्भ असल्यानं परत लिहवं लागलं. मी एक खूप वाचलेला वाचक आहे.त्यामुळे मी लिहलेलं जर मला आवडलं तर ते इतरांनाही आवडावं हा विश्वास काही

अनाठायी नाही असं मला प्रामाणिकपणे वाटतं. ' जांनी हे लेख वाचले असतील त्यांना ते आवडले असतील. जे वाचतील त्यांना ते आवडतील हा मला विश्वास आहे. पुन्हा एकदा प्राचार्य अनंत मराठे, डॉक्टर विलास मराठे, मनीषा आणि सर्व दैनिक हिंदुस्थान परिवाराचा मी आभारी आहे, ह्या सर्व लेखांचं एक पुस्तक करून ते प्रकाशित करण्यासाठी इ साहित्यांनी जो पुढाकार घेतला आणि मला मदत केली त्यासाठी मी ई साहित्याच्या प्रशासकांचा आणि इ साहित्याच्या सर्व परिवाराचा अत्यंत आभारी आहे. हे लेख वाचून झाल्यानंतर, हे पुस्तक वाचून झाल्यानंतर ते जर तुम्हाला आवडलं तर कृपा करून आपला फीडबॅक मला कळवा. मी आपला ऋणी राहील..

डॉ. बंकट जाजू

# भिका मास्तर

2000 च्या ऑगस्ट महिन्यातली गोष्ट. त्यावेळी मी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबादचा प्राचार्य होतो. माझं मूळ गाव बुलढाणा जिल्ह्यातलं.अंढेरा, हे माझ्या गावाचं नाव. हे गाव औरंगाबादहून 125 किलो मीटर अंतरावर आहे. गाव फक्त पाच हजार लोक संख्येचं. माझं चौथी पर्यंत शिक्षण माझ्या याच गावात झालं. आमच्या घरी पूर्वीपासून महालक्ष्म्यांचा उत्सव आणि सण अगदी मोठ्या प्रमाणात साजरा करत. तीन दिवस घर भरलेलं असायचं. प्रसन्न असायचं. नोकरीला लागल्यानंतर सुरुवाती सुरुवातीला मी, माझी बायको नंतर मुलं झाली ती पण, आम्ही सर्व महालक्ष्मीचे वेळी आमच्या गावाला जायचो. पण पुढे पुढे कधी कधी हे जमत नसे'' ह्यावेळी नेमका मी औरंगाबादला होतो आणि अंतरही काही फारसं नव्हतं. महालक्ष्मी जशा आल्या तशी, बायको म्हणाली आता आपण इतके जवळ आहोत तर खरंच ह्या वेळी महालक्ष्मीना आपण आपल्या गावी जाऊ. मलाही ते पटलं. मी ताबडतोब होकार दिला. आम्ही लहान असताना संध्याकाळी जसा वेळ मिळेल तसे माझे वडील, काका, ,मोठे भाऊ आणि

आम्ही लहान मंडळी नियमानं गावातल्या देवदर्शनासाठी जायचो. आमच्या घरात तो परिपाठच होता. संध्याकाळी जेवायला बसताना आमचे काका आवर्जून सगळयांना विचारायचे ' देवळात गेला होता काय?' मग देवळात गेला नसेल त्याला जेवण मिळायचे नाही. त्याला अगोदर देवळात जाऊन यावं लागायचं. आमच्या गावात महादेवाचं एक मोठं मंदिर होतं. खरं म्हणजे मंदिर मोठं तर होतंच पण आमच्या महादेवाची पिंड फार मोठी होती.आणि आजूबाजूच्या सर्व खेड्यांमध्ये ती प्रसिद्ध होती. ह्या पिंडीसमोर एक मोठा ओटा होता. बाजूला दोन बुरुज, मोठ्या पायऱ्या असं ते देउळ होतं. आम्ही अंढेर्या गेलो की संध्याकाळी नकळत आमचे पाय देवळाकडे वळायचे. ह्याही वेळेला आम्ही पोहोचलो त्याच दिवशी संध्याकाळी मी महादेवाच्या देवळा कडे गेलो. अगोदर पायऱ्या चढून आत गेलो. महादेवांचे दर्शन घेतलं आणि येऊन परत पायरीवर बसलो. बाजूलाच 5-6 वृद्ध त्या पायऱ्यांवर बसले होते. माझं लक्ष गेलं तर त्या वृद्धांमध्ये आमचे भिका मास्तर होते. भिका मास्तरांचं खरं नाव भिकाजी सानप. ते आमच्या गावचे होते आणि अनेक वर्षे ते पहिल्या वर्गाला शिकवायचे. मलाही त्यांनी पहिल्या वर्गात शिकवलं. ते माझे पहिले गुरुजी. ते जसे दिसले तसे मी त्यांच्याजवळ गेलो. 70 वर्षांचे असावेत ते तेव्हा. त्यांना अगदी कमी दिसत होतं. मी जसा जवळ गेलो तसा त्यांच्या पायावर हात ठेवले आणि पाया पडलो. त्यान्नी माझे दोन्ही खांदे धरले; मला उभं केलं , आणी म्हणाले ' कोण रे तू?' मी म्हटलं

' गुरुजी, मी नथ्थू सावजीचा बंकट, ' माझ्या वडिलांचं नाव नथमल असं होतं आणि गावात त्यांना सगळे नथ्थू सावजीच म्हणायचे. मी म्हणालो गुरूजी मी बंकट. तुम्ही मला पहिल्या वर्गात शिकवलं. ते म्हणाले 'अरे मी नथू सावजीच्या सगळयाच मुलांना पहिल्या वर्गात शिकवलं.' त्यान्नी मला घट्ट धरलं आणि म्हणाले "कुठे असतोस बंकट तू आणि काय करतोस बाबा? " मी म्हणालो गुरुजी मी औरंगाबाद गव्हर्नमेंट इंजिनिअरींग कॉलेजचा प्राचार्य आहे.त्यांनी मला जवळ घेतलं. माझ्या तोंडावरून हात फिरवला आणी म्हणाले बंकट किती मोठा झालास रे. आणि तरी तू माझ्या पाया पडलास. बाबा, अजून माझ्या शिकवणी जिवंत आहेत रे. आनंद झाला गड्या. मी म्हणालो गुरुजी, तुमच्या सगळयाच शिकवणी आम्हाला अजून आठवतात. नेहमी मोठ्यांना नमस्कार करावा, चहा पिऊ नये, आई-वडिलांचं एखादं तरी म्हणणं आयुष्यभर आठवण म्हणून पाळावं. अशा अनेक गोष्टी तुम्ही आम्हाला शिकवायचे. त्या सगळया अजून आठवणित आहेत. गुरुजी मी शाळेत असेपर्यंत चहा पिलो नाही पण पुढे पुढे ते जमलं नाही. पण तुमची एक गोष्ट मात्र मी आयुष्यभर पाळली. माझ्या वडीलांचं एक म्हणणं मी आयुष्यभर पाळायचं ठरवलं. गुरुजी मी पान सुपारी कधीच खात नाही.आणि आज पर्यंत मी ते पाळत आलो. मी पानसुपारी का खात नाही याची एक छोटीशी गोष्ट तुम्हाला सांगतो' मी पाचवी ते सातवी मामाच्या गावी सुलतानपूरला शिकलो. सुलतानपूर आपल्या अंढेर्या पासून

40 किलोमीटर वरच आहे. सातव्या वर्गात असताना दिवाळीच्या सुट्टीत मी घरी आलो. आलो तसंच दिवाळी झाल्यानंतर आजारी पडलो. जवळजवळ पंधरा दिवस मी खूप आजारी होतो’ थोडा अशक्तपणा आला. त्यामुळे घरचे मला परत सुलतानपूरला जाऊ देण्यास तयार नव्हते. तिकडे माझी शाळा बुडत होती. मी सारखा वडिलांच्या मागे तगादा लावला की कसेही करून तुम्ही बैलगाडीनं का असेना,पण मला तुम्ही सुलतानपूरला सोडा. एक दिवस सकाळी आमचा गडी, माझे बाबा आणि मी लवकरच बैलगाडीने सुलतानपूरला निघालो. जाता-जाता रस्त्यात मध्येच आमच्या मोठ्या वहिनींचं माहेर होतं’ त्या ठिकाणी आपण थोडा वेळ थांबू चहापाणी घेऊन आणि मग पुढे निघू असे माझे बाबा म्हणाले. आम्ही आमचे वहिनींच्या माहेरी गेलो. गेल्याबरोबर वहिनींच्या वडिलांनी आमचं स्वागत केलं. चहा करायला सांगितला. चहा झाला. चहा झाल्यानंतर त्यांनी पानाचं तबक समोर आणून ठेवलं. त्या तबकात पान चुना काथाची डब्बी आणि मस्तपैकी कातरलेली सफेद सुपारी होती. ते तबक ठेवताच मी बचका भरून सुपारी हातात घेतली आणि ती खायला लागलो. आणि जसं मी खायला लागलो, माझ्या वडिलांनी ते पाहिलं आणि ते मला म्हणाले तू शाळेत शिकतो, ही सुपारी खाणं बरं नाही. आणि एवढी सुपारी घेतलीस तू. मी हिरमुसला होउन परत ती सुपारी तपकात टाकली. गुरुजी त्याच वेळी मनात ठरवलं की माझ्या गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे एवढी एक गोष्ट मी आयुष्यभर वडिलांची आज्ञा

म्हणून, उपदेश म्हणून पाळीन. आणि कधीच आता आयुष्यभर पानसुपारी खाणार नाही. तेव्हापासून गुरुजी मी पानसुपारी कायमची सोडली. पुढे कॉलेजमध्ये गेलो तेव्हा शिकतांना ,नोकरीला लागलो तेव्हा ही माझे अनेक मित्र मला चिडवत म्हणायचे, अरे पानसुपारी खात नाहीस, काय त्याच्यात एवढं? माझं जेव्हा लग्न झालं तेव्हा माझी मोठी बहिण म्हणाली तुला लग्नत तर पान खावाचं लागेल कारण तसा रिवाजच आहे. मी म्हटलं बाई, लग्न मोडलं तरी चालेल पण मी पानसुपारी खाणार नाही. माझं बोलून झालं तसे भिका मास्तरांचे डोळे भरून आले. ते काही बोलू शकले नाहीत. पाच मिनिटे फक्त माझ्याकडे पाहत राहिले. मी पुन्हा त्यांच्या पायावर डोकं ठेवलं आणि म्हणालो, गुरुजी आशीर्वाद द्या मी निघतो. भिका मास्तरांच्या जीवनाचे अनेक पैलू होते. ते अतिशय शिस्तबद्ध होते. अगदी रोज नियमाने शाळा सुटण्याआधी ते आम्हाला पाढे म्हणायला लावायचे. म्हणजे बे एक बे पासून वीस एक वीस पर्यंत सर्वांना उभं करून जोरात हे पाढे म्हणायला लावायचे. आणि आम्ही पाढे म्हणत असताना ते खुर्चीवर बसून नाही रहायचे. ते सारख्या विद्यार्थ्यांमध्ये चक्क्र मारायचे आणि कोण म्हणतोय कोण चुकारपणा करतोय याच्याकडे कटाक्षाने लक्ष द्यायचे. बऱ्याच वेळा आम्ही वर्गात मस्ती करायचो मग कोणाचा तरी पाय पडून कोणाची तरी पाटी फुटायची.त्यांचा नियम साधा होता अगदी. सोपी शिक्षा द्यायचे. ज्यानं पाटी फोडली त्याची चांगली पाटी ते,ज्याची पाटी फुटली त्याला द्यायचे

आणि ती फुटलेली पाटी फोडणाऱ्याला द्यायचे. झालं, वाद मिटला. त्यांनी आम्हाला किती वेळा सांगितलं की कोणतंही काम हलकं नसतं. आज आपण आपल्या मुलांना समजावून सांगतो, कोणतेही काम आपण केले पाहिजे कोणतेही काम हलकं नसतं.ही, डिग्निटी ऑफ वर्क अँड डिग्निटी ऑफ लेबर आम्हाला खरं म्हणजे पहिल्या वर्गातच भिका मास्तरनी शिकवली. आमची शाळा दर रविवारी आम्हाला सारवून काढायला लागायची. मग भिका मास्तरांनी चार चार मुलांची एक टीम ठरवली आणि आळीपाळीनं या टीमला ते शाळेचे अंगण सारवून काढायला लागायचं. त्याच्यासाठी आम्ही चारी मुलं आपापल्या घरून बादली, टोपली, सारवण्याचे कपडे आणि शेण असं रविवारी घेऊन यायचो. शाळेत आलो की च्या शेंणाचं कालवण करायचं आणि मग सर्व चौघं मिळून ती शाळा आम्ही सारवून काढायचो. आमच्या मुला मुलांमध्ये मास्तरांनी कधीच भेदभाव केला नाही. मग तो मुलगा गरिबचा असो, श्रीमंत असो, शेतकऱ्याचा असो की सरपंचाचा असो की फौजदाराचा. ते सर्वांना सारखं मानायचे, सर्वांना आळीपाळीने ही कामं करायला लागायची. कधीच त्यांनी हा भेदभाव केला नाही. साध्या साध्या वाटणाऱ्या गोष्टी त्यांनी आम्हाला शिकवल्या ज्या आमच्या पुढच्या जडणघडणीत आम्हाला खूप उपयोगी पडल्या. मी आणि माझ्या मित्रांनी भिका मास्तरान कडून कायमस्वरूपी अश्या अनेक गोष्टी शिकल्या आणि त्याचा खूप प्रभाव आमच्या जीवनावर

झाला. आपल्या शिक्षकाचा हा प्रभाव आयुष्यभर मिटत नसतो. विद्यार्थ्यांचा आपल्या शिक्षकांवर तेवढा विश्वास आहे' आजही ते आपल्या शिक्षकांनी जे सांगितलं ते अगदी मनावर घेतात. शिक्षकांच्या त्या पवित्र प्रतिमेला तडा गेलेलं कुठल्याच पिढीला परवडण्यासारखं नाही. म्हणूनच म्हणा ,अजूनही शिक्षकांवर विद्यार्थ्यांचा तेवढाच विश्वास आहे आणि त्यांच्या सांगण्याचा तेवढाच प्रभाव पडतो

मला आठवतं, मी औरंगाबाद हून सेवानिवृत्त झाल्यानंतर नागपूरच्या रायसोनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून रुजू झालो. एकदा उन्हाळयाच्या सुट्टीत माझी मुलगी तिच्या मुलीला घेऊन पंधरा-वीस दिवसासाठी आमच्याकडे नागपूरला आली. माझ्या नातिचं नाव अदिती. ती त्या वेळेला तिसऱ्या वर्गाची परीक्षा देऊन आली होती. येताना सोबत चौथीची काही पुस्तकं आणि काही वह्या घेऊन आली. थोडा तास दोन तास रोज पुढचा अभ्यास करावा म्हणून तिच्या आईने वह्या पुस्तकं आणली. हल्लीच्या तरुण जोडप्यांचं हे असं आहे. ते आपल्या लहान मुलांना सुट्टीचा आनंदही निर्भयपणे घेऊ देत नाहीत. त्यांना पुढच्या वर्षाचं वाचायला लावतिल, त्यांना कुठे डान्सिंग क्लास मध्ये जायला लावतील, कुठे स्विमिंग क्लासला जायला लावतील, संस्कार शिबिरात पाठवतील. त्यांना मनाप्रमाणे खेळू मात्र देत नाहीत. एक दिवस सकाळी आदिती गणिताचे पुस्तक घेऊन आपल्या वहीवर ची गणित सोडवत होती मी जवळ गेलो.

तिला म्हटलं क्या कर रहे हो बेटा? ती म्हणाली मॅथेमॅटिक्स के प्रॉब्लेम कर रही हू. मी म्हणालो मुझे दिखाओ. पाहीलं तर ती गुणाकार भागाकार करत होती पण काही वेगळ्याच पद्धतीने करत होती मी तिला म्हटलं ‘ ये तो बहुत सरल है. इतना करने की जरूरत नही है. देखो मै तुम्हे अभी एक सिम्पल मेथड बताता हूं.’ मी तिला नेहमी प्रमाणे सोपी गुणाकार भागाकाराची पद्धत सांगितली. तिनं माझं सगळं ऐकून घेतलं पण माझं बोलणं बंद झाल्यावर ती म्हणाली “ अरे नाना, आपको कुछ मालूम नही. हमारे टीचर ने हम करते है वैसाही बोला है. गरीब बिचारा आय.आय.टी. बॉम्बे मधून पीएच.डी. झालेला नाना. त्याला चौथ्या वर्गाचे गणित. त्यातलं कुछ मालूम नही. ही मुलांची शिक्षकांवर ची श्रद्धा. हा त्यांचा शिक्षकांवर चा विश्वास. 2004 मध्ये ही तो तसाच जिवंत होता जसा मी पहिल्या वर्गात असताना होता. 2019 मध्ये तो तसाच जिवंत आहे, फक्त त्यासाठी अंतकरणातून शिकवणारे, विद्यार्थ्यांचे जीवन घडवणारे भिका मास्तर सारखे शिक्षक मात्र झाले पाहिजेत. एका संपूर्ण पिढीला घडवण्याचं काम हे शिक्षकाच्या हाती असतं आणि हे सगळं कठीण काम करताना शिक्षकांना त्या विद्यार्थ्यांची मनही सांभाळावी लागतात. हळुवारपणे त्यांना घडवावं लागतं. मला पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या वऱ्हाडी माणसं या नाटकातलं एक वाक्य आठवतं.” हे सतीच वाण आहे. पदरात निखारे घेऊन चालावं लागतं, पण

कसं, का निखारे तर विजले नाही पाहिजे आणि पदर तर जळला नाही पाहिजे “

2018 च्या जुलैमध्ये मी दोन तीन महिन्यासाठी कॅलिफोर्नियाला गेलो. माझा मुलगा चार वर्षासाठी तिथे गेलेला होता. तिथे गेल्यानंतर माझ्या असं लक्षात आलं की अनेक विद्यार्थी जांना मी शिकवलं आहे ते कॅलिफोर्नियात आहेत’ त्याच्या पैकी बऱ्याच जणांचे फोन नंबर सुद्धा माझ्याजवळ होते. 1995 ला आमच्या अमरावतीच्या इंजीनियरिंग कॉलेजमधून बी,ई. मेकॅनिकल झालेला आणि विद्यापीठात सर्व प्रथम आलेला एक विद्यार्थी प्रसन्ना शानबाग तो ही लॉसएंजलिस ला होता. गेली वीस वर्ष तो अमेरिकेत आहे. बी.ई. पास झाल्यानंतर त्याने आय.आय.टी. मुंबईमधून एम. टेक. केलं आणि नंतर तीन-चार वर्षे पुण्यात नोकरी करून तो अमेरिकेला गेला आणि तिथेच स्थायिक झाला. गेली विस पंचविस वर्ष तो माझ्या संपर्कात आहे. मी मुलाकडे कॅलिफोर्नियाला आलो आहे हे त्याला माहित होतं. त्यानं एक दिवस मला फोन केला आणि म्हणाला सर तुम्ही माझ्या घरी लॉसएंजलिस ला चार-पाच दिवसांसाठी राहायला या. तुम्ही जिथे राहता तिथून माझं घर कारनं फक्त सहा तासाच्या अंतरावर आहे. तरीही मी तुमचं येण्या-जाण्याचं विमानाचं तिकीट बुक करतो. पण सर तुम्ही एक दोन दिवसासाठी माझ्याकडे आलेलं मला चालणार नाही. तुम्ही कमीत कमी चार दिवस तरी माझ्या घरी थांबलं पाहिजे. मला तुमच्याशी खूप

बोलायचंय, खूप गप्पा मारायच्या आहेत. बरंच काही सांगायचं आहे. तुम्हाला सगळं लॉसएंजलिस दाखवायचंय. मी त्याला म्हणालो प्रसन्न तू माझं तिकीट काढू नकोस माझा मुलगा मला एखाद्या शुक्रवारी कारनं तुझ्याकडे सोडून देईल आणि रविवारी संध्याकाळी तो मला परत न्यायला येईल. प्रसन्ना म्हणाला सर ठीक आहे..तुम्ही शुक्रवारी त्याच्याबरोबर या पण जायचं केव्हा ते मी ठरवीन आणि त्याप्रमाणे मी तुमचं परतीचं विमानाचं तिकीट काढून ठेविन. मग मी त्याला कळवलं ठीक आहे. ठरल्याप्रमाणे त्याच्या पुढच्या शुक्रवारी माझ्या मुलांनी रात्री नऊला मला प्रसन्ना कडे सोडलं. माझा मुलगा ही रात्रभर तिथे थांबला. नंतर चार दिवस मी प्रसन्ना च्या घरी राहिलो. त्यांनी मला अख्खं लॉस एंजलिस दाखवलं.रोज सकाळी नऊ वाजता आम्ही बाहेर पडायचो आणि रात्री डिनरला घरी परतायचो. कधीकधी त्याची बायको आणि मुलंही आमच्याबरोबर यायची. त्यांनी पाचव्या दिवशी सकाळचं माझं परतिचं तिकीट काढून ठेवलं होतं. रोज घरी आलो की जेवल्यानंतर रात्री अकरा बारा वाजेपर्यंत आमच्या वेगवेगळ्या आठवणींवर, विषयांवर गप्पा व्हायच्या. मी गेलो त्याच्या चार दिवस अगोदरच शिक्षक दिन झाला होता. मग प्रसन्नाने आणि त्याच्या बायकोने शिक्षक दिनानिमित्त घरीच एक छोटासा कार्यक्रम करून माझा स्त्कार केला. मला शाल श्रीफळ, बरीशी पुस्तक भेट म्हणून दिली अन सत्कार केला. एवढंच नाही तर एका सुंदर फ्रेम मध्ये फ्रेम करून त्यांनी दोघांनी लिहिलेल्या

वेगवेगळ्या कविता ज्या त्यांनी माझ्यावर लिहिल्या होत्या, त्या मला भेट दिल्या. त्याचा तो आदर, माझ्याबद्दलचं प्रेम हे सगळं पाहून माझे डोळे भरून आले. परत एकदा मला त्यादिवशी भिका मास्तरांची आठवण आली. वाटलं त्यादिवशी माझ्या गावात महादेवाच्या देवळात मी भिका मास्तरांच्या पाया पडल्यावर त्यांचे डोळे असेच भरून आले असावेत. असंच त्यांना गलबलून आलं होतं. मी शेवटी पाया पडून त्यांचा निरोप घेतला तेव्हा अक्षरशः त्यांच्या डोळयातून पाणी टपकलं. वाटलं, आज जसं मला वाटतं,कदाचित,असंच त्यादिवशी माझ्या गुरुजींना, भिका मास्तरांना वाटल असेल.

# नारायण हरवला

आमच्या अभियांत्रिकीच्या अभ्यासक्रमात अंत्य वर्षासाठी एक लॉंग टूरचा समावेश केलेला असतो. साधारण हा टूर दहा-बारा दिवसाचा असतो. प्रत्येक शाखेचा हा दूर जातो. तो तसा अनिवार्य नसतो. ज्या विद्यार्थ्यांना जायचं असेल व ज्यांना टूरचा खर्च झेपणार असेल असे विद्यार्थी या टूरला जातात. मुख्यतः वेगवेगळ्या मोठ्या कारखान्यांना भेट देऊन प्रत्यक्षात तिथे कुठल्या मशीन्स आहेत त्या कसं काम करतात कसं प्रॉड्क्शन होतं हे मुलांना प्रत्यक्ष पाहता यावं म्हणून हा टूर असतो. तो कधी उत्तर भारतात तर कधी दक्षिण भारतात तर कधी कलकत्ता भागाकडे कधी गुजरात भागाकडे अशा प्रकारे आयोजित करण्यात येतो.बहुदा सर्व विद्यार्थी या टूरला जातातच कारण एकतर इंडस्ट्रीज पाहता येतात तसेच त्या बरोबर काही काही पर्यटन स्थळं, प्रेक्षणीय स्थळं ही पाहायला मिळतात.तिस किंवा त्याच्यावर जर विद्यार्थी असले तर त्यांच्या बरोबर दोन प्राध्यापक व एक मदतनीस किंवा चपराशी किंवा ज्याला आपण हेल्पर म्हणतो असे ह्या टूर साठी मुलांच्या बरोबर जातात. ह्या टूर साठी दोन-तिन महिने अगोदर पासून तयारी करावी लागते. कारखान्यांना परवानगी व त्यांच्या तारखा साठी पत्रं लिहिली जातात. उत्तर आल्यानंतर आपल्याला कुठे जायचं हे ठरवून ,

प्रेक्षणीय स्थळ कोणती घ्यायची हे ठरवून रेल्वेचे रिझर्वेशन, लॉजिंग बोर्डिंग ची व्यवस्था हे सर्व ॲडव्हान्स बुकिंग करणं अशी बरीचशी कामं दोन-तीन महिने चालू असतात. त्यासाठी विद्यार्थ्यांमधून एक टूर सेक्रेटरी निवडला जातो व त्याचे दोन तीन मदतनीस त्याच्याबरोबर काम करतात. टूरवर जाणारे प्राध्यापकही आधी ठरवण्यात येतात व ते ह्या सेक्रेटरी व इतरांना मार्गदर्शन करतात. असा मोठा प्रपंच असतो

मला नीट वर्ष आठवत नाही पण बहुदा 1972 किंवा 1973 हे ते वर्ष असावं. त्या वर्षीच्या आमच्या यंत्र अभियांत्रिकी विभागाचा टूरचा प्रभारी प्राध्यापक म्हणून माझी आणि माझ्याबरोबर प्राध्यापक तासगावकर यांची नेमणूक करण्यात आली. आमच्याबरोबर आमच्याच विभागाचा नारायण (हे नाव मी बदललेलं आहे) हा आमचा चपराशी आमच्या बरोबर येईल म्हणून त्यालाही तसे आदेश देण्यात आले. हा चपराशी वेळोवेळी विद्यार्थ्यांना सामान उचलण्यासाठी, खोली साफसूफ करण्यासाठी मदत करत असतो. नारायण ची खूप इच्छा होती की एकदा टूरवर जायचं. तो तसा आज्ञाधारक आणि दिलेलं काम करणारा, निर्व्यसनी, निरोगी असा होता. त्याला बरोबर घ्यायचं मी ठरवलं. तो थोडा वेंधळा होता इतकंच.केव्हा काय चूक करेल याचा काही भरवसा नसायचा. टूर जाण्याच्या दोन चार दिवस आगोदर आमच्या प्राचार्यांनी व विभागप्रमुखांनी विद्यार्थ्यांना उद्देशून एक मार्गदर्शन प्रर भाषण केलं. टूर मध्ये प्रवासात कारखान्यांना भेट देत असताना

कसं वागायचं, वेळेचे बंधन कसं पाळायचं एकटं कसे फिरू नये, संस्थेच्या नावाला बट्टा लागेल असे कोणतेही वर्तन करू नये इत्यादी गोष्टी विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या. आमच्या विभागप्रमुखांनी नारायणलाही तशी ताकीद दिली आणि सूचनाही दिल्या. नेहमी सर्व सरां बरोबर राहायचं, दिलेलं काम बरोबर करायचं, विद्यार्थ्यांना सामान चढवायला उतरवायला गरज पडली तर मदत करायची अशा अनेक गोष्टी त्याला सांगितल्या.

ठरल्या दिवशी आमच्या टूर निघाला. सगळे उत्साहात होते. आमचा पहिलाच मुक्काम एक दिवसासाठी आग्र्याला झाला. तिथे इंडस्ट्रियल व्हिजिट नव्हती फक्त ताजमहाल, फत्तेपूर शिक्री पाहण्यासाठी आम्ही थांबलो. पुढे दुसऱ्या दिवशी दिल्लीला पोहोचलो. तिथे आम्ही पूर्ण दोन दिवस राहणार होतो. तिथे दोन्ही दिवस काही इंडस्ट्रियल व्हिजिट व काही साईट सिईंग असा प्रोग्राम होता. आम्ही अगोदरपासूनच पहाडगंज मधल्या एका गेस्ट हाउस मध्ये राहण्याचं बुकिंग करून ठेवलं होतं. गेलो तसेच सर्व फ्रेश झालो. त्या दिवशी दिवसभर ओखला ला इंडस्ट्रियल इस्टेट मध्ये दोन विजिट होत्या. त्या संपल्यानंतर आम्ही संध्याकाळी सात वाजता लाल किल्ल्यावर साऊंड आणि लाईट चा जो शो होतो आणि लाल किल्ल्याचा इतिहास सांगितला जातो त्या मनोरंजक कार्यक्रमाला पाहण्यासाठी जाणार होतो. आमच्या विजिट संपून साधारणता पावणे सहाच्या दरम्यान आम्ही आमच्या त्याच बसनं लाल किल्ल्या समोर आलो. शो सुरू व्हायला

तासाभराचा अवधी होता. दोन चार विद्यार्थ्यांनी जाऊन आमच्या सर्वांची शोची तिकीट काढून आणली. आम्ही सर्व विद्यार्थ्यांना सांगितलं कि अजून साधारणता तासभर वेळ आहे म्हणून समोरच्या चांदनी चौकात जाऊन एक तासभर तुम्ही बाजारात भटकून या. किल्ल्याच्या एन्ट्री वर आपण सगळ्यांनी सातला दहा मिनिटं कमी असताना एकत्र व्हायचं. कोणी मागे राहिलाच तर आपापली तिकीटं प्रत्येकाला दिली आहेत त्यांनी शो च्या ठिकाणी ग्रुपला जॉईन व्हायचं. आम्ही अमरावतीहून निघतानाच सहा सहा विद्यार्थ्यांचा एक ग्रुप केला होता व त्यात एक जण ग्रुप लीडर निवडला होता. त्या सहा जणांना एकत्र ठेवण्याची जबाबदारी त्या ग्रुप लीडरवर होती. सहा ग्रुप पैकी एका ग्रुप मध्ये पाच विद्यार्थी होते म्हणून नारायण ला मी त्या ग्रुपमध्ये टाकलं त्या ग्रुप लीडर ला सांगितलं की हा थोडा वेंधळा आहे त्याच्याकडे लक्ष ठेवायचं. त्याला एकटा सोडायचं नाही. तसंच नारायण ला सांगितलं की नेहमी मुलांबरोबर राहायचं. संध्याकाळी चांदणी चौकात इकडे तिकडे सर्वजण फिरायला गेले व सर्व ग्रुप साधारण पावणे सात वाजता लाल किल्ल्यावर जमा झाले आणि ते जसे येत गेले तसे आज जाऊन शो ला बसले.' नारायण आला असावा आणि तो शो साठी अगोदरच हात गेला असावा असं त्याच्या ग्रुपच्या मुलांना वाटलं कारण ते जेव्हा जमा झाले तेव्हा त्यांच्याबरोबर पाच जण जमा झाले. तेव्हा त्यांच्याबरोबर नारायण नव्हता. आम्ही सर्व शो ला गेलो. एका तासात शो संपला. सर्वजण गेटवर

बाहेर आले पण आम्हा सर्वांमध्ये नारायण नव्हता.त्याच्या ग्रुपला विचारलं ते म्हणाले सर आम्ही आलो तेव्हा तो आमच्या बरोबर नव्हता. आम्हाला वाटलं तो आत गेला असावा कारण त्याच्याजवळ त्याचं तिकीट होतं. शो सुरू होईल म्हणून आम्हीसुद्धा घाईनं आत आलो. अंधार असल्यामुळे आम्हाला काही दिसलं नाही. आणि आता शो संपल्यानंतर आम्ही सर्वांबरोबर बाहेर आलो. सॉरी सर. पण आता नुसतं सॉरी म्हणून काम होणार नव्हतं. आम्ही सर्व फार गंभीर झालो. ताबडतोब काही विद्यार्थी परत आत गेले आणि नारायणाची शोधाशोध करून परत आले. नारायणा आत नव्हता. मग आपण काय करायचं याचा आम्ही सर्वजण गांभिर्यानं विचार करायला लागलो.  काहीजण म्हणाले कदाचित तो आपल्या गेस्टहाऊसला गेला असेल. त्याच्या खिशात गेस्टहाऊसचा पत्ता आम्ही टाकला होता.

काही म्हणाले इथेच आजुबाजूला चांदणी चौकात शोध घेता येईल. त्यावेळी मोबाईल फोन वगैरे काही नव्हतं. आम्ही वेगवेगळे ग्रुप केले. एका ग्रुपला सर्वात आगोदर पहाडगंज मधल्या आमच्या विकास गेस्ट हाउस मध्ये पाठवलं. त्यांना सांगितलं की आपण जेथे राहायला होतो त्या ठिकाणी नारायण आहे की नाही ते जाऊन पहा आणि जर असला तर त्याला आपल्या हॉलमध्ये बसून दोन-तीन जण त्याच्या जवळ थांबा आणि दोन जण परत इथं लाल किल्ल्याच्या गेटवर येऊन आम्हाला माहिती द्या. आम्ही या गेटवरच थांबू. बाकीच्या ग्रुपला ही आम्ही वेगवेगळ्या ठिकाणी

पाठवलं. काहीजण चांदणी चौकात वेगवेगळ्या दिशेने गेले काहीजण पोलीस स्टेशनच्या आजूबाजूला गेले, काहीजण लाल किल्ल्या समोरच्या फुटपाथवर शोधाशोध करायला म्हणून गेले. त्या सर्वांना आम्ही सांगितलं की काही कळलं तर ताबडतोब गेटवर येऊन प्राध्यापक तासगावकर आणि मी आम्हाला येऊन माहिती द्यायची. आम्ही अत्यंत काळजीत पडलो. पुढे काय करावं सुचेना. साधारण साडे दहा पर्यंत सर्व मुलं गेस्ट हाउस वरून परत आली चांदणी चौकात गेली ती परत आली नारायण चा कुठेही पत्ता लागला नाही. मग आम्ही चांदणी चौक पोलीस स्टेशन मध्ये जाऊन नारायण हरवल्याची रीतसर तक्रार नोंदवली. त्याचं वर्णन, घातलेल्या कपड्यांचा तपशील, आमचा पत्ता सगळं सांगितलं. साधारण रात्री अकरा वाजता आम्ही सर्व गेस्ट हाऊसला परत आलो. रात्री 12 पर्यंत आम्ही चर्चा केली आणि चर्चेत असं ठरलं की सकाळी लवकर उठून कामाला लागायचं. दुसऱ्या दिवशी व तिसऱ्या दिवशी दुपारपर्यंत आमचा दिल्लीतच मुक्काम होता. आमच्या आखलेल्या कार्यक्रमाप्रमाणे असं ठरलं की दुसऱ्या दिवशी मी रेल्वे स्टेशन वर जाऊन तिथे अमरावतीला एसटीडी कॉल लावून बसायचं आणि आमच्या प्राचार्यांशी संपर्क साधायचा. त्यांना सगळं सांगून आम्ही टूर रद्द करून परत यावं कि ठरल्याप्रमाणे टूर, पुढे चालू ठेवावा हे विचारून प्राचार्य सांगतील तसं करायचं असं ठरलं. प्राध्यापक. तासगावकर यांनी त्यावेळचे खासदार के. जी. देशमुख किंवा जांबुवंतराव धोटे यांच्या

कडे जाऊन ते जर दिल्लीत असतील तर ह्या शोधात त्यांची काही मदत होते का ते पाहावं. मुलांच्या एका ग्रुप नं परत चांदणी चौक, लाल किल्ल्या कडे शोधाशोध करून पोलीस स्टेशन मध्ये काही माहिती मिळाली का ते विचारवं. एका ग्रुप नं तिथल्या जवळच्या 2-4 मोठ्या हॉस्पिटल मध्ये जाऊन आपादग्रस्त विभागात चौकशी करायची. काहींनी नवी दिल्ली रेल्वे स्टेशन वर तर काहीनी जुनी दिल्ली रेल्वे स्टेशन वर जाऊन शोधाशोध करायची. मग ठरल्याप्रमाणे आमची सर्वांची कामगीरी सुरू झाली.' त्यावेळ्स आतासारखे मोबाईल फोन वगैरे नव्हते त्यामुळे आपसात संपर्क आम्ही साधू शकत नव्हतो. शेवटी दुपारी चारच्या दरम्यान सर्वजण आपापली कामगिरी बजावून गेस्टहाऊसवर परत आले. आम्ही सर्व हताश अन गंभीर झालो कारण कोणालाच यश आलं नाही. आम्ही सारखी देवाची प्रार्थना करत होतो कि देवा नारायणला सुरक्षित ठेवा. काही विद्यार्थ्यांनी तर अमरावतीच्या अंबादेवी ला उपास, प्रसाद कबूल केले. मग सर्वांनी आपला वृत्तांत सांगितला. सर्वात आधी प्राध्यापक तासगावकर यांनी सांगितलं की खासदार देशमुख यांची भेट झाली. त्यांनी चांदणी चौक पोलीस स्टेशनला मी बोलतो असं सांगितलं व दिल्ली आकाशवाणीला बोलावून संध्याकाळी सहा वाजता नारायण हरवल्याची त्याच्या वर्णनास सहज व आमच्या गेस्ट हाऊस च्या पत्त्यासह कोणाला नारायण आढळल्यास त्यांचे प्राध्यापक जाजू किंवा तासगावकर यांच्याशी संपर्क साधावा अशी आकाशवाणी वर

उद्घोशणा करण्यची व्यवस्था केली. इकडे मी आमच्या प्राचार्याला कॉल लावून बसलो होतो तो साधारण महत्प्रयासानं दुपारी एक वाजता लागला. त्यांना सर्व सांगितलं व पुढे काय करायचं ते विचारलं. ते म्हणाले तुम्ही तक्रार पोलीस मध्ये दिलीच आहे. तिथे धनपत राय आणि सन्स या पब्लिशर कडे आपल्याच कॉलेजचे प्राध्यापक दोमकुंडवार त्यांच्या पुस्तकाची प्रुफं तपासण्यासाठी गेले आहेत ते आणखी वीस दिवस दिल्लीला राहणार आहेत. तुम्ही धनपत राय यांचा फोन शोधून त्यांच्याशी संपर्क साधा व दोमकुंडवारान्ना सांगा की दर दोन दिवसांनी चांदणी चौक पोलीस स्टेशनला जाऊन मिसिंग परसंस स्कॉड ला भेटून काही माहिती मिळेल ती त्यांनी अमरावतीला प्राचार्यांना कळवावी. प्राचार्यांनी आम्हालाही दिलासा दिला व आम्ही तरी आता काय करणार म्हणून टूर पुढे ठरल्याप्रमाणे चालू ठेवण्या बद्दल सांगितले.

आम्ही मग ताबडतोब आमच्या गेस्ट हाऊस मधून धनपत राय अँड सन्स ह्या प्रकाशकाचा फोन शोधून त्यांना फोन केला. सुदैवानं प्राध्यापक दोमकुंडवार फोनवर आले. आम्ही त्यांना सर्व हकीगत सांगितली. ते आमच्याच विभागाचे होते. मग आम्ही त्यांना प्राचार्यांचा निरोप सांगितला. ते म्हणाले मी रात्री विकास गेस्ट हाउस ला तुम्हाला भेटायला येतो. आम्ही सर्व थकून गेलो होतो. शारीरिक थकवा, मानसिक नैराश्य ही आलं होतं. ऑटोरिक्षा वगैरेत आमच्या सर्वांचा बराच खर्च झाला होता. तो सर्व खर्च

आम्ही कॉमन एक्सपेंडिचर मध्ये टाकू असं मुलं म्हणाली पण आम्ही त्यांना म्हणालो की तो सर्व खर्च आम्ही कॉलेज तर्फे तुम्हाला परत देऊ. रात्री दहाच्या दरम्यान प्राध्यापक दोमकुंडवार आले. त्यांनी आम्हा सर्वांना खूप धीर दिला. ते म्हणाले "तुमचं काही चुकलं नाही. तो स्वतःच्या जबाबदारीवर आला होता व त्याने स्वतःची काळजी घ्यायला पाहिजे होती. तुम्ही काय प्रत्येक वेळा त्याचं बोट धरून चालणार काय? काही काळजी करू नका. मी इथे चौकशी चालू ठेवीन व रोज प्राचार्यांना कळवत जाईन. आमच्या प्रकाशकाचा एक भाऊ पोलीस मध्ये इन्स्पेक्टर आहे त्याचीही मदत घेईन. "

प्राध्यापक दोमकुंडवारांनी आम्हाला खूप धीर दिला व ते रात्रभर आमच्याबरोबर आमच्याकडे थांबले. आम्ही नंतरच्या दिवशी दुपारी दिल्ली सोडलं. पुढे आम्हाला चंदीगड पिंजोर शिमला नंतर लखनऊ हरिद्वार रूडकी मसुरी इत्यासी असं बऱ्याच ठिकाणी जायचं होतं. टूर परत सुरु झाला. एक दोन दिवसाच्या उदासी नंतर थोडं नॉर्मल होऊ लागलं पण नारायण हरवल्याचं डोक्यातून जाईना. मी दिल्ली वरूनच माझ्या मिसेसला पत्र लिहून सर्व घटना अमरावती ला कळवली होती. मी रुक्मिणी नगरात राहायचो व आमच्याच भागात आमच्या विभागात काम करणारा एक अटेंडंट इंगळे हा आमच्या घरी त्याच्या म्हशीचं दूध आणून द्यायचा. आम्ही विश्वास म्हणून त्याच्याकडे उकडा लावला होता. तो रोज आमच्या घरी

जायचा. सगळ्या कॉलेजमध्येही ही बातमी कळली होती. इंगळेनंही ती घरी येऊन सांगितली. टूर संपवून मी ज्या दिवशी स्टेशन वरून अमरावतीला घरी आलो,तेव्हा रीक्षेचा आवाज ऐकताच माझी मिसेस सामान घ्यायला बाहेरच्या फटका पर्यंत आली. आल्या आल्याच अगदी आनंदात मला सांगितलं ‘तुम्हारा नारायण तो अमरावती आ गया’ मी जोरात ओरडलो. क्या?? ती म्हणाली ‘सच्ची.चार-पाच दिन पहले ही इंगळे ने बताया’. माझा आनंद गगनात मावेना. मी तिला म्हटलं,’ मै जल्दी नहाके आता हूं. तब तक तू मेरी थाली लगा. मैं खाना खा कर तुरंत कॉलेज मे जाऊंगा.’

लवकर लवकर आंघोळ उरकून मी माझं जेवण आटोपलं आणि ताबडतोब माझी सायकल बाहेर काढून कॉलेजला निघालो. कॉलेजला पोचल्याबरोबर मी आमच्या विभागात गेलो आणि ताबडतोब एका दुसऱ्या चपरशाला सांगितलं नारायण जिथे असेल तिथून शोधून त्याला मला भेटायला सांग. तो पाच मिनिटात आला. मी ओरडलोच “अरे काय झालं? त्या दिवशी कुठे गेला होतास तू? तुझ्या ग्रुपच्या मुलांना का सोडलं? अमरावतीला परत कधी आला? मूर्ख.आम्ही किती काळजीत दिवस काढले” मग त्यानं सांगितलं ते असं. तो म्हणाला “ मी तिथे मुलांबरोबर चांदणी चौकात फिरत होतो. एका कट पीस वाल्याकडे मी पँटचं कटपीस पाहत उभा राहिलो. भाव पटला नाही.मग मी आजूबाजूला पाहिलं तर मुलं निघून गेली होती. मला आपलं कोणीच माणूस दिसेना. मग मी खूप घाबरून

गेलो.आणि काही विचार न करता सरळ तिथल्या काही लोकांना विचारून मी जुन्या दिल्लीच्या रेल्वे स्टेशनवर गेलो. तिथे एका पोलिसाला नागपूरला गाडी किती वाजता जाईल हे विचारलं. त्यांनी सांगितलं रात्री दहाला नागपूरची गाडी आहे. मग मी दीड-दोन तास तिकीट काढून प्लॅटफॉर्मवर बसून राहिलो. दहा वाजेच्या गाडीनी मी सरळ नागपूरला निघालो. दुसऱ्या दिवशी नागपूरला पोहोचल्यानंतर मी माझ्या एका नातेवाईकाकडे गेलो. तिथे दोन-तीन दिवस राहिलो आणि मग अमरावतीला आलो."

मी म्हटलं "शाबास. अरे सरळ नागपूरहून अमरावतीला आला असता तर सर्वांना ताबडतोब कळलं असतं की तू परत आलास म्हणून. कदाचित तिसऱ्या दिवशी आम्हालाही दिल्लीला निरोप मिळाला असता. तू तर फारच ग्रेट निघालास. आमची हवाच काढून घेतली तू." नारायण हरवल्या दिवसापासून नंतर चौथ्या दिवशी अमरावतीला आला पण आम्हाला काहीच न कळल्यामुळे आम्ही आणि विद्यार्थी सगळयांनी खूप काळजीत आमचा टूर पूर्ण केला. त्यावेळी कम्युनिकेशन काहीच होऊ शकत नव्हतं. आम्ही त्याला अमरावतीला पाहिल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना ते कळवलं व सर्व विद्यार्थी कॉलेजमध्ये आले. ज्यांनी ज्यांनी देवीला नवस केले होते प्रसाद कबूल केला होता त्यांनी त्यांनी तो वाटला. आम्हा सर्वांना खूप आनंद झाला. पण आजही या प्रसंगाची आठवण आली की अंगावर काटा उभा राहतो..

# मृत्यु: स्थळ काळ आणि कारण

शिरीष कणेकरांची आठ दहा पुस्तक मी वाचली असतिल. त्यांची शैली मला आवडते. त्यांच्या लिखाणात हलकं फुलकं विनोदी व्यंग तर असतंच पण बऱ्याच ठिकाणी हृदयाला भिडणाऱ्या, आपल्याला अंतर्मुख करणाऱ्या जीवनाचं एक वेगळं दर्शन घडवणाऱ्या साहित्याची त्याला जोड असते. मला पुस्तकाचं अन त्या लेखाचं नाव आठवत नाही पण त्यांनी त्यांच्या एका लेखात मृत्यूच्या स्थळा काळाबद्दल दोन सुरेख गोष्टी लिहिल्या आहेत. एका गोष्टीत त्यांनी लिहिलं आहे -- एक चिमणीचं पिल्लू एका झाडाच्या फांदी वर भीतीने थरथर कापत बसलेलं असतं, वरून उडत जाणारा गरुड ते पाहतो अन त्या पिल्लाजवळ जाऊन त्याला विचारतो' ' अरे असा भीतीने थरथर का कापतो आहेस? काय झालं तुला? ' ते पिल्लू म्हणतं, "ते पाहा तिकडे त्या समोरच्या मोठ्या झाडावर यम बसला आहे. अन तो सारखी मला भीती दाखवतोय की तो मला घेऊन जाणार आहे. मी मरणार आहे." ते ऐकून गरुड म्हणाला "असं काय> मी बघतो, यम तुला कसा नेतो ते, मी तुला माझ्या चोचेत उचलून दूर हिमालयात नेऊन सोडतो. पाहू कसा येतो यम तिथे." असं म्हणून गरुड खरंच त्या पिल्लाला हळूवार,

चोचीत धरून उडतो आणि दूर हिमालय पर्वतात जाऊन त्या पिल्लाला सोडून येतो. गरुड उडत उडत परत त्याच झाडाजवळ येतो जिथे तो यम बसलेला असतो. गरुड जाऊन यमाला म्हणतो ‘ त्या चिमणीच्या पिल्लाला मी दूर हिमालयात सोडून आलो आहे. आता बोल. जोराने हसून यम गरुडा ला म्हणतो ‘ अरे त्या पिलाची मृत्यूची वेळ ठरलेली होती. पण त्याचा मृत्यू हिमालयात लिहिला होता. मी मघापासून काळजीत होतो की आता येवढ्या थोड्या वेळात त्याला हिमालयात कोण घेऊन जाणार? गरुडा तू माझं काम सोपं केलं. तू त्याला हिमालयात सोडून आलास आणि तू त्याला तिथे सोडताच ते तिथे मेलं.”

कणेकरांनी मृत्यूच्या स्थळाबद्दल सांगितलेल्या या गोष्टी बरोबरच म्रृत्युच्या वेळेबद्दल लिहिलेली एक सत्य घटना ही पुढे दिली आहे. त्यांनी लिहिलंय- एक ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू (त्याचं नाव त्यांनी दिलेलं आहे. पण मला ते आठवत नाही), इंग्लंडमध्ये क्रिकेट खेळायला गेला. ज्या दिवशी खेळ नव्हता त्यादिवशी त्या क्रिकेटपटू नं एक कार बाहेर काढली आणि दोन-तीनशे बैलाच्या लॉंग ड्राईव्ह वर जायला निघाला. भरधाव वेगाने तो कार चालवत होता. एका वळणाच्या की कशा तरी ठिकाणी त्याची कार कलंडली. दोन-तीन पलट्या मारून रस्त्याच्या कडेला आडवी पडली. तो बाहेर आला. आश्चर्य म्हणजे त्याला कुठेही काही लागलेलं नव्हतं. पण कारचं बरंच नुकसान झालं म्हणून तो कमरेवर हात देऊन कारची पाहणी

करण्यासाठी खाली वाकला अन तेवढ्यात मागून एका भरधाव येणाऱ्या कारनं त्या खेळाडूला उडवलं. उंच उडून तो खेळाडू रस्त्यावर आपटून मरण पावला.

स्थळ तेच. मृत्यू तिथेच झाला. पण त्याच्या स्वतःच्या कारनं पलटी मारली तेव्हा वेळ यायची होती. वेळ दोन मिनिटं नंतरची होती. म्हणून स्वत: कारमधून सुरक्षित बाहेर आलेला तो, दोन मिनिटाने दुसऱ्या कारच्या उडवण्यानं मरण पावला. मृत्यूचा हा असा अजब खेळ असतो. म्हणूनच म्हणतात, स्थळ आणि काळ चुकत नाही. मग कारणही काही लागत नाही. नियतीचा खेळ अजब असतो. माझ्या बायकोच्या मृत्यूचा तर मी स्वतः साक्षी आहे. दोन मिनिटात, मी बाजूला उभा असताना तिचा मृत्यू झाला. पण मी किंवा कोणीच काही करू शकलो नाही. आठ नोव्हेंबर 2014 ला तिचा मृत्यू झाला. तिच्या आठवणीत मी गेली 4-5 वर्ष अमरावतीच्या दैनिक हिंदुस्तानात,8नोव्हेंबरला एक लेख लिहित असतो. त्या माझ्या लेखांमधला तिच्या मृत्यूच्या वेळी घडलेल्या प्रसंगाचा थोडासा भाग मी आज परत इथे लिहितो आहे. माझ्या बायकोला जन्मापासून फक्त एकच किडनी होती. उजवी किडनी. तिला डावी किडनीच नव्हती. आणि हे आम्हाला ती 58 वर्षाची झाल्यानंतर प्रथम कळलं. मी त्यावेळी नागपूरच्या रायसोनी इंजिनिअरिंग कॉलेजचा प्राचार्य होतो. घरात पाय मुरगळला म्हणून की काय तिच्या डाव्या गुडघ्यात दुखू लागलं व डाव्या पायावर सूज आली.

मग आम्ही हाडाच्या डॉक्टरांना दाखवलं. ते म्हणाले काही फ्रॅक्चर वगैरे नाहीये. थोडे टिश्युज रप्चर झाले आहेत. त्यांनी काही फिजिओथेरपी सांगितली अन् काही पेन किलर दिल्या. पंधरा दिवस आम्ही ती फिजिओथेरपी केली, त्यांनी दिलेल्या गोळ्या घेतल्या पण काही आराम पडेना. म्हणून आम्ही आमच्या ओळखीच्या एका एम.डी डॉक्टरांकडे दाखवलं. त्यांनी आम्हाला ब्लड टेस्ट करायला सांगितल्या. त्यात सीरम यूरिक एसिड व सिरम क्रिएटिनिन ही टेस्ट करायचं होत्. टेस्ट रिपोर्ट आल्यानंतर कळलं की तिचा ब्लड युरिया जवळ जवळ दुप्पट झाला आहे आणि क्रियाटिनिन ही 1.7 झालं आहे. (1.2 नॉर्मल असतं) डॉक्टर म्हणाले, यांच्या.किडनीवर थोडा परिणाम झालेला दिसतो. ते म्हणाले तुम्ही यांची सोनोग्राफी करून उद्या मला रिपोर्ट आणून दाखवा. आम्ही त्यादिवशी संध्याकाळीच सोनोग्राफी करून घेतली.सोनोग्राफी चे डॉक्टर म्हणाले उद्या सकाळी येऊन रिपोर्ट घेऊन जा. दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्यांच्याकडे गेलो. त्यांनी मला रिपोर्ट दिला, मी तो रिपोर्ट तिथेच वाचला. त्यात त्यांनी एका ठिकाणी असं लिहिलं होतं देअर इज नो किडनी लाईक स्ट्रक्चर सिन ऑन लेफ्ट साईड. मी त्यांना विचारलं , डॉक्टर याचा काय अर्थ? ते म्हणाले तुम्ही तुमच्या डॉक्टरांकडे जा ते तुम्हाला समजावून सांगतिल. मी म्हणालो, तुम्ही सोनोग्राफीचा रिपोर्ट लिहिला आहे त्यामुळे तुम्हीच सांगा. मग ते म्हणाले त्यांना जन्मापासून डावी किडनीच नाही. फक्त एकच म्हणजे उजवी

किडनी आहे. मला ते ऐकून धक्काच बसला. कसंतरी विचारांची जुळवाजुळव करत मी घरी गेलो. आता तिला धक्का बसणार नाही अशा शब्दात मला तिला सांगायचं होतं. मी माझ्या परीने तसा प्रयत्न केला. तरीही तिला थोडा धक्का बसलाच. मग आम्ही आमच्या एम.डी. डॉक्टरांकडे गेलो. त्यांनी आम्हाला खूप दिलासा दिला. ते म्हणाले असे एका किडनी चे पेशंट असतात. यांना पेन किलर दिल्यामुळे यांच्या उजव्या किडनी वरही थोडा परिणाम झालेला आहे. मग त्यांनी आम्हाला नागपूरमधल्या धंतोलीतील एका नावाजलेल्या नेफरोलॉजिस्ट कडे पाठवलं. त्या डॉक्टरांनी आम्हाला काळजी करू नका घाबरण्याचे काहीच कारण नाही असं सांगितलं. ते म्हणाले अहो यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी ह्या मोठ्या लोकांनाही एकच किडनी होती. घाबरू नका. मग त्यांनी आम्हाला काही औषधं दिली. आणि खाण्या पिण्या वरील बंधन सांगितली. ते म्हणाले काकडी, मुळा ,टमाटे, पालक वगैरे खायचे नाही. शिवाय रोज फक्त एकच वाटी वरण खायचं. पुढे ते म्हणाले यांनी एकदम थंड काही खायचं किंवा प्यायचं नाही. यांना कधी जास्त वेळ ए.सी. मध्ये बसू द्यायचे नाही तसंच यांचे ब्लड प्रेशर वाढणार नाही याची काळजी घ्यायची. मग त्यांच्याकडून त्या सूचना घेऊन आम्ही घरी परत आलो. घरी परत आल्यानंतर माझ्या मनात विचार आला की आपण सकाळी 9 ते संध्याकाळी सात पर्यंत कॉलेजात असतो. ही एकटीच घरी असते. शिवाय नागपूरात आपले काही

फारसे नातेवाईकही नाहीत.त्यामुळे आपण आता अमरावतीला शिफ्ट व्हावं, अमरावतीला माझे भाऊ, माझी बहिण, माझ्या बायकोचे भाऊ, माझ्या बायकोची बहिण, तिचे मामा असे बरेच नातेवाईक होते. मला वाटलं, तिथे घरी सारखं कोणी न कोणी येत राहील आणि हिला एकटं वाटणार नाही. मग मी आमचे चेअरमन रायसोनी यांना भेटलो आणि त्यांना विनंती केली. म्हटलं सर तुम्ही मला आता कार्यमुक्त करा. ते म्हणाले सर असं अचानक काय झालं? तुम्ही गेल्यानं माझ्या कॉलेजवर फार परिणाम होईल. तुमची काही अडचण आहे का? मी म्हटलं सर मला तुमची काहीच अडचण नाही..माझा थोडा पर्सनल प्रॉब्लेम आहे त्यामुळे मला अमरावतीला जायचं आहे. तो नोव्हेंबरचा महिना होता. त्यांनी मला सांगितलं सर तूर्त तुम्ही काही बोलूच नका मला तुम्ही परत फेब्रुवारीत भेटा. ठरल्याप्रमाणे मी 20 फेब्रुवारीला परत त्यांना भेटलो. यावेळी मी त्यांना स्पष्ट स्पष्ट काय प्रॉब्लेम आहे ते सांगितलं. मग ते म्हणाले ठीक आहे सर. एवढी टर्म पूर्ण करून द्या, मी 15 एप्रिलला तुम्हाला रिलीव्ह करतो. मग मी 15 एप्रिल ला तिथून रिलीव्ह झालो. त्याच्या पंधरा दिवस आगोदरच मी माझं सर्व सामान माझ्या अमरावती च्या घरी शिफ्ट केलं होतं. मग 16 एप्रिल 2006 ला आम्ही अमरावतीला आलो आणि लागलीच दुसऱ्या दिवशी म्हणजे, 17 एप्रिल 2006 ला मी अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून रुजू झालो. मी

येण्याच्या एक महिना अगोदरच हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला मी अमरावतीला परत येतोय असं कळलं होतं. त्यामुळे त्यांनी मला प्राचार्य पदाची आधीच ऑफर दिली होती. अमरावतीला आल्यानंतर आम्ही अमरावतीचे सुप्रसिद्ध नेफरोलॉजिस्ट डॉक्टर अविनाश चौधरी यांच्याकडे जायला लागलो. आम्ही साधारण दर दोन महिन्यांनी सर्व ब्लड टेस्टस करून डॉक्टर चौधरींना हिची प्रकृती दाखवायचो. अमरावतीला आमचं दैनंदिन जीवन अगदी व्यवस्थित सुरू झालं. हिला काही त्रास नव्हता. ह्या दरम्यान आम्ही 2008ला अडीच महिने मुलाकडे शिकागोला अमेरिकेत राहून आलो. नंतर 2010 ला आम्ही केसरी टूर बरोबर थायलँड मलेशिया सिंगापूर हा दहा दिवसाचा दूरही केला. त्यानंतर 2012 मध्ये आम्ही विस दिवस लंडनला आमच्या मुलीकडे राहिलो आणि पुढे दहा दिवस आम्ही युरोपचा दौराही केला. हिला तसा काहीच त्रास नव्हता.पण हळूहळू हीच क्रिएटिनिन वाढत होतं. आम्ही अमरावतीला आलो तेव्हा ते 1.7 असं होतं ते हळूहळू 2013ला 4.6 असं झालं. आम्ही 2013ला पुण्यात आदित्य बिर्ला हॉस्पिटलमध्ये तिला एकदा दाखवलं’ डॉक्टर म्हणाले तुमच्या अमरावतीच्या डॉक्टरची ट्रिटमेंट अगदी बरोबर आहे. ती चालू ठेवा. पुढे 2014 फेब्रुवारीला आम्ही परत मुलाकडे पुण्याला आलो त्यावेळीही आम्ही आदित्य बिर्ला मध्ये त्याच डॉक्टरांकडे गेलो.त्यांनी तिची तपासणी केली आणी म्हणाले क्रिएटिनिन आता 5.3 असं झालं आहे आणि यांची ही

उजवी किडनी ही 95% फेल झाली आहे, त्यामुळे तुम्हाला आता केव्हाही यांचं डायलिसिस करावं लागेल. त्याच्यासाठी तुम्ही यांचं फिस्टूला करून ठेवलेलं बरं. मग आम्ही अमरावतीला परत आल्यानंतर डॉक्टर चौधरींना पुण्याच्या डॉक्टरांचं काय म्हणणं आहे ते सांगितलं. ते म्हणाले सर, अजून आपण 1-2 महिने वाट पाहू. पण पुढे एप्रिल मध्ये क्रिएटिनिन आठ झालं. आणि मे मध्ये ते जवळजवळ दहा झालं. मग जूनमध्ये आम्ही फिस्टूला करून घेतलं आणि जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून आठवड्यातून एकदा हीच डायलिसिस सुरू केलं. आम्ही दर शनिवारी सकाळी 9 ते एक वाजेपर्यंत डायलिसिस साठी डॉक्टर चौधरींकडे जायचो. दर शनिवारी सकाळीच ही सगळा स्वयंपाक करून ठेवायची. परत दोन वाजता आल्यानंतर एक तास दोन तास विश्रांती. विश्रांती घेतल्यानंतर हीचं रोजचं काम सुरू व्हायचं. अगदी पुढचा शनिवार येईपर्यंत हीच रुटीन चालू असायचं. घरातलं सगळं काम, बागेचं काम हे सगळं ती करायची.आमच्याकडे येणारे जाणारे त्यांच्ही ती करायची. आम्हीपण आमचे नातेवाईकांकडे जाऊन यायचो. हिला पाहून तिला काही त्रास आहे किंवा आजार आहे असं कोणालाही कधी वाटलं नाही. अगदी नॉर्मल दिसायची. शनिवार दिनांक आठ नोव्हेंबर 2014 ला नेहमीप्रमाणे मी सकाळचा फिरून आलो.आम्ही दोघांनी चहा घेतला. नऊ वाजता डायलिसिस ला जायचं म्हणून तिनं नेहमीसारखं पिशवीत एक चादर,

नॅपकिन काही बिस्किटं, पाण्याची बाटली सगळं भरून ठेवलं. नंतर दोन भाज्या केल्या, पोळया ती करायची नाही. मी साधारण अकरा वाजेच्या दरम्यान अर्ध्या तासासाठी घरी परत यायचो आणि आमच्या पोळया वाल्या बाईकडून पोळया करून घ्यायचो. आणि परत हॉस्पिटलमध्ये जायचो.

शनिवार आठ तारखेलाही भाज्या केल्याबरोबर तिनं आंघोळ करून घेतली. नंतर तयार झाली. मी माझी कार बाहेर काढायला गेलो तोपर्यंत तीनं स्वत:च दाराला कुलूप लावलं आणि कार मध्ये येऊन बसली. आम्ही नऊ विसला नेहमीप्रमाणे डायलिसिस ला पोचलो. मी कार पार्क करी पर्यंत तीने आत जाऊन त्या कॉटवर आपली चादर अंथरली, पिशवी बरोबर कॉटच्या बाजूलाच ठेवली. आणि नर्सनं बरोबर साडेनऊ वाजता हीच डायलिसिस सुरू केलं. दर शनिवारी डायलिसिस सुरू झाल्यानंतर मी तिला वर्तमानपत्र घडी करून वाचायला द्यायचो. आणि मी कधी तिच्या जवळ तर कधी बाहेर खुर्चीवर बसून असायचो. आठ तारखेला ही मी तिला नेहमीप्रमाणे पेपर फोल्ड करून दिला. तिने दहा वाजेपर्यंत तो पेपर वाचला. दहा वाजता तिने पेपर बाजूला ठेवला आणि छातीवरून आपला हात फिरवला,मी म्हटलं काही दुखतय का? तर ती म्हणाली नाही थोडी मळमळ होते. बाजूला नर्स उभी होती ती म्हणाली, ‘काकू उलटी होईल असं वाटतं का? मी पॉट देते.’ मी पलंगाच्या उजव्या बाजूला उभा होतो. नर्सनं डाव्या बाजूने तिच्या तोंडाजवळ ते पॉट धरलं. माझ्या बायकोने डाव्या बाजूकडे तोंड फिरवताना

असे काही डोळे फिरून मान टाकली की आम्ही घाबरूनच गेलो. नर्सनं ताबडतोब तिच्या कपाळावर जोराने चापट्या मारून काकू काकू असं आवाज द्यायला लागली. मी पण तिचं नाव घेऊन सारखा ओरडत होतो' नर्सनं ताबडतोब दुसऱ्या नर्सला खाली पाठवून डॉक्टर चौधरींना बोलावलं. ते तीन मिनिटातच वर आले. आल्याबरोबर त्यांनी मला बाहेर जायला सांगितलं. दाराला बोल्ट करून घेतलं आणि मग वीस-पंचवीस मिनिटं डॉक्टर, नर्स ह्या सगळ्यांची धावपळ सुरू होती. मी बाहेर बसलेला होतो. बसल्या बसल्या मी आमच्या गावातल्या सर्व नातेवाईकांना असं झाल्याचं कळवलं. तिचे भाऊ, भाचे, माझे भाऊ थोड्याच वेळात तिथे आले. पंचवीस मिनिटानंतर डॉक्टर चौधरी बाहेर आले. त्याच्या दहा पंधरा मिनिटं अगोदर ते एकदा बाहेर आले तेव्हा मी त्यांना विचारलं की सर आम्ही कार्डिऑलॉजिस्ट्ला बोलवू का? ते म्हणाले बोलवा. मग आम्ही आमच्या ओळखीच्या दोन कार्डिओलॉजिस्ट ना फोन केले. त्यापैकी एक जण यायला निघाला. पण पंचवीस मिनिटानंतर जेव्हा डॉक्टर चौधरी बाहेर आले तेव्हा त्यांनी माझ्या एका नातेवाईकाला सांगितलं , 'आय एम सॉरी. आय कुड नॉट डू एनिथिंग.'.तेवढ्यात आमचे कार्डिओलॉजिस्ट आले. त्यांनी आत जाऊन माझ्या बायकोला तपासलं. ते म्हणाले त्या वीस-पंचवीस मिनिटापूर्वीच वारल्या. मी म्हणालो डॉक्टर असं अचानक डायलिसिस चालू असताना काय झालं असेल. डॉक्टर म्हणाले डायलिसिस चालू

असताना कधीकधी सोडियम- पोटॅशियम ची लेव्हल डिस्टर्ब होते आणि असं झालं की काही क्षणापुरता हृदयाला रक्तपुरवठा बंद होतो. एका मिनिटाच्या आत तो पुरवठा रिस्टोअर करता आला नाही तर पेशंटला हार्ट अटॅक घेऊन पेशंट दगावतो. बहुदा यांचेही तसंच काहीतरी झालंय. आम्ही सगळे हतबल झालो. मग तिचं नेत्रदान करून आम्ही ताबडतोब ॲम्ब्युलन्सनं तिचं शव घेऊन घरी गेलो. त्यादिवशी सकाळी घरून निघताना क्षणभरही मनात असं आलं नाही की आज आपल्याला एकट्याला घरी परत यावं लागेल. मृत्यूचा खेळ हा असा विचित्र असतो.

27 जानेवारी 2016 ला माझे मोठे भाऊ डॉक्टर एस. एन. जाजू, माजी प्राचार्य, विदर्भ महाविद्यालय अमरावती ,हे अमरावती ऊन नागपूरला कारनं चालले होते. त्यांच्या कारला कोंढाळी जवळ प्राणघातक अपघात झाला,. कार मध्ये मागच्या सीटवर भाऊ आणि वहिनी बसल्या होत्या. ड्रायव्हर कार चालवत होता. कोंढाळी जवळ मागून भरधाव येणाऱ्या एका ट्रकनं ओव्हरटेक करताना आमच्या भावाच्या कारला धक्का मारला. त्यामुळे कार 3-4 पलटी मारून रस्त्यावर कलंडली. आजूबाजूचे लोक धावत आले, त्यांनी कारचं दार उघडून सर्वांना बाहेर काढलं. ड्रायव्हरला काही म्हणजे काहीच लागलं नव्हतं. वहिनीना ही थोडंफार खर्चटलं होतं. पण भावाच्या मणक्याला जबरदस्त मार बसलेला असावा. त्यांना असह्य वेदना होत होत्या. आणि उठता येत नव्हतं. थोड्याच वेळात मागून

अमरावती वरून नागपूर ला जाणारी कोणाची तरी मोठी कार आली. त्यांना विनंती करून, माझे भाऊ आणि वहिनी ह्या दोघांना नागपूरला नेलं आणि तिथे त्यांना धंतोली मध्ये न्यूरॉन हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आलं. भाऊ पाहत होते, बोलत होते, ओळखत होते. पण त्यांच्या हातापायाची हालचालच बंद झाली होती. 28 जानेवारीला भाऊचं त्या हॉस्पिटलमध्ये दोन-तीन तासाचं मोठं ऑपरेशन झालं. ऑपरेशन यशस्वी झालं असे डॉक्टरांनी सांगितलं. मग तीन-चार दिवस भाऊंना तिथेच आयसीयू मध्ये ठेवण्यात आलं, नंतर त्यांना सर्विस रूम मध्ये शिफ्ट केलं. डॉक्टर म्हणाले ही रिकवरी फार हळूहळू होईल. यांना रिकव्हर व्हायला कमीत कमी तीन-चार महिने लागतील.हॉस्पिटलमध्ये माझ्या वहिनी, माझा पुतण्या त्याची बायको हे सर्वजण भाऊंच्या जवळ होते. सहाव्या दिवसापासून भाऊंना बरेच नातेवाईक, मित्र ,मी आणि माझी बहिण असे सगळेजण भेटायला गेलो. तिथे गेल्यानंतर भाऊ सर्वांशी बोलायचे, सर्वांना ओळखायचे पण त्यांच्या हाताची आणि बोटाची हालचाल अजूनही होत नव्हती. 9 फेब्रुवारीला सकाळी भाऊच्या हृदयाचा रक्तपुरवठा बंद होऊन त्यांना मोठा हार्ट अटॅक आला आणि त्यांचा मृत्यू झाला, 76 वर्षांचे होईपर्यंत ज्या माणसाला एकदाही कुठल्याही कारणासाठी एक दिवसही दवाखान्यात ॲडमिट करावं लागलं नाही त्या माणसाला दवाखान्यातच मृत्यूनं असं हिरावून नेल. दीड वर्षाच्या अवधीत माझ्या जीवनाला आधार आणि

आकार देणाऱ्या दोन व्यक्तींचा मृत्यू झाला.  खरं म्हणजे 27 जानेवारीला सकाळी दहा वाजेपर्यंत नागपूरला जायचा भाऊचा काही विचार नव्हता.

जाण्यासाठी काही महत्त्वाचं कारणही नव्हतं. पण अकरा वाजता जेवण झाल्यानंतर सहज वहिनीचं आणि भाऊचं ठरलं की जर ड्रायव्हर अँवेलेबल असेल तर " आपण आज नागपूरला जाऊन आपल्या त्या नातेवाईकाला भेटून येऊ. ते आजारी होते तेव्हापासून आपल्याला जायचं होतं. आज मला सवड आहे दुसरं, काही कामही नाही, रात्रीपर्यंत परत येऊ." मग भाऊंनी त्यांच्या नेहमीच्या ड्रायव्हरला फोन केला.तू रिकामा आहेस का म्हणून विचारलं.नागपूरला जायचं रात्री परत येऊ असं त्याला सांगितलं. तो हो म्हणाला. मग भाऊनि त्याला ताबडतोब आपल्या घरी यायला सांगितलं आणि मग अर्ध्या तासात भाऊ वहिनी आणि ड्रायव्हर कार घेऊन नागपूर साठी रवाना झाले. काळ आणि वेळ आणि स्थळही चुकत नाही. त्यादिवशी काही कारण नसताना त्यांना नागपूरला जायची बुद्धी झाली. ती नेमकी अशावेळी ज्यावेळी तो ट्रक मागून येऊन त्यांच्या कारला धक्का मारणार होता. म्हणतात ना की काळ आणि मृत्यूचं स्थळ हे अगदी ठरलेलं असतं. मग त्याप्रमाणे त्यादिवशी अशा घटना घडत गेल्या आणि त्या ठरलेल्या ठिकाणी भाऊच्या कारला तो अपघात झाला. काळ क्रूर, निर्दयी असतो असं म्हणतात. पण तो वक्तशीर ही असतो?

# साधी माणसं

मी एक जुलै 1966 ला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे लेक्चरर इन मेकॅनिकल इंजिनियरिंग म्हणून रुजू झालो. माझ्या आगेमागे माझे 5-6 मित्रही, म्हणजे जे प्रथम अनोळखी होते पण नंतर झालेले मित्र, तेही रुजू झाले. आम्ही मेकॅनिकल डिपार्टमेंटला साधारणपणे सोळा-सतरा जण होतो. त्यात बहुतांशी तिशीच्या आतच. फक्त चार-पाच सीनियर होते. सुरुवाती सुरुवातीला आमच्या कॉलेजचा एक कॉमन टी क्लब होता. पुढे पुढे महाविद्यालयाच्या प्राध्यापकांची संख्या वाढत गेली म्हणून आपआपल्या विभागाचे वेगवेगळे टी क्लब झाले. सिविल चा वेगळा, मेकॅनिकल चा वेगळा, इलेक्ट्रिकल चा वेगळा असे. आमच्या मेकॅनिकल च्या टी क्लबमध्ये मॅथेमॅटिक्स चे काही प्राध्यापक येत. रोज दुपारी एक ते दीड ही आमची चहाची वेळ असायची. ज्यांना पिरेड नसेल ते थोडे अगोदर येऊन बसायचे.

मला वाटतं 1974 ची गोष्ट असेल. एक दिवस एकला पाच मिनिटं कमी असतानाच मी टीक्लब मध्ये गेलो. माझ्या आधीच माझे मित्र प्राध्यापक साबू तिथे बसलेले होते. मी त्यांच्या समोर जाऊन बसलो. ते

म्हणाले ‘जाजूजी, मेरी तरफ अच्छी तरह देखो, तुमको मेरे मे कुछ चेंज नजर आ रहा है?’ मी खालून वर पर्यंत त्यांना पाहिलं अन म्हणालो नाही. तेवढ्यात आमचा मॅथेमॅटिक्स चा मित्र मुकुंदा गोखले माझ्या बाजूला येउन बसला.साबूनं त्यालाही तोच प्रश्न विचारला. गोखलेनं सुद्धा साबूला पायापासून डोक्यापर्यंत पाहिलं आणि तो म्हणाला नाही. मग साबू हसत हसत म्हणाले ‘ मै तुमको बताता हू. मेरे पैर की तरफ देखो.” आम्ही दोघांनी त्यांच्या पायाकडे पाहिलं अन काय आश्चर्य आम्ही दोघेही हसत सुटलो. साबू च्या डाव्या पायामध्ये हार्ड प्लास्टिक ची निळया रंगाची चप्पल तर उजव्या पायात हार्ड प्लास्टिक ची पिवळया रंगाची चप्पल होती. ” हा हा हा” साबू हसत म्हणाला ‘देखो हम फालतू बातोको कितना महत्त्व देते है, मैने यही चप्पल पहन के आज दो अलग-अलग क्लास् पर पीरियड लिये.लडको को कुछ भी ख्याल में नही आया. अभी अभी मैने तुम दोनो को अलग अलग पूछा. तुम्हारे भी ख्याल में नही आया. ऐसा है. कोई किसी को इतना केअरफुली देखता नही, ‘ मी म्हणालो ‘साबूजी तुम्हारे कब ख्याल मे आया? ‘ते म्हणाले “मुझे आज पहिला पिरियड था. मै जल्दी से घर से निकला. पन्नालाल नगर मे रहता हू.” तिथून ते कॉलेजपर्यंत गाडगे नगर ला यायचे. गाडगे नगर हे त्यांच्या घरापासून पाच किलोमीटर अंतरावर होतं. सायकलीनं कॉलेजला यायच्रे. आम्ही जवळजवळ सर्वच मित्र त्यावेळी सायकलीनच कॉलेजला यायचो. साबू पुढे म्हणाले “ सायकलसे इरविन

हॉस्पिटल के बाद में आयटीआय के पास चढाई पर पेडल मारते मारते मेरा ख्याल गया. मैने देखा अपने एक पैर में पिली और एक पैर में भाई की निली चप्पल है. वापस तो जा नही सकताथा,क्युकी मेरा पिरीयड मिस होता. मै कॉलेज मे आया.एक क्लासमेसे दुसरे क्लास मे भी गया. किसी के कुछ भी ख्याल् मे नही आया. दो क्लास लिये." एवढ्यासाठी हा प्रसंग आठवला की आमची त्यावेळची मंडळी किती तळमळीनं आणि मन लावून शिकवायची. एवढेच नव्हे तर त्यांना कुठलाच न्युनगंड नव्हता. आधी काम. त्याला महत्व जास्त. अर्ध्या वाटेतच आपण दोन वेगवेगळ्या रंगाच्या चपला घालून आलो हे साबूंच्या लक्षात आलं होतं. तरीही आपला क्लास बुडू नये म्हणून ते चप्पल बदलायला परत घरी गेले नाहीत. मुले आपल्याला वर्गात हसतील वगैरे त्यांच्या डोक्यात त्यांनी येऊ दिलं नाही. दोन वेगवेगळे क्लास घेतले. ते खूप चांगले व विद्यार्थी प्रिय शिक्षक होते. विषयाचा चांगला अभ्यास करून तन्मयतेने ते वर्गात शिकवायचे. त्यात विद्यार्थि मग्न होऊन जायचे. मग त्यांचे लक्ष इकडे तिकडे जाण्याचा प्रश्नच नसे. एवढेच नव्हे असं असण्या दिसण्या करण्याचे गोष्टींना साबू नि कधीच महत्त्व दिलं नाही. आणि त्यामुळे त्यांचं मन कधीच विचलित होत नसे. असे अत्यंत साधे आमचे साबू होते.

साधेपणाची गोष्ट निघाली म्हणून मला माझे पहिले बॉस प्राध्यापक नेमाडे यांची आठवण होते. मी मेकॅनिकल ला जॉईन झालो तेव्हा नेमाडे

साहेब वर्कशॉप सुपरिटेंडेंट होते. वर्कशॉप चा पसारा मोठा होता. हाताखाली कर्मचारी बरेच होते म्हणून त्यांच्या मदतीसाठी आमच्या प्राचार्यांनी माझी बदली वर्कशॉप विभागात केली. नेमाडे साहेब व मी एकाच रूम मध्ये बसायचो. दोघांचं एकच मोठं टेबल होतं. साधारणत: सहा फूट बाय चार फूट एवढं मोठं. टेबलाच्या दोन्ही बाजूंनी दोन मोठे मोठे कपाटा सारखे ड्राव्रर होते. माझ्या बाजूने दोन ड्राव्रर होते, त्यात मी माझ्या नोट्स पुस्तक इत्यादी ठेवायचो आणि रोज जाताना माझ्या ड्रावरला मी कुलूप लावून घ्यायचो. सुरुवाती सुरुवातीला आमचं कॉलेज हे गाडगे नगरातील शासकीय तंत्रनिकेतन मध्ये भरत होतं. त्यामुळे आमच् कॉलेज सकाळी साडेसात ते दुपारी दीड पर्यंत असायचं. मी जुलैत जॉईन झालो. पावसाळ्याचे दिवस होते. एक दिवस साधारण साडे सात आठ ला मी कॉलेजमध्ये आलो. पाऊस नुकताच थांबला होता. रूम मध्ये आलो तर साहेब माझ्या अगोदरच आलेले व खुर्चीत बसलेले. मी नॅपकिनं माझं हात तोंड पुसलं अन् ड्रावर चं लॉक काढायला खाली वाकलो. पाहतो तर समोर साहेब फक्त अंडर पॅन्ट वरच बसलेले. पॅन्ट नाहीच. मला एकदम हसू आवरेना म्हणून मी बाथरूम मध्ये जाण्यासाठी बाथरूमचं दार लोटलं. बाथरूम मोठं होतं. त्यात बेसिन वगैरे होतं. आत जाऊन पाहतो तर तिथे टेबलावर टेबल फॅन च्या समोर आमच्या रूमचा चपराशी साहेबांची पॅन्ट हातात घेऊन वाळवत होता. तो म्हणाला, साहेब पावसात आले पॅ ंन्ट ओली झाली. शर्टवर जर्सी होती.मग

आल्या आल्या मला म्हणाले जा रे ही पॅन्ट जरा फॅन वर वाळव. आणि तोपर्यंत आमचे नेमाडे साहेब अंडर पॅन्ट वरच बसलेले होते. बरं एवढं असून चुपचाप तरी बसून राहिले का? नाही. फिटर ला बोलाव, कारपेंटर ला बोलावून त्यांना काम सांग. हे त्यांचं चालू होतं. इतकं कामाचं महत्त्व आणि इतकं साधेपण. रोज सायकल वर यायचे. 51- 52 वर्षांचे होते.नेहमी डोक्याला गंध लावायचे. घरून ऑफिसला आल्याबरोबर रोज अगोदर बेल वाजून चपराशाला बोलवायचे आणि खिश्यातून एक कागदाची पुडी काढून त्याला देऊन म्हणायचे चौधरी ही भाकर गाईला दे. गाईची भाकर ते रोज आणायचे. 1942 43 चे ते बी.ई. मेकॅनिकल- इलेक्ट्रिकल अशा दोन पदव्या असलेले प्राध्यापक होते. मी वर्कशॉप मध्ये रुजू झालो त्यानंतर चार दिवसानंतरचा प्रसंग. कुठल्यातरी कामात चुकल्यामुळे की उशिरा आल्यामुळे त्यांनी आमच्या कारपेंटरला बोलावलं व त्याला जाब विचारला. अगदी संथपणे न रागावता. पण त्यांच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन तो कारपेंटर त्यांच्याशी वाद घालू लागला. मोठ्या आवाजात बोलू लागला' मला ते खूप खटकलं. मग मी त्या कार्पेंटर ला चांगलं खडसावलं अन वरिष्ठांशी जरा आदराने बोलत जा म्हणून सांगितलं. त्यानंतर दोन दिवसांची गोष्ट. मी माझ्या खुर्चीत बसलेला. नेमाडे साहेब आले. पाणी वगैरे प्याले. चपराशाला म्हणाले, जा रे आपल्या वेल्डर नायडू ला बोलावून आण. तो बोलावयला गेला. थोड्याच वेळात नायडू येऊन उभा राहिला.

तो उभाच. साहेब काही बोलेच ना. शेवटी न राहवून तो म्हणाला, सर आपने मेरे को बुलाया? त्याला काहीच न म्हणता ते माझ्याकडे पाहून म्हणाले जाजू ह्याला जरा दम द्या. आता माजी पंचाईत. कारण कशासाठी दम द्यायचा हे मला माहीतच नव्हतं. मग मी हळूच त्यांना विचारलं सर, कशासाठी दम द्यायचा, काय झालं होतं? ते म्हणाले, ' काल एक महत्त्वाचं वेल्डिंग चं काम होतं. चार वाजता याला बोलावलं तर याचा पत्ता नाही. गेला घरी पळून.' मग माझ्या लक्षात आलं की आपण परवा कारपेंटर ला दम दिला तो साहेबांना आवडला. आता दम देण्याचे काम ते नेहमी आपल्यावर सोपवणार आहेत. अशी ही साधी माणसं. कोणाच्या अध्यात नाही मध्यात नाही. नाकासमोर पहात जाणं. आपलं कामाशी काम करणं. माझं लग्न ठरल्यानंतर 14 महिन्यांनी माझं लग्न झालं. या काळात मी व माझी बायको एकमेकांना पत्रं लिहीत असू. माझ्या घरी माझे मोठे भाऊ आणि वहिनी असल्यानं मी माझी पत्रं घरच्या पत्त्यावर न बोलावता कॉलेजच्या पत्यावर बोलवायचो. व माझी उत्तरंही मी कॉलेजमध्ये बसून वेळात वेळ काढून माझ्या टेबलावरच लिहायचो. माझं लग्न ठरल्याचं नेमाडे साहेबांना माहीत होतं. दोन-तीन वेळा त्यांनी मला पत्र लिहितानाही पाहिलं होतं..साधारणत: ते रूम मध्ये नसतानाच मी पत्र लिहायचो, पण दोन-तीन वेळा गडबड झालीच. आणि त्यांनी मला पाहिलं. एक दिवस ते प्राचार्यांच्या ऑफिसमधून आमच्या रूम मध्ये आले. आत येताच म्हणाले जाजू, ही

माहिती अर्जंट ऑफिसला पाठवायची आहे. ते खुर्चीत बसेपर्यंत मी लिहीत असलेलं पत्र घाईघाईनं आवरलं अन माझ्या ड्रावर मध्ये लपवलं. त्यांनी ते पाहिलं अन म्हणाले ते ही अर्जंट आहे. ते अगोदर पूर्ण करून घ्या. मग ही माहिती ऑफिसला पाठवा. मी अत्यंत ओशाळलो.ते अगदी चांगल्या फ्रेंडली आवाजात हसत हसत म्हणाले पण मला मात्र अवघडल्यासारखं झालं. अशी अनेक अत्यंत शिकलेली पण अत्यंत साधी असलेली माणसं मला माझ्या आयुष्यात भेटली. त्यांच्या आठवणी हा माझा मोलाचा ठेवा आहे. कधीही न विसरण्या सारखा. कारण त्यांच्या साधेपणानं ही मी बरंच काही शिकलो.

आमचे विभाग प्रमुख प्राध्यापक सुजान हे तर अत्यंत साधे होते. मी त्यांना कधी रागावलेले पाहिले नाही. संत माणूस. त्यांच्या घरी बरेच वेळा सत्संग व भजन वगैरेचा कार्यक्रम असायचा. आमच्या विभागाच्या सर्व प्राध्यापकांना ते सहकुटुंब बोलवायचे. अर्थात त्यावेळी आमच्यापैकी निम्मे ब्रह्मचारी होतो. ते प्रवचन करायचे. नंतर एवढा प्रसाद असायचा की आमचं जेवणच व्हायचं. ते होमिओपॅथीची औषधे देत असत. विनामूल्य. आमच्या कोणाचं काही दुखत असलं आणि त्यांना कळलं तर ते थेट घरी घेऊन जायचे. त्यांचं कॉटर कॉलेजमध्येच होतं. मग घरी विचार करून ते औषध द्यायचे. माझा शिराळकर म्हणून एक मित्र होता. एक दिवस त्याची दाढ खूप दुखत होती. दिवसभर जबड्याला हात लावून तो विभागात कॉलेजमध्ये

फिरत होता. सुजान साहेबांच्या ते लक्षात आलं. ते त्याला घरी घेऊन गेले. मी शिराळकर बरोबर त्यांच्या घरी गेलो. घरी गेल्यानंतर मी त्यांना म्हणालो सर मेरा सर भी हरदम बहुत दुखता है. त्यांनी माझ्यासमोर एक छोटे पुस्तक टाकलं. म्हणाले ह्याच्या पैकी कोणती डोकेदुखी तुम्हाला लागू पडते ते पहा. मी ते पुस्तक उघडलं आणि चक्रावूनच गेलो. त्यात अनेक प्रकारच्या डोकेदुखी होत्या. मी म्हणालो सर याच्या मधल्या बऱ्याच डोकेदुखी मला लागू पडतात. ते हसायला लागले, आणि हसत म्हणाले ठीक आहे.वूई विल ट्राय वन बाय वन. ‘मी अगोदर सात दिवसासाठी तुम्हाला औषध देतो. हे तुम्ही घ्या. आणि मला सात दिवसांनी परत दाखवा.’ मला खुप हसायला येत होतं. म्हटलं आता हे वन बाय वन डोकेदुखी ट्राय करणार आणि औषध देणार.शिराळकरनं माझा हात दाबला. आणि मला हसण्यापासून थांबवलं. असे आमचे सुजान सर. एकदा कॉलेजमध्ये इतिहास तज्ञ,पु.ना.ओकांचं भाषण होतं. त्यावेळी ते ताजमहाल हा शहाजाननं बांधला नसून तो हिंदुनी बांधला आहे ह्या विषयावर पोटतिडकीनं आणि दाखले देऊन बोलायचे. आमच्याकडे त्यादिवशी ते दीड तास बोलले. त्यांचं भाषण संपल्यानंतर अध्यक्षस्थानी असलेले सुजान साहेब बोलायला उठले. त्यांनी दोन शब्दातच पु.ना.ओकांची हवा काढून टाकली..ते म्हणाले एव्हरी बडी इज आत्मा. हिंदू इज आत्मा. मुस्लिम इज आत्मा. सो व्हेदर हिंदू बील्ट ताजमहल और मुस्लिम बील्ट ताजमहल, हाऊ डज इट मॅटर्? आय एम

आत्मा. सो,आय बिल्ट द ताजमहल. एवढे दोन वाक्य बोलून ते परत खुर्चीत बसले. आम्ही सर्व गालातल्या गालात हसत होतो. पु.ना.ओकंचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता,

असे होतेआमचे सुजान साहेब, अगदि सरळ अन साधे.

अशि ही अनेक साधी माणसं माझ्या आयुष्यात येवून गेली अन आपला प्रभाव सोडून गेली.

# असे ही किस्से

1992 ला मी अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे मेकॅनिकल डिपार्टमेंटचा विभाग प्रमुख होतो. एक दिवस नेहमीप्रमाणे साडेदहा वाजता मी कॉलेजला आलो. माझी स्कूटर पार्क केली. बॅग घेऊन माझ्या रूम मध्ये आलो. पाहतो तर एक ग्रहस्थ माझ्या खोलीत अगोदरच बसलेले होते. त्यांना पाहताच मी त्यांना ओळखलं. त्यांना मी 1966- 67 ला आमच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिकवलं होतं. माझ्या विद्यार्थ्यांची नावं मी सहसा विसरत नाही. माझ्या अनेक विद्यार्थ्यांना याचं कौतुक वाटतं पण प्रामाणिकपणे सांगतो, फायनल इयर मेकॅनिकल ला मी शिकवलेल्या बहुतेक विद्यार्थ्यांची नावं अजून माझ्या लक्षात आहेत. ह्या गृहस्थांना पाहिल्याबरोबर मी म्हटलं “ अरे शास्त्रीजी ( हे नाव मी बदललं आहे ) आप यहा कैसे?” मी ओळखलं हे त्यांच्या लक्षात आलं. ते म्हणाले सर आप ही ने तो मुझे बुलाया है. मी म्हणालो मैने? नही तो. ते म्हणाले ‘ सर कल सेकंड इयर मेकॅनिकल के दो लडको ने डिपार्टमेंट के लॉबोरेटरीसे सामान की चोरी कीयी. आपने उनको डाटा और अपने अपने पिताजी को कल कॉलेज लेकर आवो ऐसा कहा. सर उन दो लडको मे से एक लडका मेरा है.’ मी म्हणालो

‘ नही, उसने से तो कोई भी शास्त्री नही है.” ते म्हणाले हमारा सरनेम पंत है. वो पंत लिखता है. लेकिन हम वोपिढी के पढनेवाले लोग अपना नाम शास्त्री लिखते थे, क्युकी पहिले , हमारे घर में पूजा पाठ करनेवाले हमारे पिताजी शास्त्रीजी कहलातेथे. और वो सरनेम हम लिखते थे. मी म्हणालो , अच्छा लडका कहा है, उसको बुलवो. मी त्या मुलाला बोलावलं आणि खूप दाटलं. तो व त्याचे वडील माझे विद्यार्थी होते व ते इतके सज्जन ग्रहस्थ आहेत , तेव्हा तुझ्याकडून असं काही होईल असं मला वाटलं नाही. का केलीस तू चोरी, तुला तर काही कमी नाही. संस्कारही चांगले आहेत. मग कारण काय? तो म्हणाला सर कुछ नही बस ऐसे तोडा सा थ्रिल. मी जोरात ओरडलो. थ्रील? म्हटलं असे थ्रिल करण्यासाठी मी तुला अनेक गोष्टी देऊ शकतो. मग मी त्याला थोडसं समजावून वगैरे सांगितलं आणि त्याची रवानगी केली. मला त्यादिवशी प्रथम या गोष्टीचा साक्षात्कार झाला की आपण दुसऱ्या पिढीला शिकवायला लागलो आहे. बापाला शिकवलं आणि आता या मुलाला. मला हा प्रसंग एवढ्यासाठी आठवला की पुढे 2012 ला मी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या इंजिनिअरिंग कॉलेजला डायरेक्टर अस्ताना एक जण आपल्या मुलीला घेऊन कॉलेजमध्ये मला भेटायला आला. तो मला म्हणाला सर मुझे पहचाना? मै, पंत. आपने मुझे पढाया है.सर मेरे पिताजी भी आपके विद्यार्थी थे.अब मेरी लडकी को मै आपके कॉलेज में ॲडमिशन लेने के लिए आया हू. मी म्हणालो याद है.त्याला मी

बसवलं त्याच्या मुलीची आमच्याकडे ॲडमिशन झाली होती. ते दोघे गेल्यानंतर मला जाणवलं कि आता आपण तिसऱ्या पिढीला शिकवायला लागलो आहे.

गेली 50- 51 वर्ष मी ह्या ना त्या कारणाने या ना त्या स्वरूपात इंजिनीरिंग एज्युकेशन सी निगडित आहे. ह्या माझ्या प्रवासात अनेक मजेदार मित्र भेटले अनेक किस्से घडले. ते अजूनही मला आठवतात. 1965 ला मी औरंगाबादच्या गव्हर्नमेंट इंजिनीरिंग कॉलेजचा फायनल ईयर चा विद्यार्थी असताना माझ्याच वर्गात घडलेला एक किस्सा मला आठवला. आम्हाला फायनल इयरला दोन विषय आमचे विभाग प्रमुख शिकवाचे. वर्गात आम्ही 30 विद्यार्थी होतो. विभागप्रमुख खूप हुशार होते व त्यांना विषयाचं ज्ञानही चांगलं होतं पण वर्गात ते थांबत थांबत बोलत व नेहमी वर्गात फार गंभीर असत. त्यांचं शिकवणं आम्हाला फार आवडायचे नाही. त्यामुळे वर्गात नेहमी थोडी कुजबुज सुरूच असायची. एक दिवस तर कहर झाला. सर आम्हाला थेअरी ऑफ मशीन हा विषय शिकवायचे. ह्या विषयात बऱ्याच आकृत्या बोर्डवर काढाव्या लागतात.त्यादिवशी ते आम्हाला विषयातील कॅम प्रोफाईल्स शिकवणार होते. नेहमीप्रमाणे त्यांनी खडू डस्टर राहतात घेतलं आणि मुलांकडे संपूर्ण पाठ फिरवून ते बोर्डवर कॅम प्रोफाइल काढू लागले. आकृतीला बराच वेळ लागणार होता. पण त्यांच्या नेहमीच्या सवयी प्रमाणे, विद्यार्थ्यांकडे पाठ फिरवून एकही शब्द न बोलता डायग्राम

काढायला त्यांनी सुरुवात केली. इकडे वर्गात आम्ही मुलं अस्वस्थ. त्यांचा खूप वचक होता म्हणून जोराने बोलणं ही शक्य नव्हतं. हळूहळू कुजबूज सुरू होती. तेवढ्यात मागच्या लाईन मधल्या एका मुलाने आपली एक चप्पल काढली व ती पहिल्या लाईन कडे भिरकावली. पहिल्या लाईन मधल्या एकानं तिच्या कॉच घेतला आणि ती दुसऱ्या लाईन कडे भिरकावली. तिथे एकानं घेतला व परत तिसर्या लाईन कडे भिरकावली. सगळी मुलं ते पहात दबल्या आवाजात हसत होती. त्या तिसऱ्या लाइन मधल्या विद्यार्थ्यांना परत चप्पल हवेत भिरकावली. ती हवेत असतानाच सरांनी कशाला तरी पाठ फिरवून समोर पाहिलं. ती चप्पल हवेतून पटकन खाली पडली. सर पाहतच होते. सर्व मुलांनी खाली मान घालून खद खद हसायला सुरुवात केली. सरांचा पारा एकदम चढला. ते म्हणाले ‘ यू फुलस. धिस इज व्हॉट यु आर लर्निंग. तुमच्या परीक्षा दोन महिन्यावर आल्यात त्यानंतर तुम्ही इंजिनियर होणार. गाढव, लाज वाटायला पाहिजे. खूप रागावले अन बोलले. शेवटी तावातावानं त्यांनी आपलं डस्टर मस्टर, नोट्स उचलल्या आणि बाहेर निघाले. जाता जाता म्हणाले, अशा मूर्ख मुलांना मला शिकवायचे नाही. यापुढे मी ह्या वर्गात येणार नाही. तुम्ही स्वतः हा विषय करा. ते निघून गेले. आम्ही सर्व सटपटलो. ते आमचे विभाग प्रमुख म्हणजे आमचे माय बाप. आमचे सगळेचे सगळे मार्क्स त्यांचे हाती होते.आता बोंबला. मग सर्व एकत्र झालो. म्हटलं चला त्यांच्या रूम मध्ये

जाऊन त्याची माफी मागू. पण ते इतके रागावले होते की त्यांच्या पुढे जाण्याची कोणाचीच हिंमत होईना. शेवटी आठ दहा जण तयार झाले. त्यात मीही होतो. त्यांच्या रूम पर्यंत गेलो. तिथे परत आत जाण्याची हिम्मत होईना. कसंही करून दारावर टकटक केलं. अन दार ढकलून , मे वुई कम इन सर,विचारलं. त्यांनी वर सुद्धा पाहिलं नाही किंवा पाहून न पाहिल्यासारखं केलं. आम्ही परत एकदा सर मे वुई कम इंन असं म्हणालो. मग ते म्हणाले या. आत आल्यानंतर ते म्हणाले मला काही ऐकायचं नाही. आम्ही परत विनवण्या करत राहिलो. म्हणालो सर तुम्ही परत शिकवायला या. खूप वेळ आम्ही त्यांची मनधरणी केली, माफी मागितली. हे सर्व केल्यानंतर ते म्हणाले ओके आय विल कम फॉर द नेक्स्ट पिरेड टुमारो. आमच्यासाठी हे ही काही कमी नव्हतं. आम्ही बाहेर येऊन सर्वांना ते सांगितलं. त्यानंतर गेली चाळीस पन्नास वर्षे मी शिकवतो आहे. कसं शिकवावं यासाठी तरुण प्राध्यापकांना अनेक ठिकाणी मी भाषणं दिली आहेत. माझ्या प्रत्येक टॉक मध्ये हा किस्सा मी दोन कारणांसाठी आमच्या तरुण मित्रांना सांगतो.एक म्हणजे बोर्डवर फिगर काढताना किंवा डायग्राम काढताना कधीही विद्यार्थ्यांकडे पूर्ण पाठ फिरवायची नाही आणि न बोलता फिगर किंवा डायग्राम काढायचा नाही. सारखं त्या डायग्राम बद्दल बोलत राहायचं.म्हणजे दे ड्रॉ डायग्राम वुईथ यू अंड यू कीप देम इनव्हॉल्ड. त्यामुळे वर्गात कुजबुज होत नाही. दुसरे म्हणजे, विनोदाचा भाग म्हणून मी त्यांना

सांगतो की, तुमच्या विद्यार्थ्यांना सारखा दोष देत जाऊ नका. पन्नास वर्षापूर्वी ही इंजिनीरिंग मध्ये विद्यार्थी इतकेच बदमाश होते. वर्गात अशीच गडबड करायचे.हाऊ टू होल्ड देम अंड कीप देम एंगेज्ड इज युअर बिजनेस. यू हॅव टू वर्क हार्ड फॉर इट.

मुलं कुठल्याही जनरेशनची असोत ,ती आपल्या शिक्षकांना सूक्ष्मपणे पाहत असतात. त्यांचे शिकवणं, बोलणं, लकबी यांच्या ते नकला करतात. काही काहींच्या ज्या विशिष्ट सवयी असतात, त्या ते आवर्जून लक्षात ठेवतात. मला आठवतं, 1973 ला आमच्याकडे विनोद नागोरी म्हणून एक विद्यार्थी होता. तो आम्हा प्राध्यापकांच्या हुबेहूब नकला करायचा. एकदा स्नेहसंमेलन मधिल छात्र रजनीच्या दिवशी त्यांनं आमच्या विभागाच्या चार-पाच प्राध्यापकांच्या नकला केल्या. एका प्राध्यापकान बद्दल तर त्यानं एक मजेदार किस्सा सांगितला. तो म्हणाला “ हे सर आम्हाला एक विषय शिकवतात. ते चांगली तयारी करून येतात. मन लावून शिकवतात पण बोलता बोलता ते एक शब्द वारंवार उच्चारतात. पहिल्यांदा काही दिवस तो काय शब्द आहे, हे आम्हाला कोणालाच कळलं नाही. मी नेहमी शेवटच्या रांगेत बसणारा विद्यार्थी. एक दिवस मी ठरवलं की आज पुढच्या रांगेत बसून कान देऊन सरांचा तो शब्द ऐकायचा. मी त्यांचा पिरियड सुरू होण्यापूर्वी वर्गात डिक्लेअर केलं आणि म्हणालो आज मै सर को पकडता. अन मग मी कान देऊन ऐकायला लागलो. आणि माझ्या

डोक्यात लख्ख प्रकाश पडला. सरांचा पिरियड होऊन ते बाहेर गेले तसा मी प्लॅटफॉर्मवर चढलो अन ओरडलो आय गॉट इट. सगळे ओरडले, काय तो शब्द काय आहे? तो शब्द? मी म्हणालो अरे ते इंग्रजीत विषय शिकवता शिकवता मध्येच मराठीचं ‘मंजे’ म्हणतात. आपण मराठीत म्हणजे म्हणतो तेच ते-म्हणजे.” मग सगळ्या वर्गात मोठा हशा पिकला. आमचे हेच प्राध्यापक मित्र विषयात खूप तज्ञ होते. मन लावून शिकवायचे. पण इंग्रजी चांगलं बोलायचे नाही. बऱ्याच वेळा चुकीचे इंग्रजी शब्द वापरायचे. त्यामुळे विनोद निर्माण व्हायचा. ते नेहमी कुणाचं अभिनंदन करताना, काँग्रॅच्युलेशन फ्रॉम माय इनर्ट हार्ट,असं म्हणायचे.. त्यांना इनर हार्ट,म्हणजे अंतकरणापासून , असं म्हणायचं असायचं पण ते इनर च्या ऐवजी इनर्ट असं म्हणायचे. खरं म्हणजे त्या इनरचीही गरज नाही. पण तेही न म्हणता त्याला ते असं करायचे, त्यामुळे त्यांना जो अभिप्रेत होता त्याच्या अगदी विरुद्ध अर्थ ध्वनीत व्हायचा. कोणाच्या आईचा किंवा वडिलांचा मृत्यू झाला असेल किंवा कोणी वारलं असेल तर ‘ तू त्यांच्याकडे क्रिमेशन ला जाणार आहेस का, असं विचारण्याऐवजी तू त्यांच्याकडे क्रिमिनेशन ला जाणार आहे का असं ते विचारायचे. एकदा तर त्यांनी एक क्लासिक इंग्रजी विनोदच घडवला. आमच्या विभागात एक सीनियर लेक्चरर होते. ते खूप हुशार होते. विद्यार्थीप्रिय होते. पण बरीच वर्षे त्यांचं वरच्या पोस्टवर म्हणजे असोसिएट प्रोफेसर म्हणून प्रमोशन झालं नाही. शेवटी एक दिवस

विभागाकडून त्यांच्या प्रमोशनची ऑर्डर आली. सर्वांनी त्यांचं अभिनंदन केलं. आमचे वर उल्लेख केलेले प्राध्यापक जेव्हा अभिनंदन करायला गेले तेव्हा ते म्हणाले “कॉंग्रॅच्युलेशन्स. द लॉंग स्टॅंडिंग इनजस्टीस मेड ऑन यू , इज फायनली जस्टिफाइड.” आणि ते ऐकून आम्हा सगळ्यांना एकदम हसू आलं. फिषपोंड मध्ये विद्यार्थी अशा बऱ्याच नकला करायचे आणि सांगायचे. मी औरंगाबाद इंजिनिअरिंग कॉलेजचा प्राचार्य असताना मला विद्यार्थ्यांचा इंग्लिश चा एक नमुनाही एकदा वाचायला मिळाला. एक दिवस एक फायनल इयर चा विद्यार्थी माझ्या केबिन मध्ये आला. हातातला अर्ज माझ्या टेबलावर ठेवला.मी तो वाचला. त्यात लिहिलं होतं “ टू द प्रिन्सिपल गव्हर्मेंट कॉलेज ऑफ इंजीनियरिंग औरंगाबाद, आणि पुढे लिहिलं होतं ‘सर आय वॉन्ट टू ईस्यू माय ट्रांसफर सर्टिफिकेट.’ मी म्हणालो यु वांट टू ईस्यू युवर ट्रांसफर सर्टिफिकेट? तो म्हणाला’येस सर.’ मी म्हणालो “देन ईस्यू इट. व्हाय यू हॅंव कम टू मी? मग त्याला वाटलं, काहीतरी गडबड झालेली दिसते. मी त्याला म्हटलं ‘तू फायनल यिअरला आहेस,अन अस इंग्लिश लिहितो?.जरा इंग्रजी वाचत जा. बोलत जा.इंग्रजी वर्तमानपत्र वाचायची सवय कर म्हणजे अशा चुका नेहमी नेहमी होणार नाहीत. असे अनेक मजेदार किस्से वर्गातले , आणि वर्गाबाहेर्चे माझ्या आठवणीत आहेत

# संस्कार आणि सवयी

साधारणत चाळीस-पंचेचाळीस वर्षापूर्वी मी एका दिवाळी अंकात पद्माकर डावरे यांची एक कथा वाचली होती. मला डावरे यांचं लिखाण खूप आवडतं. ती गोष्ट मला खूप आवडली. आज पर्यंत ती माझ्या लक्षात आहे. गोष्टीचं शीर्षक होतं’’संस्कार मन साहिना’ किंवा संहिता असावं. मला नक्की शब्द आठवत नाही; लेखकांनी ज्या भाषेत ते लिहिलं आहे त्याच भाषेत मी ते लिहितो आहे.त्यात लेखकांनी स्वतःला गोष्टीचा नायक केला आहे. ते म्हणतात “ मला मला चार मुली नंतर मुलगा झाला. आम्हा उभयतांना आणि सर्व कुटुंबाला फार आनंद झाला. हळूहळू आमचं बाळ मोठं व्हायला लागलं. आम्ही सर्व लाडानं त्याला बंड्या म्हणायचो. खरं म्हणजे चार मुली नंतर झालेला हा मुलगा. पण मला वाटतं मुलींचे लाड करण्याची आमच्या सौभाग्यवती ची बहुदा हौस न फिटल्यामुळे की सवयीप्रमाणे, आमची बायको बंड्याला मुली सारखंच वाढवायला लागली. त्याचे केस काय वाढवायची , त्याच्या वेण्या काय घालायची. इतकंच नाही तर बऱ्याच वेळा त्याला लाडानं, माझी बबडी ग, माझी छबडी ग असं म्हणायची. बंड्या भोवती दिवसभर चार बहिणींचा गराडा. त्यामुळे

हळूहळू तो ही मुलीसारखं बोलायला लागला , ' छे बाई ,मी नाही जाणार तिथे. इश्श्य, त्यात काय आहे एवढं हसण्यासारखं? मी येणार नाही तिथे सांगून ठेवते.' इत्यादी इत्यादी. बंड्याच्या ह्या बायकी वागण्या-बोलण्यात मी त्रस्त झालो. त्याला समजावून, दरडावून सांगितलं की असं मुलीसारखं बोलायचं नाही. मी कसा बोलतो, असं पुरुषासारखा बोल. पण त्याच्यावर काही परिणाम होईना. काय उपाय करावा मला काही कळत नव्हतं. बायकोला म्हटलं तर ती म्हणायची लहान आहे हो तो अजून. मोठा झाला की आपोआप बोलायला लागेल.तिला म्हटलं असा मोठा होत होत सहा वर्षाचा झाला की तो. माझ्या सुदैवानं एक चांगला योग आला. आमच्या बायकोचे मोठे भाऊ मिलिटरीत चांगल्या वरच्या हुद्द्यावर होते. त्यांनी बरेच वर्षानंतर पंधरा दिवसाची सुट्टी घेतली अन ते आमच्याकडे येणार होते. आम्ही त्यांना आग्रह करून आठ-दहा दिवस तरी आमच्याकडे रहा अशी विनंती केली, आणि त्यांनी ती मान्य केली. आम्ही त्यांना दादासाहेब म्हणायचो. ठरल्या दिवशी दादासाहेब आले. सकाळचा चहा नाश्ता झाला तेव्हा आम्ही सर्व मुले मुली बरोबरच नाश्त्याला बसलो, बंड्याला त्यांनी पहिल्यांदाच पाहिलं होतं. त्याचं ते कौतुक करायला लागले तसं मी त्यांना सांगितलं दादासाहेब, अहो हा तुमचा भाचा सारखा मुलीसारखं बोलत असतो. याला जरा सरळ करा हो. मग दादासाहेब म्हणाले 'तुम्ही काही काळजी करू नका. मी दहा दिवस ईथे आहे. त्याला सरळ करतो. फक्त रोज

एक तास दोन तास त्याला माझ्या ताब्यात द्या. मी म्हटलं आनंदानं. मग त्या दिवसापासून दादासाहेब बंड्याला घेऊन तास-दोन तास एका रूम मध्ये बसायचे. कधी त्याला खेळायला घेऊन जायचे, कधी फिरायला घेऊन जायचे. हा रोजचाच कार्यक्रम झाला होता. असे करता करता दादासाहेबांच्या परत जाण्याचा दिवस आला. जाताना ते मला म्हणाले ‘ बाळासाहेब काळजी करू नका. मी त्याला एकदम ठीक केलं आहे. बस एकदम ठीक हो गया वह, फिक्र मत करो. ‘ दादा साहेब गेले त्याच्या दुसऱ्या दिवशी मी दाढीचं सामान काढून दाढी करायला बसलो. मी म्हणालो बंड्या अरे मला दाढी करायची आहे, थोडं एका वाटीत पाणी आणून दे बरं. तसं बंड्या म्हणाला “ अरे ज्याव. हम तुम्हारे बापके नौकर नही है. ‘ मी ओरडलो “बंड्या गाढवा असं बोलतो काय?एक थोबाडात ठेवून देईन.” अरे छोडो यार. आम्ही काय मेलेल्या आईचे दूध प्यायलो नाही. “ बंड्या म्हणाला. मी कपाळावर हात मारून घेतला. दादासाहेबांनी त्याला खूपच ठीक केला होता.’ डावरे यांच्या कथेचा सार हा होता. शब्द मी माझे वापरलेत पण कथा अगदी त्यांची जशीच्या तशी दिलेली आहे. ती कथा फार मोठी आहे पण कथेतला हा भाग मला फार आवडला. कदाचित यालाच त्यांनी संस्कार मन साहिना असं म्हटलं असावं. हा शेवटचा साहिना होता की संहीता होता हे मात्र मला अजूनही गोंधळात टाकणारं आहे. पण सवय, संस्कारांचं हे असं असतं. निदान संस्कारक्षम वयात ते घडवले तर ते प्रभावी ठरतात असं

म्हणायला हरकत नाही. अशीच एक कथा मी प्राध्यापक द,मा. मीरासदारांची वाचलेली आहे. व्यंकूची शिकवणी. तीही मला खूप आवडली. ह्या व्यंकुची शिकवणी वरून आमच्या वर्गात एका प्राध्यापकाने सांगितलेला विनोद मला आठवला. एक मद्रासी माणूस व्यापार करण्यासाठी लंडनला जातो. तिथे त्याचा चांगला जम बसल्यानंतर तो त्याच्या बायकोला आणि मुलाला लंडनला घेऊन जातो व आपल्या कुटुंबासह पुढे तिथेच स्थायिक व्हायचं ठरवतो. अशा ठिकाणी राहायचे म्हणजे मुलालाही तिथल्या चांगल्या इंग्लिश स्कूलमध्ये टाकणं आलं. त्यांनी त्याला इंग्लिश स्कूलमध्ये टाकलं. मुलगा नियमित शाळेत जात असे. त्याचा अभ्यासही चांगला होता आणि प्रगती चांगली होती. पण ह्या व्यापार्याला सारखं वाटत असे की आपल्या मुलांला ह्या इंग्रजी लोकांसारखं इंग्रजी बोलता आलं पाहिजे. अगदी आपल्या मुलाचे उच्चार साहेबां सारखे आले पाहिजेत. मग त्यांनी चांगली विचारपूस केली आणि हे एक उत्तम इंग्रजी बोलणं शिकवणाऱ्या प्राध्यापकाची मुलाखत घेतली. त्यांना आपल्या मुलांची शिकवणी घ्यायची विनंती केली. त्याची फी द्यायचं कबूल केलं. मग रोज तो मुलगा त्या प्राध्यापकाच्या घरी एक तास शिकण्यासाठी जाऊ लागला. महिनाभरानंतर आपल्या मुलाची प्रगती काय झाली आहे याची विचारपूस आपण करून यावी असं त्या व्यापार्याला वाटलं म्हणून एक दिवस तो मद्रासी ग्रहस्थ एकटा त्या इंग्रजीच्या

प्राध्यापकांच्या घरी गेला. तो जेव्हा त्यांच्या घरी गेला तेव्हा त्यांचं दार उघडंच असावं. अन दाराकडे पाठ फिरवून तो प्राध्यापक काहीतरी वाचत असावा. या मद्रासी ला वाटलं आपण त्यांना विचारून घ्यायला पाहिजे. म्हणून तो नम्रपणे म्हणाला" मे आय कम इन सर? तो प्राध्यापक काही उत्तरला नाही म्हणून थोड्या जोरानं ग्रहस्थ परत म्हणाला " मे आय कम इन सर? " तरि तो त्याला काहीच उत्तर देईना. मग हा मद्रासी अगदी चिडून आपल्या खास मद्रासी टोन मध्ये म्हणाला " मे आय्य कम इन्न सर्र?' प्राध्यापक मागे वळला आणि म्हणाला "कमीन्न.अँन्ड डोंट शो मी युवर फेस्स अगेन्न.' अशी ही शिकवणी. थोडक्यात काय की ह्या संस्कारक्षम वयात संस्कार, तुम्ही मुलांवर घडवाल तसे घडून तशी तशी ती मुलं वाढत जातात. आपण खूप गंभीरपणे याचा विचार करीत नाही. मुलं लहान असताना खरं काय खोटं काय हे त्यांना माहीत नसतं. ते सगळं मोठ्या माणसांकडून शिकतात. अनेक वेळा देण्यात आलेलं एक उदाहरण म्हणजे, एक ग्रहस्थ आपल्या घरीच असतो. काही तरी काम करत असतो. बाजूला त्याचा लहान मुलगा खेळत असतो. घरात बायको ही काम करीत असते. एवढ्यात लँडलाईन फोन वाजतो. तो ग्रहस्त म्हणतो अग मी कामात आहे जरा फोन घे बरं. ती फोन उचलते. पलीकडून कोणीतरी ग्रहस्त देशपांडे आहेत का म्हणून विचारतो. बायको फोनच्या रिसिव्हर वर हात ठेवून नवऱ्याला विचारते,अहो कुलकर्णी आहेत तुम्ही आहात का म्हणून विचारत

आहेत. काय सांगू? तुम्ही म्हणता, सांग त्यांना घरी नाही म्हणून. हे सगळं संभाषण तो मुलगा ऐकत असतो, अन तो गोंधळून जातो की बाबा तर घरीच आहेत आणि फोनवर आई सांगते की ते घरी नाहीत म्हणून. अन मग इथून त्याचा खोटं बोलण्याचा पहिला धडा सुरू होतो. म्हणून मुलांना योग्य अन चांगल्या सवयी लावल्या पाहिजेत. चांगले संस्कार दिले पाहिजेत. असं म्हणतात की मुलानी हट्ट करून मागितलं,अन तुम्ही नाही दिलं तर तो थोडा वेळ रडेल. पण संस्कार दिले नाहीत तर तो आयुष्यभर रडत राहिल. संस्कार आणि सवयी यांचं जवळचं नातं आहे. बहुतांशी सवयी या संस्कारा पासूनच येतात. मला माझीच एक छोटीशी सवय सांगता येईल.मी कुठेही असलो, अगदी प्रवासात सुध्दा, तरी मी झोपताना देवाचं नाव घेऊन झोपतो. ही अगदी सवय झाली मला. एकही दिवस चुकत नाही. ह्या सवयीचा पाया संस्कारात आहे. मला आठवतं, मी बुलढाण्याला एडेड हायस्कूल मध्ये शिकायला आठव्या वर्गात गेलो. आठव्या वर्गात सायन्स हा विषय होता. तो आमच्या एक मॅडम शिकवायच्या. प्रमिलाताई देशपांडे. विषय तर छान शिकवायच्याच पण विषयाशिवायआम्हाला इतर अनेक गोष्टी सांगायच्या. जसं हस्ताक्षर, नीटनेटकेपणा याचे महत्त्व. त्यांनी वर्गात एकदा म्हटलं नेहमी चांगले विचार करावेत. झोपताना नेहमी परमेश्वराचं नाव घ्यावं. देवाचं नाव घेऊन झोपलं की अगदी शांत झोप येते. त्या दिवसापासून आज तागायत मी रात्री झोपताना रोज देवाचं नाव घेऊन झोपतो. सवयी आणि संस्कार यांचं

फार जवळचं नातं आहे. घरापासून संस्कारांची सुरुवात होते. मुलांची बौद्धिक वाढ ज्याला आपण मेंटल ग्रोथ म्हणतो ती सर्वथा प्राथमिक रित्या कुटुंबांच्या सदस्यांवर अवलंबून असते. विशेषता: आईबापांवर अन घरातल्या वातावरणावर. जाणते-अजाणतेपणी आपल्या आई-वडिलांचं आणि कुटुंबातल्या आणखी मोठ्या माणसांचं मुलं सारखं बोलणं चालणं ऐकत असतात. त्यांच्या चुकीच्या वर्तनाचा मुलांवर कायम परिणाम होत असतो. मुलांना मुळात प्रेम हवं असतं. आपण सुरक्षित आहोत, आपल्या पाठीशी कोणीतरी आहे अशी भावना आई-वडिलांनी मुलांच्या मनात रुजवली पाहिजे. साधं मुलांना जवळ घेऊन कुरवाळणं, मिठीत घेणं, त्यांना फार वेळ घरात एकटं न सोडणं या साध्या साध्या गोष्टी. त्या आपण पाळल्या पाहिजेत. त्या खूप परिणाम घडवू शकतात. आजकाल नवरा-बायको दोघंही नोकरी वर किंवा कामावर घराबाहेर पडतात. पण घरी जेवढा वेळ ती असतात, तेव्हा मुलं मोठी होईपर्यंत आपले वैयक्तिक छंद आवडी-निवडी ह्यांना प्राधान्य न देता त्यांनी जास्तीत जास्त वेळ मुलांना दिला पाहिजे. त्यांचा केवळ अभ्यासच घ्यायचा नाही तर त्यांच्याबरोबर बोलायचं, हसायचं, खेळायचं हे सर्व केलं पाहिजे. आमचे एक मित्र होते. त्यांचे वडील न्यायाधीश होते. आणि आई समाजकार्य करायची. हे मित्र आणि त्याची बायको दोघेही नोकरी करायचे. पण ते आम्हाला सांगायचे की व्यस्त असलो तरी आम्ही आमच्या मुलांना वेळ देतो. आमच्याकडे

एक अलिखित नियम आहे. रात्रीच्या जेवणाला सर्वांनी एकत्र बसलं पाहिजे. मग तिथे हसणं- बोलणं रुसवे-फुगवे सगळं काही होतं. असं काहीतरी किमान करता आलं पाहिजे. विशेषता नवरा-बायकोनी निदान मुलांसमोर तरी भांडू नये, वितंडवाद घालू नये. मुलांनी असं पाहिलं की त्यांना अतिशय असह्य अन् असुरक्षित वाटतं. त्यामुळे कटाक्षानं हे टाळलं पाहिजे. शिस्त ही जीवनातली अत्यावश्यक सवय आणि संस्कार आहे. त्यामुळे ती लहानपणापासून आपल्या मुलांना लावली पाहिजे. अगदी सकाळी उठल्याबरोबर आपलं अंथरूण, पांघरूण घडी करून ठेवणं इथून सुरुवात झाली पाहिजे. हळू हळू हे इतकं अंगवळणी पडलं पाहिजे ही स्वतःचं होमवर्क, स्वत: करणं, आपली शाळेची तयारी डबा पाणी घेणं, बुट आणि सॉक्स काढून ठेवणं हे मुलांनी स्वतःच करावं. अशी सवय त्यांना लावली पाहिजे. आल्यानंतर परत सगळं जागच्या जागी ठेवणं, ही पण शिस्त लावली पाहिजे. चूक झाली की त्याची शिक्षा तेव्हाची तेव्हाच झाली पाहिजे. तरच परिणाम होतो. त्यांना स्वावलंबी आणि इंडिपेंडंट बनवलं पाहिजे. मुलांना शिस्त लावताना जे सांगायचं ते चारचौघांसमोर न सांगता त्यांना एकट्यात सांगावं. ते जास्त परिणामकारक होतं. आपण घराचे नियम पाळतो व पाळावे असे ठरवतो त्याच्या मागची कारणं मुलांना समजावून सांगितली पाहिजे. आणि शिक्षा करताना जर नियम तोडले तरच ती करावी. आपलं ऐकलं नाही म्हणून करू नये. उदाहरणार्थ, खूप उन्हात मुलगा बाहेर

जायला लागला तर आपण त्याला कानाला दुपट्टा बांधून जा असं सांगतो पण त्याला तसं बंधणं आवडत नाही. मग तो तसाच बाहेर जातो. आता खरं म्हणजे त्यानं अवज्ञा केली, आपलं ऐकलं नाही. पण अशावेळी त्यानं काही नियम तोडला नाहीये. म्हणून त्याला शिक्षा करू नये. कारण बाहेर त्याला उन्हाचे चटके बसणारच. तेव्हा त्याला आपोआप शिक्षा मिळेलच. ही फक्त संस्कार आणि सवयी लावण्याची, घडवण्याची थोडी प्रस्तावना आहे. अशा अनेक गोष्टीची चर्चा करता येईल. अनेक गुणांचं मोठं भांडारच आहे ते. सगळेच मुलांना देता येतील असं शक्य नाही पण त्यापैकी बरेच कुटुंबात, शाळेत, महाविद्यालयात, समाजात त्याला देता येतिल. त्या त्या वयात आणि त्या त्या ठिकाणी त्यावर प्रामाणिक प्रयत्न झाले पाहिजेत. त्यामुळे मुलांचा सर्वांगिण विकास चांगल्या रीतीने होईल.

# शो द मस्ट गो ऑन

शनिवार दिनांक 8 नोव्हेंबर 2014 ला माझ्या बायकोचं हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झालं. त्यावेळी आम्ही अमरावतीच्या डॉक्टर अविनाश चौधरी यांच्या डायलिसिस सेंटर मध्येच होतो. दर शनिवारी नऊ ते एक वाजेपर्यंत आठवड्यातून एकदा आम्ही तिचं डायलिसिस करायचो. आणि पुढचे सहा दिवस अगदी ती नॉर्मल माणसासारखी असायची. घरची बाहेरची सर्व काम करायची.

खरं म्हणजे माझी पत्नी प्रेमलता, हिला जन्मापासून डावी किडनीच नव्हती. आणि आम्हाला ते गेल्या आठ वर्षापूर्वी मंजे ती 58 वर्षाची झाल्यावर कळळं. त्यावेळी मी नागपूर रायसोनी इंजिनिअरिंग कॉलेजचा प्राचार्य होतो. काहीतरी वेगळ्या कारणाने तिच्या पायावर सूज आली. डॉक्टरांनी आम्हाला विविध चाचण्या करायला सांगितल्या. या अंतर्गत सोनोग्राफी केल्यानंतर आम्हाला हे कळलं. मग आम्ही नागपूरच्या नेफरोलॉजिस्ट डॉक्टर आचार्य यांची चार महिने ट्रीटमेंट घेतली कारण उजवी आणि एकुलती एक किडनी थोडी सांसर्गिक झाली होती. आमचे चेअरमन रायसोनी यांना खरं कारण सांगून त्यांची मनधरणी करून मी एप्रिल

दोन 2006 ला नागपूर सोडून आपल्या स्वग्रामी, स्वगृही अमरावतीला आलो. माझे भाऊ, बहीण तिचे भाऊ, बहीण , पुतणे- भाचे असा मोठा परिवार अमरावतीला आहे. आणि ह्या सगळ्या गोतावळ्यात ती रममाण होईल हा माझा उद्देश होता.

मे 2006 पासून ते आठ नोव्हेंबर 2014 पर्यंत डॉक्टर अविनाश चौधरींकडे आम्ही दर दोन महिन्यांनी तिच्या सर्व रक्त चाचण्यांचे रिपोर्ट घेऊन जायचो. तिची डॉक्टर अविनाश चौधरीं वर मनापासून श्रद्धा होती, आणि योगायोग बघा डॉक्टर चौधरींच्या दवाखान्यातच तिचं डायलिसिस व्यवस्थित चालू असताना, दहा वाजेपर्यंत ती पेपर वाचत असताना, दोन मिनिटात तिला मासिव्ह कार्डिऍक अटॅक आला. आमच्या सुदैवाने डॉक्टर खालच्या मजल्यावर होते’ चार मिनिटात धावत वर आले. जे करायचं ते त्यांनी शेवटपर्यंत केलं.पण तिचा प्राण गेला.वेळ टळत नाही म्हणतात पडल्यापडल्या घरच्या अंथूरणात शांत झोपेत असलेल्या माणसालाही कायमची झोप येते.

तिच्या मृत्यूनंतर घरात नातेवाईक, ईस्ट मित्रांची, सांतवन देण्यासाठी गर्दी होती. तिला कधी न आवडणारे कर्मकांड ही चालू होते. माझं दुःख गोंजारायला ही मला वेळ नव्हता. निदान दिवसा तरी.पण रात्र माझी असायची. मी रात्री दोन वाजता उठून बसायचो, आणि गेल्या 45 वर्षाचा

जीवन पटल माझ्या डोळ्यासमोरुन सरकू लागायचा. त्याला, आज, मला एकांत मिळाल्यानंतर शब्दरूप देतो आहे.

पंचेचाळीस वर्षापूर्वी माझं प्रेम शी लग्न झालं. तिचं नाव प्रेमलता म्हणून मी तिला नेहमी प्रेम या नावाने हाक मारायचो. खरं म्हणजे आमचं लग्न ठरल्यानंतर काही अपरिहार्य कारणामुळे,मुहूर्त नसल्यामुळे आमचं लग्न 14 महिन्यांनी झालं. ह्या 14 महिन्यात आम्ही एकमेकांना साठ पत्रं लिहिली. ती तारीख वार लावून तिची एक फाइल मी करून ठेवली. ती अजून माझ्याकडे आहे. म्हणजे आमचं हे लग्न ठरवून केलेलं प्रेम. लोक प्रेम करून मग लग्न ठरतात.

लग्नानंतरच्या पहिल्या दिवस- रात्रीपासून आम्ही एकमेकांना चांगलेच परिचित होतो. खरं म्हणजे ह्या चौदा महिन्यात आर्वी ते अमरावती हे फक्त साठ किलोमीटर अंतर असूनही आम्ही फक्त एकदाच भेटलो. अमरावतीला.तेही माझी साळी शांता ही बरोबर असताना. आम्ही तिघांनी चोरून त्या रात्री अमरावतीच्या चित्रा टॉकीज मध्ये हमराज हा सिनेमा पाहिला. तेवढीच प्रत्यक्ष भेट. लग्नानंतर 1969 च्या डिसेंबरच्या महिन्यात आम्ही रुक्मिणी नगरातल्या एका अडीच खोल्यांच्या घरात आमचा छोटासा संसार मांडला. माझी आई बरोबर होती. तिला प्रेमचं भारी कौतुक. प्रेम नं ही आपल्या जन्मदात्या आईवर प्रेम केलं नसेल इतकं प्रेम माझ्या आईवर केलं. माझी आई अगदी जिवंत असे पर्यंत. प्रेमचा मोहक आणि

मनमिळावू स्वभाव अस्ल्यान तिने माझे भाऊ-बहिणी, पुतणे,भाचे ,भाच्यांच्या बायका ह्या माझ्या सर्व नातेवाईकांना आपलंसं करून घेतलं. ही सर्व मंडळी तिची अगोदर,आणि नंतर माझी आठवण करायचे. इतक्या अल्पशा अवधित आपल्या सासरच्या माणसांना स्विकारून, आपलं माहेर ती विसरली होती.

माझा दुसरा मोठा परिवार म्हणजे माझ्या मित्रांचा अन माझ्या विद्यार्थ्यांचा. त्यांचं आदरातिथ्य करून त्यांच्याशी तासन-तास गप्पा मारणं हा तिचा आवडीचा कार्यक्रम. 14 नोव्हेंबर च्या दैनिक हिंदुस्थानात माझे विद्यार्थी प्राध्यापक डॉक्टर आशिष महल्ले यांच्या तिच्याबद्दल आलेल्या लेखातलं अक्षर न् अक्षर सत्य आहे. माझ्या 40 वर्षांच्या कारकिर्दीत माझ्या अनेक बदल्या झाल्या. मी जवळ जवळ तेरा घर बदली.पण हे सगळं करताना बांधबुंध करताना सामानाचा एकही खोका मी पॅक केल्याचं मला आठवत नाही. सगळं ती करायची. घरच्या थोड्याशा ही कामाला ती मला हात लावून द्यायची नाही. त्यामुळे घरात रोजच्या चहापाण्यासाठी लागणारा साखरेचा डब्बा सुद्धा कुठे ठेवलेला असतो हे आता आता पर्यंत मला माहित नव्हतं. गेल्या वर्षापासून, तिची किडनी जवळजवळ डॅमेज झाल्यापासून संध्याकाळचा चहा मी करायचो, कधीकधी कपडे वाळू घालायला मदत करायचो. तर तेही तिला आवडत नसे. माझी मोठी बहीण गावातच असते. तिची बहीण,धाक्टभाऊ दिनेश घरी वारंवार यायचे’

त्यांच्याजवळ म्हणायची’ हे अशी घरची कामं करतात ते मला मुळीच आवडत नाही. माझ्यानं होईल तसं मी करेन.’ बरं ह्या सर्वांशी ती प्रत्यक्ष किंवा फोनवर बोलत असायची. दिनेशची (तो ही आता साठ वर्षांचा आहे) तर दिवसातून किमान एक चक्कर आमच्या घरी झालीच पाहिजे. आणि मग आला की किमान एक तास तरी ते भाऊ-बहिण बोलत बसायचे. मला बऱ्याच वेळा वाटायचं की हे भाऊ-बहीण रोज तासभर काय बोलतात. कशावर बोलत असतील. माझ्या बहिणीशी किंवा तिच्या धाकट्या बहिणीशी तसंच तासभर गप्पा. माझ्या मुलीचा, प्राचीचा, दिवसातून दोन वेळा तरी नाशिक वरून फोन यायचा. दर वेळी त्यांचं तीस तीस मिनिटे बोलणं सुरू असायचं.

माझ्या जीवनाचा ती अविभाज्य अंग होती. माझं दुसरं मनच. कधीही कुठेही मग ते ऑफिसमध्ये असो बाजारात असो, ट्रेनमध्ये असो, कुठेही काही मला आडलं, मी द्विधा मनस्थितीत असलो आणि आता काय करावं असं वाटलं की मी तिला फोन करायचो. प्रेम ऐसा ऐसा है. क्या करू? मग ती मला तिचा सल्ला द्यायची.

मला आठवतं, मी बॉम्बे आय.आय.टी.तून 1977 ला एम.टेक केलं. त्यानंतर, पीएच.डी. साठी प्रेम एक सारखी माझ्या मागे लागली. ;तिच्या आग्रहामुळे मी सतत तिन वर्ष पीएच.डी. साठी अर्ज केला आणि तिन्ही वर्षी मी आय.आय.टी.त सिलेक्ट झालो. पण सरकारने मला डेप्युटेशन दिलं

नाही. चौथ्यांदा तर मी अर्जच करणार नव्हतो.पण तिनी सारखा तगादा लावल्यामुळे मी डिसेंबर 1980 मध्ये अर्ज केला. मार्च 1981 ला मुलाखत झाली. आणि नेहमीप्रमाणे मी परत चौथ्यांदा सिलेक्ट झालो. जून मध्ये सरकारचं स्पॉन्सर शिप लेटर आय.आय.टी. बॉम्बेला द्यायचं होतं. ह्यावेळी मात्र काहीही आढेवेढे न घेता आमच्या संचालनालयाने, मंत्रालयानं मला डेप्युट करण्याचं पत्र दिलं. घरी औरंगाबादला परत आलो तर प्रेम चा आनंद ओसंडत नव्हता. म्हणाली'मैने बोला नही था, ईसबार हो जायेगा. ' पुढे जुलैत आय आय टी ची फी भरायला गेलो. दोन दिवस वणवण भटकून एखादं छोटसं घर मिळतं का, याचा शोध घेतला. मिळालं नाही. हाताश होऊन औरंगाबादला परत आलो. तेव्हा मी औरंगाबाद इंजिनिअरिंग कॉलेज हॉस्टेलचा वार्डन होतो व वार्डन च्या कॉन्टर मध्येच राहत होतो. घरी हिला म्हणालो ", कसं करायचं? मी कसा जाऊ? मुलगा लोअर केजी ला. मुलगी चौथ्या वर्गात. हे वॉर्डन्स कॉर्टर एक दोन महिन्यात सोडावं लागणार. मग तुमचं काय?" प्रेमनं मला प्रचंड धीर दिला. अनेक ऑप्शन्स दिले.म्हणाली "आम्ही काढू कसे चार सहा महिने. तुम्हाला मुंबईला राहायला जागा मिळाली की आम्ही येऊ तिकडे. नाहीतर मी मुलांना घेऊन सहा महिने अमरावतीला जाते. तिथे सगळे नातेवाईक आहेत. होईल व्यवस्था. पण तुम्ही ही संधी दवडू नका." एक दिवस आमचे प्राचार्य शहा साहेब घरी आले. ते आले, तसं चहा पाणी झाल्यानंतर हिनं त्यांना सगळं

सांगितलं. शहा सर म्हणाले" यु मस्ट गो फॉर युवर पीएच.डी.आय विल नॉट आस्क मिसेस जाजू टू व्ह्केट कॉर्टर टिल यु गेट फॅमिली अकोमडेशन ईन आय.आय.टी. बॉम्बे." ही म्हणाली 'आता झालं? आता न जाण्याचा विचार डोक्यातून काढून टाका. पण पहा देवाची अनंत कृपा. आठ दिवसातच बॉम्बे आय.आय.टी.हून माझा मित्र तिडके याचा टेलिग्राम आला. मला आय आय टी त एक वन रूम किचन अकॉम्डिशन मिळालं. मग आम्ही सर्व आय.आय.टीत शिफ्ट झालो. परमेश्वर कृपेने मला दोन-तिन महिन्यातच मोठं कॉर्टर मिळालं.मी तीन वर्षात माझा थेसीस सबमिट केला. तीन वर्ष रोज सकाळी नऊ वाजेपासून ते रात्री अकरा वाजेपर्यंत मी आय आय टीत असायचो.फक्त दुपारी एक ते दोन वाजेच्या दरम्यान जेवायला यायचो अन संध्याकाळी सात ते साडे सात एवढाच, मी घरी असायचो. माझा सर्व संसार ,मुलं, मुलांचे शिक्षण सर्व सर्व तिनं सांभाळलं.

My getting Ph.D.,chenged the entire course of my life,,which made me reach great heights of my career.I earned great respect and love of thousands of my students.I owe a lot and all to my wife Prem. ह्या सर्व आणि अशा अनेक सुख दुःखाच्या प्रसंगी गेली 45 वर्ष तिने मला यतार्थ साथ दिली. मला असणाऱ्या छंदांचं कौतुक केलं. त्यांना जोपासून मला मनापासून प्रोत्साहन दिलं. खरं म्हणजे, माझे छंद म्हणजे तिच्या सवती. 5-5 तास नाटकांच्या

तालमी घेणं, शनिवार-रविवार तासन तास ब्रिज खेळणं, कविता लिहित बसणं, अनेक विद्यालय मध्ये टेक्निकल- सेमी टेक्निकल टॉक्स ला जाणं, ह्या सर्व तिच्या- माझ्यातल्या वेळ चोरणाऱ्या गोष्टी. पण जर मी एखाद्या टॉक वरून परत आलो की कैसा रहा तुम्हारा लेक्चर, असं विचारून ती माझं कौतुकच करायची. माझी नाटकं पाहायला यायची. मी अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे जवळजवळ दहा वर्ष दहा नाटकं दिग्दर्शित केली. अन चार महाविद्यालयांचा मी प्राचार्य असताना आलेल्या अनेक गुंतागुंतीच्या , संकटाच्या प्रसंगी मला धीर द्यायची. सल्ला द्यायची. नेहमी म्हणायची 'आपलं बरोबर आहे ना? आपला उद्देश चांगला आहे ना?मग गजानन महाराज तुमचं काही वाईट होऊ देणार नाहीत.

आता आता एक किडनी असल्याचे माहीत झाल्यानंतर ती उत्साहानं माझ्याबरोबर सत्तर दिवस मुलाकडे अमेरिकेत शिकागोला, विस-पंचवीस दिवस मुलीकडे लंडनला, केसरी टूर बरोबर सिंगापूर मलेशिया थायलंड ला मजेत फिरून आली. मला नेहमी म्हणायची " काय का विचार करते रहते हो? अपनी सूरत आईने मे देखो. मै बिमार हू यह मेरी नही तुम्हारे सूरत पर से लोगो को समजता है. जो होगा होगा. भगवान मुझे ऐसी मौत दे की किसी को भी मेरा कुछ न करना पडे." 15 नोव्हेंबर 2014 च्या दैनिक हिंदुस्तानात माझा पीएच. डी. चा विद्यार्थी, जो आता एल आय टी नागपूर मध्ये असोसिएट प्रोफेसर आहे, डॉक्टर आशिष महल्ले, याचा लेख आला.

तो लेख कैलास वासी प्रेम बद्दल सगळं सांगून जातो. माझ्या अफाट मित्र परिवाराच्या, विद्यार्थ्यांच्या माझ्या सर्व नातेवाईकाच्या मनात तिनं तिच्या विलोभनीय व्यक्तिमत्त्वानं, प्रेमाच्या आणि मायेच्या भावनेनं, आदराचं स्थान मिळवलं होतं. यातले बरेच जण तर माझ्यापेक्षा तिला जवळची मानायचे. मनमोकळेपणाने गप्पा करायचे. मी 71 वर्षाचा आहे. माझ्या पिढीतल्या नवरा बायकोच्या जोड्या म्हणजे एकमेकांचं अविभाज्य अंग.' क्षणाक्षणाला एकमेकांची गरज भासणार्या, सुख दु:ख वाटून घेणाऱ्या ह्या जोड्या फुटल्या की काय होतं हे आता मला जाणवतं आहे, पुढेही ते तिव्रतेनं जाणवणार आहे.

माझी मुलगी प्राची अन जावई नितीन, माझा मुलगा पराग आणि सून रचना ह्या अतिशय चांगल्या संस्कारात वाढलेल्या मुलं मुली आहेत. एखाद्या पोरक्या पोराची काळजी घ्यावी तशी माझी मुलं माझी काळजी घेत आहेत;. पण क्षणाक्षणाचा तिचा सहवास, तिचं आजूबाजूला असलेले अस्तित्व कोणीही भरून काढू शकणार नाही.

आर्किटेक्ट तुळजापूरकरांचं, जे माझे मित्र होते, दोन तिन महिन्यापूर्वी असचं अकस्मात निधन झालं. इतकं प्रसन्न व्यक्तिमत्त्व , सर्वांना आवडणारा नुसता आर्किटेक्टच नाही तर साहित्यिकही, अकस्मात सर्वांना सोडून गेला. रोज सकाळी तुळजापूरकर वहिनी फिरायला जातात. मी ही जात असतो. केव्हाकेव्हा समोरासमोर आलो तर आम्ही एकमेकांना नमस्कार चमत्कार

करतो. पण तुळजापूरकर वारल्यापासून, वहिनींच्या समोर उभा करायची माझी हिम्मत झाली नाही. प्रेम वारल्यानंतर च्या दहाव्या दिवशी सकाळी फिरायला गेलो असताना तुळजापूरकर वहिनी आणि मी समोरासमोर आलो. माझी बायको वारली हे त्यांना माहीत होतं. समोरासमोर आल्याबरोबर आमचे दोघांचे हात वर आकाशाकडे गेले. मनातल्या मनात दोघेही म्हणत होतो परमेश्वराची इच्छा. मी माझा उजवा हात त्यांच्या माझ्याकडे, तुझं माझं म्हणतात असा फिरवला. तोंडाने एक शब्दही दोघे बोललो नाही. निशब्द. मी मनात मात्र म्हणालो वहिनी तुम्ही माझ्यापेक्षा पाच-सहा वर्षांनी लहान असाल पण तुमचं दुःख माझ्यापेक्षा फार मोठे आहे. परत जायला वहिनी जेव्हा वळल्या तेव्हा जाताना एकच वाक्य बोलल्या-

" पण सर, द शो मस्ट गो ऑन". मी मनात म्हटलं हो मॅडम, The show must go on, and it will go on..I assure you and all that I will fight it out and see that it will not be a flop show.

# अस ही होऊ शकतं

2008 च्या ऑगस्ट महिन्यात अमेरिकेतील फ्लोरिडा स्टेट मधील जॅक्सन व्हॅली येथे मेकॅनिकल इंजिनिअरिंग मधल्या सहा विषयांवर एक मोठी जागतिक कॉन्फरन्स होणार होती. त्या कॉन्फरन्स मधिल हीट ट्रान्सफर या विषयासाठी मी व माझ्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. केलेला डॉक्टर आशिश महल्ले, हा विद्यार्थी, दोघांनी मिळून एक शोधप्रबंध पाठवला होता. त्यांच्या स्क्रुटीनी कमिटीने तो पेपर स्वीकारला अन आम्हाला तो प्रेझेंट करण्यासाठी अमेरिकेला बोलावलं. नेमका त्याच वेळी माझा मुलगा इन्फोसिसच्या एका प्रोजेक्टसाठी दोन वर्षासाठी शिकागोला गेलेला होता. त्याची बायको आणि मुलगाही बरोबर होता. मग मी विचार केला आणि तसा मी माझ्या बायकोला म्हणालो की कॉन्फरन्सच ही आपलं काम होईल आणि मुलाकडे आपल्याला अमेरिकेला जाऊन दोन-तीन महिने राहता येईल. कॉन्फरन्स जॅक्सन व्हॅलिला पाच ते आठ ऑगस्ट 2008ला होती. आम्ही विचार केला की चला या निमित्तानं मुलाकडे राहू. आणि नातवालाही पाहता येईल. मग आम्ही एक जुलैलाच शिकागोला पोहोचलो. तिथे मुलांनं माझा प्रोग्राम ठरवून टाकला होता. त्यांनं आधीच कॉन्फरन्स

ची रजिस्ट्रेशन फीस भरून ज्या हयात हॉटेलमध्ये कॉन्फरन्स होणार होती त्याच हॉटेलमध्ये माझी रूमही बुक करून ठेवली होती. मग त्यांनं आमच्या सर्वांची म्हणजे मी सौभाग्यवती, ती दोघं आणि नातू ह्यांची एक ते चार ऑगस्ट या कालावधीसाठी ओरलांडो ची ट्रिप ठरवली. ओरलंडोला,डीस्नेवल्ड , युनिव्हर्सल स्टुडिओ,सी वर्ल्ड असं बरंच काही पाहण्यासारखं आहे. ओरलंडो हून 4 ऑगस्टला मी पुढे बसने जॅक्सन व्हेली ला जायचं( हे अंतर 140 मैला चं होतं) व बाकीच्यांनी शिकागोला परत यायचं असं ठरवलं. तसं त्यानं 8 ऑगस्टचं माझं जॅक्सन व्हँली ते शिकागो असं परतीचं विमानाचं तिकीटही करून ठेवलं. ती फ्लाइट संध्याकाळी सहाची होती. आणि शिकागोला दोन तासानं पोहोचणार होती. आमच्या ठरल्याप्रमाणे ओरलंडोला कार्यक्रम झाल्यावर मी बस नं संध्याकाळी पाच वाजता तिथून निघालो. बरोबर सव्वा सात वाजता जॅकसन व्हॅली ला पोहोचलो. बस स्टेशन पासून हयात हॉटेल जवळच होतं. पाईच चालत गेलो, कारण माझ्याजवळ स्टोलरची चाकाची सूटकेस होती. बुकिंग अगोदरच होतं म्हणून लवकरच मला माझी रूम मिळाली..प्रचंड मोठं हॉटेल होतं ते. सतराव्या मजल्यावर मला रूम मिळाली. सुदैवानं त्या सतराव्या मजल्यावर आणि सोळाव्या मजल्यावरच सहा मोठ्या हॉलमध्ये आमची कॉन्फरन्स होणार होती. पोचलो तसाच रूम मध्ये फ्रेश होऊन वेलकम डिनरला गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजताच कॉन्फरन्स चं उद्घाटन

होतं. डेप्युटी चेअरमन ऑफ एनर्जी कमिशन ह्या उद्घाटनाच्या प्रमुख पाहुण्या होत्या. बरोबर नऊ वाजता सर्व हॉलमध्ये आलेल्या प्रतिनिधींसमोर अवघ्या तीन मिनिटात प्रमुख पाहुण्यांचं एक गुच्छ देऊन स्वागत करून,परीचय करूनही झाला. आपल्या कडल्यासारखं, पाच दहा जणांना हार- बुके, दहा जण स्टेजवर, मग त्यातल्या पाच सात जणांची संबंधित असंबंधित भाषणं असा काहीच प्रकार नाही. फक्त तीन मिनिटात सगळं आटोपल्यावर त्या बाईने आपलं भाषण सुरू केलं. अन बरोबर दहा वाजता संपवलं. परत एका मिनिटात आभार. आणि नंतर विस मिनिटांचा ब्रेक झाला. टी ब्रेक नंतर चार वेगवेगळ्या हॉलमध्ये आमचे चार वेगवेगल्या विषयांवरचे टेक्निकल सेशन्स सुरू झाले. चार दिवस भरगच्च प्रेझेंटेशन झाली. चौथ्या दिवशी माझी संध्याकाळी सहाची फ्लाइट असल्याने मी साडेतीन वाजताच हॉटेल सोडून एअरपोर्टवर जाणार होतो. मी स्वागत कक्षा वर म्हणजे हॉटेलच्या रिसेप्शनवर तशी नोंद करून ठेवली होती व मला त्यादिवशी तीन वाजताच टॅक्सी बोलून द्यायला सांगून ठेवलं होतं. सगळं कॉम्प्युटर मध्ये एंटर केलेलं होतं. एवढं मोठं जगभर चेन असलेलं हयात हॉटेल होतं ते. तिथे सगळं टाईम टू टाईम चाललेलं. अत्यंत शिस्तबद्ध. पण अशा ठिकाणीही असं काहीतरी होऊ शकतं याची आपण कल्पनाही केलेली नसते. काय झालं, शेवटच्या, चौथ्या दिवशी आमची कॉन्फरन्स दुपारी तिन ला संपणार होती. सकाळी 9 लाच रोजच्यासारखी सुरू होणार होती म्हणून मी तिसऱ्या दिवशी रात्रीच

सामानाची थोडी आवराआवर करून ठेवली होती.सकाळी उठलो, सर्व आटोपून तयार झालो. सोबत कॉन्फरन्सला एक पाऊच म्हणजे छोटी पर्सच म्ह्णाना, फक्त, मला न्यायचा होता.परत तिन वाजता आल्यावर घाई गर्दी होऊ नये म्हणून मी माझं पाऊच सोडून सर्व सामान सुटकेसमध्ये भरलं आणि तिला लॉक केलं. उद्देश असा की तीन वाजता आल्याबरोबर सूटकेस उचलली की चालले. गडबड नको. आणि बरोबर नऊला आमच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये गेलो. रूम लॉक करून घेतली. अकरा वाजता पहिला टी ब्रेक झाला तेव्हा मला आठवलं की आपण आपली सकाळची बी पी ची गोळी घेतलीच नाही. ती रूम मध्ये सुटकेसमध्ये होती. त्याच मजल्यावर माझी रूम होती म्हणून मी गोळी घेण्यासाठी रूम मध्ये गेलो. लॉक उघडून पाहतो तर रूम मध्ये माझी सुटकेस नाही. गायब. सगळं पाहिलं. पलंगाखाली.सोफ्या खाली. बाथरूम मध्ये. पण पत्ता नाही. मी घाबरलोच. तरी बरं ,सर्व पैसे आणि पासपोर्ट माझ्या जवळच्या पाऊस मध्येच होते. ( तसं मी नेहमीच करतो. मी जवळ जवळ अकरा देश फिरलो आहे. पण प्रत्येक ठिकाणी मी माझा पासपोर्ट आणि पैसे माझ्या अंगावरच्या पाऊच मध्येच ठेवतो.) आता काय करायचं म्हणून ताबडतोब खाली रिसेप्शन काऊंटरवर गेलो व त्यांना सांगितलं. ते म्हणाले रूम क्लीन करायला जी लेडी येते तिनं ठेवली असेल, ती तिथेच विंगमध्ये दुसऱ्या कुठल्या खोलीत काम करत असेल.जस्ट चेक. अँड अवर अटेंडंट विल कम इन फाईव्ह

मिनिट्स. मला कुठे दम, मी परत लीफ्टनं सतराव्या मजल्यावर गेलो. परत एकदा रूम उघडून पाहिली. बाहेर येऊन कॉरिडॉरमध्ये पाहिलं तर एका रूम समोर काही सॅनिटरी मटेरियल दिसलं. मी तिथे जाऊन उभा राहिलो. सुदैवानं एक आफ्रिकन बाई हातात झाडू बाटल्या घेऊन बाहेर पडली. हीच ती क्लिनर किंवा स्विपर असावी असं समजून मी तिला इंग्रजीत माझा रूम नंबर सांगून माझ्या सुटकेस बद्दल विचारलं.. ह्या स्विपर लोकांकडे एक मास्टर की असते.त्या बाईंनी त्या की नी रूम उघडून माझी रूम साफसफाई करून ठेवली होती. मी जेव्हा तिला माझ्या सुटकेस बद्दल विचारलं, तिनं कपाळाला हात लावला अन म्हणाली अरे तुमची सुटकेस? तुम्ही अजून इथेच आहात काय? गेला नाहीत? मला वाटलं सगळी पॅक केलेली सूटकेस तुम्ही विसरलात आणि निघून गेलात, म्हणून मी आत्ताच तुमची सुटकेस खाली सिक्युरिटी मध्ये देऊन आले. मी म्हटलं 'आय ऑल रेडी नोटेड ऑन रिसेप्शन माय चेक आउट टाईम. तिची चूक झाली होती. तिनं,जास्तीचा कारभार करून ठेवला होता. मग ती घाईघाईनं मला सिक्युरिटी ऑफिस मध्ये घेऊन गेली. तिथल्या ऑफिसरनं नुकतच माझ्या सुटकेसच लॉक उघडून त्यातील एकेका सामानाची, कपड्यांची यादी करायला सुरुवात केली होती. ती बाई त्या सिक्युरिटी ऑफिसरला म्हणाली"आय एम सॉरी. लगेज बीलॉन्ग्ज टू धिस जंतलमन. त्या बाईनं पुन्हा पुन्हा माझी माफी मागितली.सर्व सामानासह माझी सुटकेस मला दिली. मी तक्रार केली

असती तर त्या बाईची नोकरी गेली असती पण मला तसं काहीच करायचं नव्हतं.पण जवळजवळ दीड तास ह्या चिंतित अवस्थेतून ज्याला आपण अंक्शस मोमेंट्स म्हणतो, त्यातून मला जावं लागलं. त्यात माझा एक टेक्निकल सेशन् ही बुडाला.' पुढे सर्व ठीक झालं पण असंही होऊ शकतं. हयात सारख्या जागतिक, इतकं मोठं नाव असलेल्या इतक्या मोठ्या फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये असं होऊ शकतं. खरं म्हणजे ह्या हॉटेलमध्ये चेक इंन अंड चेक औट टाईम ची नोंद असते' त्या दिवसापासून मी मात्र एक धडा शिकलो की हॉटेलातून अगदी निघेपर्यंत पूर्ण सामान पॅक करून ठेवायचं नाही. किमानपक्षी अंडरवियर बनियन तरी सुटकेस वर वाळत ठेवायचे. वाळलेले असले तरी.

असाच पण थोडासा वेगळा आणि मला अंक्शस मोमेंट्स मधून जावं लागणारा आणखी एक आंतरराष्ट्रीय अनुभव माझ्या गाठीला आहे. 2005 च्या जुलै मध्ये ऑस्ट्रेलिया ला ॲडीलेड युनिव्हर्सिटीमध्ये फिफ्थ एशिया पॅसिफिक कॉन्फरन्स होती. ह्या कंबस्शन च्या कॉन्फरन्समध्ये मी माझा एक रिसर्च पेपर वाचणार होतो व तो सादर करण्यासाठी मी तिथे गेलो होतो. तिथे मी कॉन्फरन्समध्ये एक टेक्निकल सेशनही चेअर करणार होतो. त्या वेळा मी नागपूरला जी एच रायसोनी इंजिनिअरिंग कॉलेजचा प्राचार्य होतो. आमचे चेअरमन सुनील रायसोनी अशा आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्समध्ये पेपर सादर करण्यासाठी जाणाऱ्या प्राध्यापकांना खूप प्रोत्साहन द्यायचे.

प्राध्यापकांचा जाण्याचा राहण्याचा व रजिस्ट्रेशन फी चा खर्च ते मॅनेजमेंट तर्फे द्यायचे. मी तर प्राचार्य होतो. मग त्यांनी माझ्र् सर्व खर्च करण्याचं ठरवलं. आणि त्याप्रमाणे माझे रजिस्ट्रेशन, जाण्याचे तिकीट, ॲडीलेड मध्ये हॉटेल हॉलिडे इन मध्ये माझी राहण्याची व्यवस्था सर्व आधीच बुक करून ठेवलं. मी तीन दिवस आधी ऑस्ट्रेलिया ला गेलो. प्रथम दोन दिवस मेलबोर्न्ला माझ्या मुलीच्या दिराकडे राहिलो. मग आमच्या अमरावतीहूँन पास झालेल्या व ऑस्ट्रेलियात स्थायिक झालेल्या एका विद्यार्थ्याने मला त्याच्याकडे सिडनीला बोलावलं होतं, तिथे त्याच्याबरोबर जवळ-जवळ दिवसभर राहिलो. कॉन्फरन्स च्या आदल्या दिवशी संध्याकाळी सहाला मी ॲडीलेड ला पोहोचलो. उतरलो तसाच एअरपोर्टवरून सरळ हॅम्बुर्ग स्क्वेअर वर असलेल्या हॉटेल हॉलिडे इन मध्ये गेलो.तिथेही संध्याकाळी साडेसातला आमचं वेलकम डिनर होतं. रूममध्ये तयार झालो आणि डिनरला जाण्यासाठी लिफ्ट पाशी आलो. काही माणसं तिथे उभी होती. बहुधा मंगोलियन असावीत. मी सहज त्यांना विचारलं हाऊ टू गो टू ॲडलेड युनिव्हर्सिटी? ते म्हणाले ‘आर यू डेलिगेट फोर द फिप्थ एशिया पॅसिफिक कॉन्फरन्स?’ त्यातला एक म्हणाला इफ यू अर डेलिगेट देन यु कॅन कम फॉर वेलकम डिनर वुईथ अस. इट्स वाकिंग डिस्टन्स. मी त्यांच्याबरोबर चालायला लागलो. एक स्टीट वरून जवळ-जवळ अर्धा किलोमीटर चालत गेल्यावर समोर एक मोठा रोड आला. तो क्रॉस करून गेलं की समोरच

ॲडीलेड युनिव्हर्सिटी चं मोठं कॅम्पस दिसत होतं. आपण कसे चाललो आहोत ह्याच्या खाणाखुणा लक्षात ठेवण्यासाठी मी मागे पाहिलं. रोड क्रॉस करण्यापूर्वी त्याच स्ट्रीट मध्ये आमच्या पाठीमागे साधारण एक किलोमीटर अंतरावर एक मोठी उंच क्रेन उभी होती. उजवीकडे ॲडीलेड युनिव्हर्सिटी बिझनेस मॅनेजमेंट डिपार्टमेंट असं लिहिलेलं होतं. डावीकडे एका लाईनीत 3-4 एटीएम होत्या. मी ते लक्षात ठेवलं. आम्ही रोड क्रॉस करून थोडं उजवीकडे चालत गेल्यावर समोरच युनिव्हर्सिटीचे फाटक दिसलं. त्यातून आम्ही चार पाच जण पुढे गेलो. आमच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये ते लोक सकाळीच आलेले असल्यामुळे आणि एकदा दुपारी युनिव्हर्सिटीत येऊन गेलेले असल्यामुळे त्यांना सर्व माहीत होतं. तिथे हॉल मध्ये बऱ्याच देशाचे डेलिगेट आले होते. आमचे कॉन्फरन्सचे समन्वयक ही भेटले. बऱ्याच ओळखी झाल्या. डिनर झालं' मी कोणाशी बोलत होतो तेवढ्यात माझ्या हॉटेलमधून माझ्याबरोबर आलेले ते चार-पाच जण निघून गेले. मग मी निघालो. रात्रीचे नऊ वाजले होते. येतान्ना गेट पासून आमच्या हॉल पर्यंत बरंच चालावं लागलं. त्यात एक वळण घ्यावं लागलं.मी अंदाजानं आलो तसा परत येत फाटका बाहेर आलो. जी मोठी क्रेन मी पाहून ठेवली होती अंदाजाने तिच्या समोरूनच परत मला रोड क्रॉस करायचा होता. मग रोड च्या पलीकडे डाव्या साईडला युनिव्हर्सिटीचं बिझनेस मॅनेजमेंट बोर्ड आहे का म्हणून पाहिलं. कोपऱ्यात तो बोर्ड नव्हता.तिकडे उजवीकडे पाहिलं तर

तिथे त्या एटीएम मला काही दिसल्या नाहीत आणि काही वेगळेच तिथे दिसायला लागलं. मग मला वाटलं आपण चुकून दुसऱ्याच गेटमधून युनिव्हर्सिटी च्या बाहेर पडलो. पण आता डावीकडे जावं की उजवीकडे जावं काही कळेना. कारण डावीकडे थोड्या दूर एक मोठी क्रेन होती व तशीच उजवीकडे त्याच अंतरावर एक मोठी क्रेन होती. आता तीन क्रेन झाल्या. एक डावीकडे, एक माझ्यासमोर अन एक उजवीकडे. फक्त बिझनेस मॅनेजमेंट डिपार्टमेंट दिसलं तर जमणार होतं. मी रोडच्या बाजूला उभा होतो. बरं कोणाला विचारावं म्हटलं तर एकही माणूस दिसेना. काही कार भरधाव चालल्या होत्या. दोन मोटरसायकली माझ्या समोरून गेल्या.पण माणूस दिसेना. काय करावं मला सुचेना. थोड्या वेळानं एक माणूस चालत आला त्याला हॉटेल हॉलिडे इन ला कसं जायचं ते मी विचारलं. तो म्हणाला माहित नाही. आणखी दहा-पंधरा मिनिटे उभा राहिलो. कोणी दिसेना काही सुचेना. सुदैवानं आणखी पंधरा मिनिटाने एक जण दिसला त्याला मी हॉलिडे ईन विचारलं. तो माहीत नाही म्हणाला. मग मी त्याला माझ्या फाईल मधला हॉटेलचा पत्ता दाखवला. तो म्हणाला" ओ, यू वॉन्ट टू गो टू ह्याम्बुर्ग स्क्वेअर?" मग त्याने मला उजव्या बाजूला अर्धा किलोमीटर जाऊन पुढे जो स्ट्रीट दिसेल तिथे क्रॉस करायला सांगितलं. मी तसा त्या स्ट्रीट पुढे आलो. ती क्रेन समोर होतीच दूरवर, पण आता रोड क्रॉस केल्यानंतर डाव्या बाजूला ॲडीलेड युनिव्हर्सिटीच्या बिजनेस मॅनेजमेंटचा बोर्ड होता आणि

उजवीकडे पाहिलं तर त्या सर्व एटीएम मला दिसल्या. मग भरभर मी रोड क्रॉस केला. त्या एटीएम चे बाजूनी सरळ पुढे चालत गेलो. तिथून सगळं सोपं होतं. कारण ते माझ्या सगळं लक्षात होतं. मग मी हॉटेलला पोहोचलो पण परत जवळजवळ पंचेचाळीस ते पन्नास मिनिटं ह्या चिंतीत मनस्थितीतून मला जावं लागलं. दुसऱ्या दिवशी सकाळीच एकटाच युनिव्हर्सिटीत गेलो,तेव्हा लक्षात आलं की काल आपण एका फाटकातून आत गेलो आणि भलत्याच फाटकातून बाहेर पडलो. मग युनिव्हर्सिटीत ल्या खाणाखुणा मी लक्षात ठेवल्या. आपल्याला गेटवर कसे यायचं ते नीट लक्षात ठेवलं.असं होतं कधी कधी.

योगायोगाने सांगावसं वाटतं की जो अनुभव मला कॉन्फरन्स उद्घाटन समारंभाचा अमेरिकेत आला, अगदी तसाच अनुभव ऑस्ट्रेलियातही आला. अवघ्या तिन मिनिटांत एका गुच्छा नं प्रमुख पाहुण्यांचे स्वागत, परीचय आणि लागलीच त्यांचे भाषण सुरू झालं. कोणालाही हार नाही तुरे नाही कुणाची वायफळ भाषण हीत.आपल्याकडचे बाकीच्यांचे सोडा पण टेक्निकल कॉन्फरन्स मध्ये पाच-सहाजण स्टेजवर असतात. मग सगळ्यांना हारतुरे.सगळ्यांचा परिचय आणि त्या सगळ्यांची भाषणं, आणि मग प्रमुख पाहुण्यांचे भाषण. आणि हा उद्घाटन सोहळा संपन्न झाला ही कॉन्फरन्स ची ईतीकर्तव्यता. खरं म्हणजे उद्घाटना नंतरच खरी कॉन्फरन्सला सुरुवात होते. पण आपले सगळे श्रोते म्हणजे पार्टीसिपंट त्या टेक्निकल स्टेशनला गायब

असतात. एकदा उद्घाटन संपलं आणि ते यशस्वी झालं की कॉन्फरन्स संपली. मिन्स, अवर कॉन्फरन्स इज ओव्हर,एक्झॅक्टली व्हेअर इट शुड बिगिन. मग अशा कॉन्फरन्सची फलश्रुती काय होते ते आपल्याला माहीतच आहे. मी वेगळे सांगायला नको. हे माझं मत मी अनेक कॉन्फरन्समध्ये आपल्या देशात बोलून दाखवलं आहे.

हल्ली रेल्वेनं प्रवास करताना ए.सी. थर्ड क्लास असो की सेकंड क्लास असो, मी आल्या आल्या आपल्या सीटवर बसल्या बरोबर माझी सुटकेस बर्थ खाली ठेवून तिला चेंन लॉक करतो. एकदा असंच ब्लॉक करायला गेलो तर लक्षात आलं की सुटकेस उलट ठेवली गेली. हॅण्डल मागे गेलं व मागची बाजू पुढे आली. म्हणून ती सरळ करायला लागलो चेंन लावण्यासाठी. समोरच्या सीटवर एक अनोळखी तरुण बसला होता. म्हणाला, काका कशाला लॉक लावता? ए.सी.डब्ब्यात काही होत नाही. मी सावकाश लॉक लावलं अन नंतर त्याला अमेरिकेतिल हयात हॉटेलमध्ये घडलेला वरचा प्रसंग सांगितला. म्हटलं हॉटेल हयात सारख्या एवढ्या मोठ्या इंटरनॅशनल हॉटेलमध्येही असं होऊ शकतं मग आपला तर रेल्वेचा डब्बा आहे बाबा. कुठे काहीही होऊ शकतं. मी कोण आहे हे त्याला कळल्यावर तो थोडा खजील झाला. त्याच्या चेहऱ्याकडे पाहून मी म्हटलं ’ तुझ्या वयाला साजेलं असंच तू बोलला. Do not worry.Never mind.’.

# आठवणी

मला वाटतं 1992 चा जुलै महिना असावा. एक दिवस नेहमीप्रमाणे संध्याकाळी साडेपाच वाजता कॉलेजमधून घरी पोहोचलो. त्यावेळी गव्हर्नमेंट इंजिनीरिंग कॉलेजमधील मेकॅनिकल डिपार्टमेंटचा मी विभाग प्रमुख होतो. संध्याकाळी मुलं नुकतीच शाळेतून आली होती व थोडं खाऊन पिऊन बाहेर खेळायला जाण्याच्या तयारीत होती. मी फ्रेश होऊन हॉलमध्ये येऊन बसलो, पेपर हातात घेतला सकाळचं उरलेलं वाचायला. तेवढ्यात मिसेस आमच्या दोघांचे चहाचे कप घेऊन हॉलमध्ये आली. चहा पित पित आमच्या गप्पा चालल्या होत्या. संध्याकाळ होत आली होती. तेवढ्यात घरची बेल वाजली. मी उठून दार उघडलं. समोर पाहतो तर कॉलेजचे दोन विद्यार्थी. त्यातला सीनियर माझ्या ओळखीचा होता. खरं म्हणजे तो अंतिम वर्ष सिव्हिल चा विद्यार्थी होता. पण तो कॉलेजचा कल्चरल सेक्रेटरी होता व मी सांस्कृतिक कार्यक्रमांचा प्रभारी प्राध्यापक होतो त्यामुळे त्याचा अन माझा जवळचा संपर्क होता. मी त्याला म्हटलं ‘अरे विरेंद्र तू कसा काय आणि हा दुसरा कोण तुझ्याबरोबर? बरं मग बोलू.आधि आत या. आम्ही हॉलमध्ये बसलो. विरेंद्र म्हणाला सर हा अमोल तांबे..( ही दोन्ही नावं मी

बदललेली आहेत) हा सेकंड इयर मेकॅनिकल चा विद्यार्थी. मी म्हटलं बरं पुढे बोल. तो म्हणाला सर, अमोल ला तुम्हाला भेटायचं होतं त्याला तुम्हाला काही सांगायचं होतं. पण तो फार भित होता.मग मी त्याला तुमच्याकडे घेऊन आलो. मी म्हटलं भिवून जाण्याचं काहीच कारण नाही. मोकळेपणाने बोल काय प्रॉब्लेम आहे. अमोल म्हणाला "सर तुम्हाला आठवत असेल, मागच्या वर्षी सेकंड इयर मेकॅनिकल चे दोन विद्यार्थी एका वर्षासाठी रस्टिकेट झाले. सर त्या दोन पैकी मी एक.आहे. माझं मागचं वर्ष वाया गेलं. मला घरी बसावं लागलं. आता मी सेकंड इयर ला परत ऍडमिशन घेतली ". मी म्हणालो ठीक आहे आता काय प्रॉब्लेम आहे? अमोल रडायलाच लागला. रडत रडत म्हणाला " सर मागच्या वर्षी आम्ही रॅगिंग केलं. नवीन आलेल्या विद्यार्थ्यांचं. म्हणून प्राचार्यांनी आम्हा दोघांना रस्टिकेट केलं. पण सर देवा शप्पथ सांगतो मी त्या रँ गिंग घेणाऱ्या मुलांबरोबर होतो पण मी काही केलं नाही. किंवा त्या मुलांना काही विचारलं नाही. आणि त्या दुसऱ्या मुलांनीही काही गंभीर स्वरूपाचे रॅगिंग घेतलं नव्हतं. फक्त आडवेतिडवे प्रश्न विचारले. अंगाला हात सुद्धा लावला नाही. पण सर त्यावेळी प्राचार्यांनी आमचं काहीच ऐकलं नाही. ते आम्हाला काही बोलूच देई ना. आमच्यावर सरळ त्यांनी ऍक्शन घेतली सर ". 'मी म्हटूलं' आता काय ते बोल'तो म्हणाला " मी चांगल्या मार्कांनी पास झालो. मी एका चांगल्या सुशिक्षित कुटुंबातला आहे सर. मला खरंच चांगला अभ्यास

करायचा आहे.” त्याचे डोळे परत भरून आले. मग तो सीनियर वीरेंद्र मला म्हणाला सर अमोल खरंच चांगल्या कुटुंबातून आला आहे आणि सिन्सियर आहे. मी म्हटलं आता काय म्हणणं आहे ते सांगा. तो अमोल म्हणाला “सर मी चांगला अभ्यास करीन. टर्म वर्क रेगुलर करीन.पण मला भीती वाटते की सर्व प्राध्यापकांना मी रस्टिकेट झालेला विद्यार्थी आहे हे माहित आहे अन ते त्या ग्रहामुळे मला उनाड समजून मला इंटरनल थेरी चे आणि टर्म वर्कचे मार्क्स कमी देतील.अन माझा क्लास जाईल सर. कदाचित नापास करतिल मला ते.” मी म्हणालो ‘शांत हो. असं काहीही होणार नाही. तू फक्त रेग्युलरली क्लासेस कर प्रॅक्टिकल कर. सगळं वेळच्यावेळी कर.टर्म वर्क सबमिशन सगळं नीट मन लावून कर. मी तुला खात्री देतो तुला अपेक्षेपेक्षा एकही मार्क कमी मिळणार नाही. विभाग प्रमुख म्हणून मी जातीने याच्यात लक्ष घालीन. व आमच्या सर्व प्राध्यापक मित्रांना सांगीन. तू फक्त स्वतःला प्रुव्ह केलं पाहिजे.” त्याचा थोडा जीवात जीव आला. म्हणाला सर मी एकदम चांगला अभ्यास करीन.’ नंतर थोड्या वेळाने ती दोघे गेली. हा मुलगा सेकंड इयरला प्रथम श्रेणीत पास झाला. त्याला थर्डला तर 74 टक्के मार्क मिळाले. फायनल ला माझ्याकडे जी 5 मुलं प्रोजेक्टला होती, त्यातला अमोल एक. साधारण 1992 ते 94 च्या दरम्यान खूप कंपन्या आमच्याकडे कॅम्पस इंटरव्यू ला यायच्या नाही. नावाजलेल्या तर फारच कमी यायच्या.अन आल्याच तर फक्त दोन तीन विद्यार्थ्यांचं सिलेक्शन व्हायचं.

अशाच कॅंम्पस इंटरव्यू साठी आलेल्या टेल्को म्हणजे आता ची टाटा मोटर्स ह्या प्रसिद्ध कंपनीत अमोल चं सिलेक्शन झालं. आणि फायनल पास झाल्याबरोबर तो जॉईन ही झाला. आता तो डेप्युटी जनरल मॅनेजर पदापर्यंत पोचला आहे असं मला काही वर्षांपूर्वी कळलं. शेवटी त्याच्या प्रयत्नांना व मेहनतीला फळ मिळालं. माझ्या 'आशिष'या हिंदी कवितेतल्या दोन ओळी इथे लिहिण्याचा मला मोह आवरत नाही. ही कविता मी माझ्या मुलासाठी आणि विद्यार्थ्यांसाठीच लिहिली आहे. त्यात एके ठिकाणी म्हटले आहे " फल होता मीठा परिश्रम का और व्यर्थ न होता य्तन कोई, जो गिरकर उठना सिखलाये, सबसे अच्छा प्रयत्न वही." ते अमोलनं सर्वार्थाने सिद्ध करून दाखवलं,याचा मला आनंद झाला. मला सांगावसं वाटतं, महाविद्यालयीन जीवनात रॅंगिंग हा प्रकार खरंच अत्यंत वाईट. आता तर त्याच्यासाठी अत्यंत कडक नियम व व शिक्षाही ठरविल्या आहेत. तो फार मोठा विषय आहे व त्यावर मला वेगळा लेख लिहावा लागेल. मी चार महाविद्यालयाचा प्राचार्य राहिलो आहे. त्यामुळे माझ्याजवळ रॅगिंगचे अनेक किस्से आहेत. कधीकधी ह्या प्रकारात अमोल सारख्या काही मुलांवर अनाहुतपणे अन्याय होतो. अन अशी मुलं वेळीच सावरली नाहीत किंवा इनडिफरन्ट झाली तर त्यांचं आयुष्य बरबाद होतं. या प्रकारात असे बरेच बळी गेल्याचं मी पाहिले आहे. काही काही वेळा या प्रकारात मजेदार गोष्टही घडतात. आय.आय.टी. मुंबईला मी एम.टेक. चा विद्यार्थी असताना माझं जे रॅगिंग झालं ते मला

अजूनही आठवतं.खरं म्हणजे मी नऊ वर्षे प्राध्यापक म्हणून अमरावती येथे काम केल्यानंतर माझं आय आय टी ला एम.टेक च्या अभ्यासासाठी डेप्युटेशन झालं. मी जुलै 1975 ला तिथे ॲडमिशन मिळवली व जॉईन झालो. गेलो तसा आय आय टी चा होस्टेलमध्ये ऍडमिशन घेतली. त्यावेळी तिथे एच-1, हे होस्टेल स्नातकोत्तर विद्यार्थी व रिसर्च स्कॉलर यांच्यासाठी असायचं. मी ह्याच होस्टेल मध्ये माझी रूम मिळवली. आमच्या सर्व एमटेक च्या ऍडमिशन झाल्यानंतर साधारणता आठ-दहा दिवसांनी आमच्या हॉस्टेलच्या सीनियर मुलांनी फ्रेशर्स नाईट घेण्याचे ठरवलं; हा तिथे, दरवर्षीच्या प्रघात होता. फ्रेशर्स नाईटला मेस हॉलमध्ये संध्याकाळी सर्व होस्टेलर्स, सिनियर्स, नवीन आलेले सर्व जमा व्हायची. तिथे एक दीड तास कार्यक्रम व नंतर जेवण असायचं. कार्यक्रम म्हणजे, फ्रेशर्स नी आपली ओळख करून द्यायची. एखादा आइटम करून दाखवायचा, म्हणजे नाच-गाणं, बजावण, नकला इत्यादी. मग सीनियर काही प्रश्न विचारायचे. त्याची उत्तरं द्यायची. नंतर शेवटी फॅशन परेड व्हायची. म्हणजे सर्व नवीन आलेल्या विद्यार्थ्यांनी मधल्या दोन टेबलाभोवती राउंड राउंड दोन चक्रा हळू हळू चालत मारायच्या. सीनियर पैकी दोन जण निवडीसाठी जज व्हायची. ह्या जज झालेल्या दोघांनी, फ्रेशर्स मधल्या एकाची, त्या वर्षीची हॉस्टेल क्वीन म्हणून निवड करायची.. असा सर्व प्रकार.. सर्व नवीन व सर्व सिनियर्स दिलेल्या दिवशी संध्याकाळी मेस हॉल मध्ये जमा झाले..मग कार्यक्रम सुरू

झाला. माझी पाळी आली तेव्हा मी स्वतःची ओळख करून दिली अन् माझी एक हिंदी कविता म्हणून दाखवली. ती सर्वांना आवडली. टाळ्या वाजल्या. असं सगळयांचं करून झाल्यानंतर फॅशन परेडची वेळ आली. सीनियर पैकी दोन, जज म्हणून निवडले. एक एम.टेक. सेकंड ईयर चा अग्रवाल होता व दुसरा विर्दी म्हणून होता. तो सरदारजी होता.आम्ही टेबलाभोवती दोन राउंड घेतले आणि शेवटी थांबल्यावर विर्दी म्हणाला ‘मिस्टर जाजू इज होस्टेल क्विन ऑफ दिस इयर. मला आश्चर्यच वाटलं.मला का निवडला असेल कळेना. मग लक्षात आलं की त्या दिवशी मी काळा पॅन्ट, वर ठिपक्यांच्या पांढरा मनिला घातला होता. तेव्हाच्या फॅशन प्रमाणे मी शोले मधल्या अमिताभ बच्चन सारखे लांब केसही ठेवले होते. ह्या सगळ्या अवतारामुळे कदाचित मी हॉस्टेल क्वीन झालो असेल. पुढे पहिली टर्म संपली म्हणजे पहिलं सेमिस्टर संपलं. परीक्षा झाल्या. एका महिन्याची सुट्टी झाली. मी अमरावतीला आलो. माझं लग्न झालेलं होतं आणि त्यावेळेला मला एक अडीच वर्षाची मुलगी होती. पहिले सेमिस्टर मध्ये माझी बायको आणि मुलगी अमरावती ला च राहिली आणि मी आय आय टी हॉस्टेलमध्ये. पण टर्म संपता संपता मला आय आय टीत एक छोटसं वन रूम किचन फॅमिली ऑकोमडेशन मिळालं. आणि मग दुसर्या टर्मच्या सुरुवातीलाच मी थोड्या घरगुती सामानाबरोबर मिसेस आणि मुलीला घेऊन आय आय टीत राहायला गेलो. अर्थातच मी दुसऱ्या टर्म

पासून होस्टेल सोडलं. पुढे मार्च महिना आला. अन एक दिवस माझ्या घरी होस्टेल वन चा सेक्रेटरी व दोन सीनियर आले. मी त्यांना आत बोलावलं, मिसेस ची ओळख करून दिली, त्यांना चहा दिला. ते म्हणाले" जाजूजी बीस मार्च को आपना हॉस्टेल डे है. उसने कुछ कार्यक्रम होते है. और साल भर के इव्हेंट होते उसका प्राईज डिस्ट्रीब्यूशन समारंभ होता है. हम अपने डायरेक्टर साब को और कुछ प्राध्यापकको को निमंत्रित करते है. जाजू जी आपको होस्टेल डे का निमंत्रण हम दे रहे है. और आपको तो आना ही पडेगा ,क्यू की प्राईज डिस्ट्रीब्यूशन के समय सबसे पहला प्राईज हॉस्टेल क्विन को ही दिया जाता है. और भाभीजी को भी साथ लाना." जरूर आयेंगे मी म्हणालो. माझ्या मेसेजला हॉस्टेल क्वीन निवडून आल्याचं मी अगोदरच सांगितलं होतं. मग कार्यक्रमाच्या संध्याकाळी मी मिसेस व माझी मुलगी आम्ही सर्व आमच्या हॉस्टेलला गेलो. थोड्याच वेळाने आमचे काही प्राध्यापक व त्या वेळचे डायरेक्टर डे साहेब हे ही आले. अगोदर स्वागत गीत, अहवाल वाचन, एक दोन छोटे आयटेम झाले. मग आमचा अँकर, जो सेकंड इयर एम.टेक चा विद्यार्थी होता तो म्हणाला नाऊ वुई विल बिगीन द प्राईज डिस्ट्रीब्यूशन..आय रिक्वेस्ट अवर डायरेक्टर तू गिव आवे प्राइजेस.. द फर्स्ट प्राइस,ओफ होस्टेल क्वीन गोज टू मिस्टर जाजू. मी स्टेजवर गेलो डायरेक्टर साहेबांच्या कडून मला एक सुंदर लेडीज पर्स देण्यात आली. ती घेऊन मी अँकर जवळ गेलो आणि म्हणालो' मेआय स्पिक फॉर

टू मिनिट्स. तो म्हणाला, एस. व्हायनॉट? मी माईक वर गेलो आणि म्हणालो दोस्तो मै आपका शुक्रगुजार हू. मै आपको मुझे हॉस्टेल क्वीन क्यू चुना गया ये बताना चाहता हू. मेरी बात दो शेर सुना के आपको बताना चाहता हू. पहिला शेर मिर्झा गालिब का है,और दुसरा शेर मेरा अपना है. गालिब ने कहा है "आईना देखके मुह अपनासा लेके रह गये, हुजूर को अपना दिल ना देने पर कितना गुरूर था. काशीद को अपने हाथ से गर्दन न मारिये, उसकी खता नही है यह, तेरा कसूर था. याने, हुजूर अपने आपको बहुत खूबसूरत समजकर अपना दिल किसी को नही देते थे. पर आईना देख कर उनको पता चल गया की वो क्या चीज है.अपनी सूरत देखी तो गुस्से से आईने को पत्थर मारने लगे. गालिब ने कहा भाई तू जैसा है उसने दिखा दिया.' मी पुढे म्हणालो,अब मेरा शेर सुनाता हू. "आईना देख के अपने आप पर गुरुर आया, के इस बदसुरती पर भी हुस्न का सुरूर आया.. पर अंदर की बात बता देता हूं दोस्तो, हमे हॉस्टेल क्विन चुनने मे एक सरदार का दिमाग काम मे जरूर आया.". क्यूकी दोस्तो मुझे चुनने वाले हमारे सेकंड ईयर के सीनियर सरदार वीर्दि थे".. तो ही त्यावेळी ऑडियन्स मध्ये बसलेला होता..सगळीकडे मोठा हशा पिकला..तो ही हसला. मग मी ती सुंदर पर्स आणून सर्वा देखत माझ्या मेसेसला दिली व आपल्या जागेवर बसलो. पुढे डिनर झालं.सर्वांना मजा आली. सहज ह्या आपबिती ची आठवण झाली. असं होतं कधी कधी.

# ए.बी.:आबा

काही काही अफलातून व्यक्ती आपल्या जीवनात येऊन जातात. येऊन जातात हे एवढ्यासाठीच म्हटलं की परवा ए. बी. गेला. गुरुवारी तीन जानेवारीलाच सकाळी माझ्या एका मित्राचा फोन आला, म्हणाला ‘ अरे काल रात्री ए.बी. वारला. खरं म्हणजे ए. बी. वर एक लेख लिहायचा हे मी आधीच खूप दिवसापूर्वीच ठरवलं होतं. पण आता परवा तो गेल्याची बातमी कळली. लागली त्याच दिवशी दुपारी मी आणि माझी मुलगी, आम्ही वहिनींना भेटायला गेलो. जवळ जवळ एक दीड तास बसलो असू. अन ए.बी.च्या अनेक आठवणीने खरं म्हणजे किस्स्यानं मन भरून आलं. घरी आलो अन त्या संध्याकाळी हे लिहायला बसलो.

ए. बी. म्हणजे प्राध्यापक ए. बी. देशमुख. आम्ही सर्व मित्र त्याला एबी किंवा बाबा असं म्हणायचो. माझी, त्याच्याशी पहिली भेट झाली ती साधारण 1974- 75 साली. मी त्यावेळी गव्हर्नमेंट इंजीनियरिंग कॉलेज अमरावती येथे मेकॅनिकल डिपार्टमेंट मध्ये अधिव्याख्याता होतो. तिथेच तो आमच्या विभागात कुठून तरी( मला नक्की आठवत नाही) बदलून आला. तो अधिव्याख्याता होता. अगदी चार दिवसातच तो आमच्या सर्व तरुण मंडळी चा मित्र झाला. त्यानंतर तर अमरावती, आय आय टी मुंबईत

पीएच.डी.करतान्ना, निवृत्त झाल्यानंतर रायसोनी इंजिनिअरिंग कॉलेज नागपूर अशा अनेक ठिकाणी अनेक वर्ष मी आणि ए बी एकत्र राहिलो. माझ्या जवळच्या मित्रान पैकी तो एक होता' फॅमिली फ्रेंडच ,आमची दोन्ही कुटुंब म्हणजे माझी बायको, माझी मुलं. व एबी ची बायको बएबी ची मुलं हे जवळचे मित्र झाले. आमचं एकमेकांकडे येणं जाणं, तासन तास गप्पा करणं असं नेहमी चालू असायचं.

एबी म्हणजे अगदी तयारी करून मन लावून शिकवणारा प्राध्यापक. विद्यार्थीप्रिय. खेळीमेळीने विद्यार्थ्यांमध्ये वावरणारा. पण तितकाच विद्यार्थ्यांना शिस्तीत ठेवणारा. कोणताही विषय त्याला शिकवायला दिला तर त्याची कुरकुर नसे. दिलेल्या विषयाची तयारी करायचि व शिकवायचा. पण एबी म्हणजे खरंच एक अफलातून माणूस. अत्यंत बिनधास्त. नुसतं बिनधास्त नाही तर निर्भिड. काय मनात येईल ते तोंडावर बोलणारा माणूस. छक्केपंजे नाही. तेवढाच बेडर. कधी परिणामाला न घाबरणारा. अन बेफिकिर बिनधास्त.त्याच्या बेफिकीर ,निर्भीड पणाचे अनेक किस्से माझ्याजवळ आहेत. त्यातलेच काही आज मी इथे लिहितो आहे. त्याच्या या अशा वागण्याने त्याला काही काही जण तर तर्हेवाइक किंवा विक्षिप्त म्हणायचे.पण जे त्याला जवळून ओळखून होते त्यांना तो किती सच्च्या दिलाचा माणूस आहे हे माहीत होतं. आम्ही मग त्याचे ते विचित्र वागणं हसण्यावारी न्यायचो.

मला आठवतं, 1981 साली माझं आय.आय.टी मुंबईला पीएच. डी करण्यासाठी डेप्युटेशन झालं. 1982 ला एबी ही तिथेच पीएच. डी. साठी आला. माझ्याच डिपार्टमेंट मध्ये. दोघांनाही फॅमिली अकोम्डेशन मिळालं होतं..आमची मुलगी अन मुलगा आम्ही आय टी च्या कॅम्पस स्कुल मध्ये शिकायला टाकली. त्याचा धाकटा मुलगा हर्षल व माझा मुलगा पराग दोन्हीही एकाच वर्गात होते. मी माझं थेसिस सबमिट करून 1 नोव्हेंबर 1984 लाच् परत अमरावतीला रुजू झालो. एबी माझ्या एक वर्षानंतर अमरावतीला आला. माझा मुलगा चौथ्या वर्गात अमरावतीच्या ज्ञानमाता शाळेत शिकत होता. त्याच शाळेत ए.बी.नं ही हर्षल ची चौथ्या वर्गात ॲडमिशन घेतली. त्यानं अमरावतीच्या जोगळेकर प्लॉट मध्ये राहायला भाड्याचे घर घेतलं होतं. मुलाची ऍडमिशन झाल्यानंतर पहिल्या दिवशी तो मुलाला ज्ञानमाता शाळेत सोडायला गेला तेव्हाचा, त्यानं स्वतः मला सविस्तर सांगितलेला हा किस्सा. तो म्हणाला “ यार पहिलेही दिन बडा करिष्मा हो गया.” मी म्हटलं काय झालं? तो म्हणाला “अरे शाळेच्या वेळेवर मी हर्षल ला स्कूटरवर मागे बसवलं आणि घरून निघालो. इरविन चौक क्रॉस करून उजवीकडे वळून त्या सहकारी बँके जवळून होली क्रॉस शाळे समोरून ज्ञानमाता शाळेकडे जायचं होतं. इतकी गर्दी विचारू नको. स्कूटर एकदम थांबवली. हळुच राईट टर्न करून ज्ञान मातेला जायला हळू हळू निघालो. कॉलेजची माझी वेळ झाली होती म्हणून ज्ञान मातेच्या आत

न घेता शाळेच्या फटका वरच स्कूटर उभी केली दोन मिनिटं. वाटलं हर्षल उतरला. म्हणून तशीच गाडी सुरू करून मी पुढं कॉलेजला आलो. शाळेचा पहिला दिवस असल्याने त्या दिवशी शाळा एक वाजता सुटणार होती. म्हणून मुलाला घेऊन घरी सोडण्यासाठी एक वाजता कॉलेजमधून मी शाळेत गेलो. मी पोहचण्यापूर्वी शाळा सुटली होती. मग गेटवर मुलाला जिथे सोडलं तिथेच शोधलं. तो तिथे नव्हता. मग त्याच्या वर्गावर शोधलं. तिथेही तो नाही. चपराशी म्हणाला सगळी मुलं गेली. मग तसाच तावातावानं प्रायमरी च्या हेडमास्तर च्या रूम मध्ये गेलो. म्हटलं "माझा मुलगा नाही. त्याला सोडलं शळेत. आज पहिला दिवस. तुम्ही अतिशय बेजबाबदार लोक आहात. मुलांकडे लक्ष ठेवत नाही. पहिल्या दिवशी मुलं गोंधळून जाऊ शकतात. त्याच्याकडे तुम्ही लक्ष द्यायला नको का?" असं खूप भांडलो मी त्या बाईशी. तावातावाने घरी गेलो. घरी पाहतो तर काय, हर्षल घरी. मी म्हटलं 'अरे तू एकटा घरी आलास का?' तर तो म्हणाला नाही. मी शाळेत गेलोच नाही. 'शाळेत गेला नाही?' मी म्हणालो. तो म्हणाला " तिथे त्या लाल बिल्डिंग जवळ मेन रोडवर तुम्हीच स्कुटर थांबवली. तेव्हा मला वाटलं की शाळा आली आणि मी स्कूटरवरून उतरलो. पण पुढे शाळेत कसं जायचं हे मला समजत नव्हतं म्हणून मी परत आल्या वाटेने घरी आलो." शाब्बास ग्रेटच आहेस. मी म्हणालो." एबीनं ही सांगितलेली कथा. मग मी म्हणालो "आब्या,साल्या, तो ग्रेट नाही, तूच ग्रेट आहेस. अरे

पहिल्या दिवशी कोणी बाप मुलाला शाळेत सोडायला गेला की नवीन ठिकाणी हात धरून मुलगा वर्गापर्यंत नेऊन त्याला आत बसून येईल. अन तू शाळेच्या गेटवर स्कुटर थांबवली. मागे न पाहता, मुलाला काही न बोलता, टाटा बाय-बाय न करता, कॉलेजला निघून आला. गेटवरच मागे वळून पाहिलं असतं तर तेव्हा लक्षात आलं असतं की मुलगा स्कूटरवर नाही. वारे वा. म्हणजे नुसती स्कूटर थांबवली, मुलगा उतरला असं समजून, शाळेत गेला असं समजून, चालले आपले. अन वर शाळेत जाऊन हेडमास्टरणीलाच बेजबाबदार वगैरे म्हणून तिच्याशी भांडला.ग्रेट तर तूच आहेस बाबा." त्याने एक दीर्घ श्वास घेतला अन तो जोराने हसायला लागला. आम्ही सगळेही हसायला लागलो. तो कधीही हसण्यापूर्वी किंवा रागावण्या पूर्वी असा दीर्घ श्वास घ्यायचा नेहमी. त्याची सवय होती ती..असाहा बिंधास्त,बिनफिकिर ए.बी.  1977 च्या डिसेंबरमध्ये आमच्या फायनल इयर मेकॅनिकल चा इंडस्ट्रियल शॉर्ट टूर घेऊन बडोदा आनंद आमदाबाद अबू रोड माउंट अबू असं जायचं होतं.त्या टूरवर विद्यार्थ्यांबरोबर प्राध्यापक म्हणून मी आणि ए बी गेलो होतो. आमचे इंडस्ट्रियल व्हिजिट संपल्यानंतर आम्ही एक दिवसासाठी माउंट आबू ला जाणार होतो. सकाळी पोहोचायचं. दिवसभर माउंट अबू पाहून परत रात्री अबु रोड वरून ट्रेन पकडायची असा प्लॅन होता. आम्ही सकाळी पाच साडेपाचला पोहोचलो. तिथे वेटिंग रूम मध्ये फ्रेश होऊन चहापाणी वगैरे

केलं. पुढे माउंट आबू ला जाण्यासाठी बाहेर येऊन राज्य परिवहन मंडळाच्या अधिकाऱ्याला विनंती करून आम्ही पन्नास-पंचावन्न विद्यार्थ्यांसाठी व आम्हा दोघांसाठी एक स्पेशल बस माउंट अबू साठी मागितली. कुठून तरी एक बस नुकतीच आली होती. त्या बसचा ड्रायव्हर कंडक्टर या दोघांना अधिकाऱ्याने आम्हाला माउंट अबू ला सोडून यायला सांगितलं. दीड तासाचा प्रवास होता. बस सुरू झाली आणि पुढे अर्ध्या वाटेवरच बंद पडली. ड्रायव्हर म्हणाला डिझेल खत्म हो गया.ए.बी. खाली उतरून त्याच्याशी भांडला. डिझेल आहे की नाही पहिले चेक क्यू नही किया? त्या ड्रायव्हरनं उलट दिशेने येणाऱ्या एका बस मध्ये कंडक्टरला पाठवून डिझेल मागवलं. परत बस सुरू केली. ह्या सगळ्या प्रकारात आमच्या दीड तास फुकट गेला. आम्ही उशिरा माउंट आबू ला पोहोचलो. तिथे उतरल्या बरोबर ड्रायव्हरनं तिथल्या डेपो मॅनेजर ला सगळं सांगितलं व लडको ने और खास कर के साबने,( ए.बी. कडे बोट दाखवून) बहुत गालीया दि असं सांगितलं. मग त्या डेपो मॅनेजर आणि ए.बी.ची बाचाबाची सुरू झाली. तो आपल्या अंगातला कोट वगैरे काढून त्या डेपो मॅनेजर ला मारायला धावला. मी आणि विद्यार्थ्यांनी त्याला मागे घेतलं. मग तो डेपो मॅनेजर म्हणाला'अब मै तुमको साईट सीन के लिये बस नही दूँगा. बैठे रहना. देखता हूँ.' मी त्याच्याकडे गेलो त्याची माफी मागितली. म्हटलं कॉलेज के लडके ना समज, गरम दिमाग के है. दिलपर बात मत लो. तो म्हणाला

‘आपके प्रोफेसर तो मेरे पर मारने को दवडे.आपके पास लडके है तो घमंड मत करो..ये पुरा गाव ही मेरा है. मुझे तुम क्या मारोगे? मग मी व काही विद्यार्थ्यांनी त्याची मनधरणी केली. मी त्याच्याशी मारवाडीत बोलायला लागलो. तेव्हा तो थंड झाला. मग त्यानं थोड्या वेळानं आम्हाला एक स्पेशल बस दिली व तीच बस तुम्हाला संध्याकाळी अबू रोडला सोडेल म्हणून सांगितलं. आम्हाला खूप आनंद झाला. सर्व स्थिरस्थावर झाल्यावर मी ए. बी ला म्हटलं अरे आपण टूरवर परक्या ठिकाणी आहोत, जरा डोकं शांत ठेवत जा. आता त्या मॅनेजरनं नसतं ऐकलं तर आपण असच अडकून पडलो असतो. तो परत म्हणाला काही नाही. मारणारच होतोत्या नालायकाला. कशाला तुम्ही उगाच मला अडवलं. असा बेडवर, परिणामाची चिंता न करणारा. त्याने सांगितलेले मजेदार अनेक किस्से माझ्याजवळ आणखी आहेत. एकदा यवतमाळ पॉलिटेक्निकला असताना एक दिवस दुपारी स्कूटर मध्ये पेट्रोल भरायला हा पंप वर गेला. पेट्रोल भरलं. तिथेच एक मित्र भेटला. तो पेट्रोल भरून अमरावतीला जाणार होता. तो म्हणाला;चलो चलते क्या अमरावती? ‘ घरी न सांगता तो अमरावतीला निघून गेला. तिथे रात्रभर अन दुसऱ्या दिवशी राहून संध्याकाळला यवतमाळला पोहोचला. इकडे वहिनी हैराण. त्यावेळी काही मोबाईल वगैरे तर सोडाच पण लैंडलाइन फोनही नव्हते घरात. वहिनीनी सगळ्या मित्रांच्या घरी जाऊन चौकशी केली. कोणालाच पत्ता नाही हा कुठे गेलाय. हा परत

येईपर्यंत वहिनींचा जीव खालवर होत होता. असा हा बिनधास्त प्राणी. तो औरंगाबाद ईंजिंनिअरींग कॉलेजला मेकॅनिकलला असोसिएट प्रोफेसर असताना हॉस्टेल वॉर्डन ही होता. वार्डन कॉटर कॉलेजला लागून होतं. तिथं असताना त्याने एक कुत्री पाळली होती. ती कुत्री त्याच्याशी खूप खेळायची व नेहमी त्याच्याजवळच असायची. इतकी जवळ की हा कॉलेजला जायला निघाला की ती कुत्री त्याच्याबरोबर जायची. आणि तो तिला येऊ द्यायचा. हे तर काहीच नाही. ज्या वर्गावर तास असेल त्या वर्गात तो गेला, की ती कुत्रीही त्याच्याबरोबर वर्गात जाऊन ब्लॅक बोर्ड जवळ बसून असायची. विद्यार्थी हसायचे. वर्गा बाहेरून जाणाऱ्या इतरांना व प्राध्यापकांना ही ते दिसायचं. त्याची कुत्री चर्चेचा विषय झाली होती. एकदा तेव्हाच्या विभाग प्रमुखांनी त्याला बोलावलं आणि सांगितलं 'तू अशी कुत्री वर्गात घेऊन जाऊ नकोस' हा म्हणाला 'मी तिला नेत नाही. तिच येते, त्याला मी काय करू. आली तरी कोणाला काही त्रास देत नाही. आणि वर्गात नकोच असेल तर तिला बाहेर काढणं माझं काम नाही. तिला बाहेर काढण्याची व्यवस्था विभाग प्रमुख ह्यान्नी करावी." त्या विभागप्रमुखांनी कपाळावर हात मारून घेतला.असा बिनधास्त. कोणाची भीड न बाळगणारा. पण आपलं काम मात्र करणारा. अर्थात ते त्याच्या पद्धतीने. सर्व विद्यार्थ्यांचा, मित्रांचा तो आवडता होता. असा हा आमचा ए.बी.

# श्रद्धा

रविवार दिनांक 16 डिसेंबर 2011च्या दैनिक हिंदुस्थान मध्ये माझा एक लेख प्रकाशित झाला होता. “शेगाव चा राजा गजानन माझा” त्या लेखातला बराचसा भाग घेऊन हे मी लिहितो आहे. शेगावचे गजानन महाराज महाराष्ट्रातल्याच नाही तर देशातल्या अनेक लोकांचं श्रद्धास्थान आहे. माझी महाराजांवर अपार श्रद्धा आहे. आयुष्यभर आम्ही सर्व कुटुंबीय महाराजांचं नामस्मरण करीत आलो. पोथीची पारायणे करीत आलो. दरवर्षी, किमान एकदा तरी शेगावला दर्शनाला जाणं हा आमचा परिपाठ. आयुष्यभर विज्ञान व तंत्रज्ञानाशी निगडित असलेला मी, माझी महाराजांवर आंतरिक श्रध्हा आहे. आणि ही अंधश्रद्धा नाही. श्रद्धेचे बळ प्रचंड असतं. मग ती तुमच्या कोणत्याही देवावर असो साधुसंतावर असो, महात्म्यावर असो.जीवनात श्रद्धास्थान असण हे महत्त्वाचं. महाराजांवर श्रद्धा असणाऱ्या अनेकांना त्यांचे चमत्काराचे अनेक अनुभव आलेले आहेत. मधून मधून आपण याबद्दल वाचतो, ऐकतो. माझ्या जीवनात घडलेला व मी अनुभवलेला एक सत्य प्रसंग जसाच्या तसा लिहितो आहे. त्यावर विश्वास ठेवणं न ठेवणं, हा प्रत्येकाचा आपला अधिकार आहे. पण मी जे लिहितो आहे ते जसं घडलं तसंच तसं सत्य आहे त्यात काही काल्पनिक नाही, हे

प्रामाणिकपणे सांगतो. 1976 च्या ऑगस्ट महिन्यात बनारस हिंदू युनिव्हर्सिटी वाराणसी येथे फर्स्ट नॅशनल कॉन्फरन्स ऑन एअर पॉल्युशन झाली. त्यावेळी मी आय आय टी मुंबई येथे एम.टेक चा विद्यार्थी होतो. ह्या वाराणसीच्या कॉन्फरन्स साठी माझा एक शोधप्रबंध स्वीकारण्यात आला होता. त्याच्या सादरीकरणासाठी मला वाराणसी ला जायचं होतं जास्त दिवस आगोदर जाणं शक्य न्व्हतं. मी कॉन्फरन्स च्या दिवशी सकाळी वाराणसीला पोहोचायचं ह्या बेतानं मुंबईहून कलकत्ता मेल वाया अलाहाबाद असं निघालो. रात्री बारा वाजता च्या दरम्यान अलाहाबादला ती आली. इथून गाडी धरून मला पुढे मुगलसराय ला जायचं होतं. त्याप्रमाणे मी गुगलसंराय ला जाणाऱ्या गाडीने रात्री तीन वाजता मुगलसराय या जंक्शन ला पोहोचलो. तिथून बसने मला वाराणसी ला जायचं होतं. मुगलसराय ला उतरलो तेव्हा धो धो पाऊस सुरू होता. स्टेशनच्या बाहेर चौकशी केली तर कळलं की सकाळी सहा वाजता वाराणसीला बस जाईल पण तेही पाऊस थांबला तर. तीन तास स्टेशन वर थांबलो. पाऊस चालूच. सारखी गजानन महाराजांची प्रार्थना करत होतो, देवा इथ पर्यंत आलो तसं आता वाराणसी ला पोहोचलो की झालं. पाऊस थांबू दे. सकाळी उजाडल्या बरोबर बाहेर पाहिलं तर दूरवर पाणीच पाणी. जसा सर्वदूर समुद्रच. पाऊस वरून चालूच. पण त्याच्यातही सहा वाजता एक बस लागली. आम्ही पंधरा वीस जण बस मध्ये बसलो. दहा-पंधरा मिनिटात बस सुरू झाली आणि तशा

जोराच्या पावसातच आम्ही निघालो. रस्त्याने पाणी बस मध्ये यायला लागलं. आम्ही सामान, सुटकेस आमच्या मांडीवर घेऊन बसलो. बस मात्र चालू होती. साधारण साडे सात वाजेच्या दरम्यान बस वाराणसीला थांबली. धो धो पावसात पाणी सर्व गावात वाहत होतं. रस्त्यावर उभ्या असलेल्या काही कारा पावसात बुडाल्या होत्या. ड्रायव्हर म्हणाला बस यहा तक बस आयी अब आगे नही जा सकती. आप लोग उतर जाओ. आम्ही खाली उतरलो. शेजारी एक शहर वाहतुकीच्या स्टॉप असावा, त्याच्या शेडखाली आम्ही दोन-चार जण उभे राहिलो. अगोदर तिथं दोन चार लोक उभे होते. माझ्या बसमधून उतरलेला एक सहप्रवासी माझ्यासोबत होता. मी माझा परिचय त्याला दिला व बी.एच.यू. ला कॉन्फरन्ससाठी जायचंय म्हणून सांगितलं. तो म्हणाला एम एम डॉक्टर सिन्हा. सायंटिस्ट फ्रॉम नॅशनल मेटलर्जीकल लेबोरेटरी जमशेडपूर. आय एम गोइंग फॉर सेम कॉन्फरन्स. मला थोडा धीर आला. कॉन्फरन्स ला जायचं कसं? पाऊस सुरू. आभाळ असं भरून आलेलं की चार दिवस हा पाऊस थांबेल असे वाटत नव्हतं. तिथल्या काही लोकांना बीएचयू ला कसं जायचं विचारलं तर ते म्हणाले ईतनी बारिश, फिर गाव भर मे गलियो मे कमर तक पानीबह रहा है. आपको रिक्षा भी नही मिलेगा. मी सारखा गजानन महाराजांचा धावा करत होतो. प्रार्थना करत होतो, महाराज कसेही करा हा पाऊस थांबवा आणि कसेही करून एकदा मला बी,एच,यु..ला पोहचवा.आम्ही पंचवीस मिनिटं तिथे उभे

होतो. अन खरंच चमत्कार झाला. एवढं दाटलेलं आभाळ असून पाऊस एकदम थांबला. एकदम म्हणजे एकदम. अगदी थेम नाही. रात्री तीन वाजेपासून आठ वाजेपर्यंत पावसाचं थैमान चालू होतं. आता बंद. पण खरा चमत्कार पुढच होता..अगदी पाऊस थांबल्या बरोबर एक सायकल रिक्षा आम्हा दोघा समोर येऊन उभा राहिला. साधारण सहा फूट उंचीचा, पिळदार शरीर असलेला, एक काळासावळा मुलगा, अंगात फक्त चड्डी बरमूडा सारखी. बनियन ही नाही. उघडाबंब. असा आमच्या समोर रिक्षा घेऊन उभा राहिला. आम्हाला म्हणाला' कहा जाओगे?' आम्ही म्हणालो बी एच यु जाना है लेकिन ले जाओ गे कैसे? गाव मे तो कमर तक पानी बह रहा है. तो म्हणाला 'आपको क्या करना है? चलो.' आम्हाला वाटलं हा खूप पैसे मागेल. जाने का क्या लोगे,असं विचरलं तर तो म्हणाला पाच रुपये. आनंदात आम्ही दोघांनी रिक्षेत उडीच मारली. त्यांनं वेगवेगळया गल्ल्यातून कमरेइतक्या पाण्यातून रिक्षा काढली. आमच्या रिक्षात पाणी आलं होतं. आम्ही सुटकेस मांडीवर घेऊन बसलो. रिक्षेत पाय पाण्यात बुडालेले. पण या बहाद्दराने बरोबर पावणे नऊ वाजता रिक्षा बी.एच,यु.च्या गेट समोर उभा केला. आम्ही त्याला पैसे दिले. उतरताच गेटवरचे काउंटर कडे आम्ही धावलो. कॉन्फरन्स चं उद्घाटन नऊ वाजून 30 मिनिटांनी होणार होतं म्हणून आम्हाला घाई होती. आम्ही काउंटरवर गेल्यानंतर चौकशी केली , तर होस्टेल मालवीय भवन ह्यात मला खोली देण्यात आली होती. त्यंच्या

वाहनात आम्ही होस्टेल पर्यंत आलो. घाईघाईने तयार होऊन 9:30 पर्यंत मी कॉन्फरन्स हॉल मध्ये पोहोचलो. पुढे चार दिवस पावसाचा पत्ता नाही. त्यावेळी घाईत होतो म्हणून त्या रिक्षेवाल्या कडे वरळून्ही पाहिलं नाही. पण गेली 45 वर्ष तो चेहरा, त्याचं धारदार नाक, त्याचे पाणीदार डोळे आणि उघडी बंब शरीरयष्टी, कमावलेली सहा फुटाची , ते सगळं माझ्या डोळयासमोर अजूनही स्पष्ट दिसतं. बरेच वेळा मनात वाटतं, महाराज तर तो रिक्षा घेऊन आले नसतील. आता हा योगायोग म्हणा, चमत्कार म्हणा, अंधश्रद्धा म्हणा, श्रद्धा म्हणा. पण जे घडलं ते असं. म्हणून म्हणतो श्रद्धेचे बळ मोठं असतं. नितांत श्रद्धा म्हणजे देवाशी सुसंवाद घडवणारं माध्यम. मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे माझं आयुष्य विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या सानिध्यात गेलं, म्हणून जानेवारी 2011 च्या इंडियन न्यूक्लियर सोसायटी न्यूज लेटर ऑफ इंडियन सोसायटी मधल्या “भय येथे संपत नाही “ ह्या डॉक्टर बाळ फोंडके यांच्या लेखातील एक उतारा खाली देतोय. “हिरोशिमा ही संपूर्णतया मानवनिर्मित घटना होती. युद्धाच्या धामधुमीत शत्रूला नेस्तनाबूत करण्यासाठी घेतलेल्या रणनीतीचा तो परिपाक होता. कोणाच्याही हातून झालेल्या चुकीमुळे तो आगडोंब उसळला नव्हता तर तो तसाच उसळेल याची पूर्ण कल्पना तो निर्णय घेणाऱ्या अमेरिकेच्या तत्कालीन अध्यक्षांना होती. त्यांनी तसा निर्णय घेऊ नये, असं आवाहन त्याच अणुब्मॉबची निर्मिती करणाऱ्या वैज्ञानिकांचे नेतृत्व करणाऱ्या ओपेन हायमर या

शास्त्रज्ञांनी राष्ट्राध्यक्षांना केलं होतं.कारण ओपेन हायमरनं महिनाभर आधीच केलेल्या चाचणीत त्या प्रलयाच्या हृदयात रुद्र रूपाचे दर्शन घेतलं होतं.त्या क्षणी मनोमन सुन्न झालेल्या ओपेनहायमर च्या तोंडुन त्याला नकळत गीतेतला श्लोक बाहेर पडला होता." दिवो सूर्य सहस्त्रस्य भवेद्युशपदत्थिता. यदि भा: सदृशो सांस्यात भासस्तस्य महात्मन:" भगवद्गीता 11- 12.जर सहस्त्र सुर्याचं तेज एकाच क्षणी आकाशात प्रकटलं तर ती प्रभावळ त्या परमात्म्याची असेल.' कालोस्त्री- लोकक्शय् कृत्प्रवृत्ती' 'मी काळ आहे. विनाशासाठी प्रवृत्त झालेला.' म्हणूनच ओपेन्हायमारनं बॉम्ब टाकण्याऐवजी पॅसिफिक महासागर आपण जपानी सैन्याला त्याची प्रचिती देऊ, असा पर्यायही दिला होता. पण त्या आवाहनाला प्रतिसाद न देता हिरोशिमा आणि नंतर नागासाकीवर बॉम्ब टाकण्यात आले. असं म्हणतात की महिनाभर आधी जेव्हा चाचणी ओपेनहायमर व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतली होती, तीचं सर्व रेकॉर्डिंग त्यांच्या प्रयोगशाळेत झालं व तिथे सर्व पाहत होते. त्या रेकॉर्डिंग मध्ये प्रयोगशाळेतील त्यांचे संवादही रेकॉर्ड झालेले आहेत. त्याच् रेकॉर्डिंग मध्ये ओपेनहायमरच्या तोंडून निघालेला गीतेचा वरील श्लोक हाही रेकॉर्ड झाला आहे. आता काय म्हणायचं, योगायोग की परमेश्वरी चमत्कार? कारण ओपेनहायमरला गीता अवगत होती का? नेमका हाच श्लोक त्याप्रसंगी त्याच्या तोंडून कसा निघाला? इंडियन न्यूक्लियर सोसायटी न्युज सारख्या जर्नल वर व त्यातील

शास्त्रज्ञ डॉक्टर बाळ फोंडके यांच्या लेखावर विश्वास ठेवायचा नाही का? मग या परमेश्वरी चमत्कारावर श्रद्धा विश्वास का ठेवायचा नाही? गजानन ग्रंथात लिहिल्याप्रमाणे श्री जोशी हे रेव्हेन्यू अधिकारी आपल्या नोकराला दमणी जुंपून घेऊन ये. असं सांगून शेगाव ला जायला निघतात. रस्त्यात माण नदी आडवी आली. आभाळ भरून आलेलं. गाडीवान म्हणतो अशा वेळी नदीत दमणी टाकणं धोक्याचं आहे साहेब. पण त्याचं न ऐकता त्याला जोशी दमणी पुढे चालव म्हणून सांगतात. नदि पार करायला सांगतात. अन अचानक मांण नदीला पुराचा मोठा लोंढा येतो. (अचानक असे नदीला लोंढे आलेले मी माझ्या खेड्यात प्रत्यक्ष पाहिले आहेत) आता आपण दमणी सह वाहून जाणार याची भीती जोशी आणि त्यांचा शिपाई दोघांनाही वाटते. जोशी महाराजांचा सारखा धावा करतात. गाडीवाल्याला डोळे मिटून कासरा सोडून द्यायला सांगतात. आणि काय चमत्कार थोड्याच वेळात द मणि पूरातून बाहेर येऊन पैलतीरावर थांबते. हा योगायोग की महाराजांचा चमत्कार. की जोशीच्या प्रार्थनेसाठी आणि विश्वासा साठी महाराजांनी धमणी तीरावर पोहोचवली? हे श्रद्धा आणि भक्तीचे बळ आहे. त्याची ताकद आहे. वरील ओपेनहायमरच्या उस्फुर्त श्लोक उच्चारण यावरून परत हेच म्हणता येईल कि नो सायन्स और टेक्नॉलॉजी कॅन प्रुव्ह ऑर डिस प्रुव्ह द गॉड. शेगाव चा राजा गजानन माझा या महानाट्याचा यशस्वी प्रयोग मागे डिसेंबर 2011 मध्ये अमरावतीच्या कलाकारांनी केला होता अत्यंत

चांगल्या प्रकारे व मेहनतीने तो सादर करण्यात आला त्या प्रयोगाला अमरावती करांची प्रचंड गर्दी झाली होती अमरावती करांची गजानन महाराजांवर खूप श्रद्धा आहे. नुसत्या अमरावतीत महाराजांची विस् तरी मंदिर असतील ह्या सर्व मंदिरांमध्ये दरवर्षी महाराजांचा प्रकट दिन व निर्वाण दिन साजरा होतो मोठ्या उत्साहाने सर्व भक्त तो साजरा करतात जवळ जवळ सर्वच मोठ्या मंदिरात महाप्रसाद होतो भाविक भक्तांच्या श्रद्धेचे हे प्रतिबिंब आहे दरवर्षी गजानन महाराजांच्या पोथीच्या जागतिक पारायनाला अन प्रकट दिनी होणाऱ्या पारायणाला मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आणि तो दिवसेंदिवस वाढत चालला आहे तसंच अमरावती ते शेगाव पायी यात्रा सुद्धा आयोजित केल्या जाते व बरेच भक्त दरवर्षी त्यात भाग घेतात अशी ही श्रद्धा.

# कालाय तस्मै नमः

‘ जानता हूँ वक्त हर दुखी दवा है पर इस आगको बुझ ने ना दे, यादे वह हवा है ‘ कालाय तस्मै नमः. असं म्हणतात की कुठल्याही दुःखावर काळासारखा दुसरा उपाय नाही. असेही म्हणतात की जसे दिवसामागून दिवस जायला लागले की हळूहळू दुःखाची तीव्रता कमी होते अन पुढे पुढे तर त्याचा विसर पडतो. माझ्या पत्नीचं निधन व्हायला आज एक वर्ष होतंय. मागच्या वर्षी आठ नोव्हेंबरला अकस्मात ती वारली. ती वारल्यानंतर दैनिक हिंदुस्थान मध्ये ’ द शो मस्ट गो ऑन ‘ हा माझा लेख प्रकाशित झाला होता. त्या लेखाच्या शेवटी मी 1960 ला नव्या वर्गात बुलढाण्याला शिकत असताना पाहिलेल्या ’ दोन घडीचा डाव ‘ ह्या मराठी चित्रपटातलं एक गाणं लिहिलं होतं. त्याचं शेवटचं कडवं असं होतं—“ मरणारा तो जगास मुकतो, त्याच्या मागे कोणी उरतो, दोन दिवसात ची शोक विसरतो, ओसरुनी रडे, सारखा काळ चालला पुढे. “ खरंच ही जग वहिवाट आहे. दोन दिवसात लोक शोक विसरतात; पण त्यादुःखाची तीव्रता कमी होईपर्यंत आणि नंतरही माणसाला कुठल्या मनस्थितीतून जावं लागतं हे गेलं वर्षभर मी अनुभवतो आहे. आणि आता ही अनुभवत आहे. माझी पत्नी मला

अचानक सोडून गेली आणि ती गेल्याबरोबर माझ्या जीवनात अनेक स्थित्यंतरे आली. त्यातला सगळयात मोठं म्हणजे मला माझं अमरावती चं घर सोडून मुलाकडे पुण्याला राहायला जावं लागलं. ती वारल्यानंतर पंधरा-वीस दिवसातच माझा मुलगा, जावई मुलगी आणि सून सगळेच म्हणायला लागले की बाबा आता एकटं अमरावतीला राहायचं नाही. आमच्या बरोबर पुण्याला चला. मी दोन-तीन दिवस सर्व गोष्टींचा सारासार विचार केला. त्यावेळी मी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या टेक्निकल शाखेचा ॲडव्हायझर म्हणून काम करत होतो. कॉलेजात एक दिवस माझे मित्र प्राचार्य डॉक्टर मराठे, डॉक्टर चेंडके आमचे रजिस्टर ढोले व रविभाऊ भांडेकर एकत्र बसलो होतो. मी त्यांना माझी मुलं पुण्याला शिफ्ट होण्याविषयी सांगत आहेत असं सांगून त्यांचा सल्ला मागितला. प्राचार्य मराठेतर म्हणाले सर तुम्ही एकटे कसे, आम्ही आहोत ना सर. आपल्या कॅम्पस मध्ये माझ्या शेजारी राहायला या अन कामात आपलं मन बुडवून टाका. रवी भाऊ खांडेकर हसत हसत म्हणाले सर तुम्ही नशीबवान आहात की तुमची मुलं तुम्हाला त्यांच्या जवळ राहायला बोलावताहेत. नाहीतर आजकाल मुलांना आपले म्हातारे आई बाप नको असतात. आईबापांना वृद्धाश्रमाची वाट दाखवतात. खरंच मी नशीबवान आहे. सर्व गोष्टींचा विचार करून पुण्याला मुलाकडे मी राहायला गेलो. एखाद्या पोरक्या मुलाला सांभाळावं तशी माझी मुलं माझी काळजी घेतात. आज दुसऱ्यांदा,

चार महिन्यानंतर माझ्या घरी अमरावतीला आलो. घरात आलो अन सर्व आठवणी परत येऊन सारखे डोळे भरून यायला लागले. गेल्या पंचेचाळीस वर्षाच्या माझ्या जीवनाचा पटल माझ्या डोळ्यासमोर सरकायला लागला. काल रात्री अकरा वाजता झोपलो आणि एक वाजताच जाग आली. परत झोपच येईना. मग समोर कागद पेन घेतलं आणि हे लिहायला बसलो.

अमरावती सोडणं हे मी म्हटल्याप्रमाणे माझ्या जीवनातलं मोठं स्थित्यंतर. मग सगळी दिनचर्या बदलणं, मित्रपरिवार बदलणं, ते फ्लॅट सिस्टिम मध्ये राहणं, जेवण्या खाण्या मध्ये झालेले बदल, हवामान अशा अनेक स्थित्यंतरां मधून मी जातो आहे. खरं म्हणजे मला कसलीही खंत नाही. काही कमी नाही. पण तिच्या जाण्याच्या एका वजाबाकी नं माझ्या जीवनाची बेरीज शून्य झाली आहे. आयुष्यभर तिनं सुखदुःखात चढाव उतारात, लहान मोठ्या गोष्टीत मला दिलेली साथ आठवली की आता जीवन कधी कधी अर्थहीन वाटायला लागतं. सर्व चांगलं आहे. आयुष्य व्यवहार अर्थानं मजेत चाललंय. पण सुरुवातीला मी म्हटल्याप्रमाणे" इस आग को बुझने ना दे, यादे वह हवा हप." हे खरंच आहे. माझं पुण्याचं रुटीन अगदी सेट झालंय. सकाळी माझ्या दोन्ही नातवांना शाळेत सोडणे, कधी टेक्निकल, कधी साहित्य लिहिणं, वाचन, इन्व्हाईट टॉकसला जाणं, एम.टेक पीएच.डी परीक्षेला परीक्षक म्हणून बऱ्याच इंजीनियरिंग महाविद्यालय जाणं. आणि सगळयात मोठं म्हणजे मराठी कादंबऱ्या कथा

लेख वाचणं हे माझं रुटीन. खरं म्हणजे साहित्य वाचण्यात माझा अर्धा वेळ जातो आणि त्यात माझं मनही गुंतत. गेल्या अकरा महिन्यात मी पु.ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, जयवंत दळवी, विद्याधर पुंडलिक, शांता शेळके, व. पु. काळे भाऊसाहेब खांडेकर, शशी देशपांडे यांची किमान 70 तरी मराठी पुस्तकं वाचली. वाचन हा खरा सर्वार्थानं दुःख विसरण्याचा विरंगुळा आहे. बऱ्याच वेळा मी माझ्या मुलाचं, त्याच्या मित्रांचं( सर्व आय टी वाले) धकाधकीचं अन घाईचं जीवन पाहतो. या मंडळीचं वाचन शून्य आहे. वेळात वेळ काढून आपला वाचनाचा छंद जोपासणं या पीढीत शंभरात फक्त पाच ते दहा जणांना जमतं. मग मला वाटतं वाचण्याच्या आनंदाला मुकणार्या ह्या दुर्दैवी पिढीचं उतारवयात आयुष्य कसं जाईल. माझ्या अनुभवावरून सांगतो वाचनाचा छंद मी जीवनभर जोपासला आणि माझ्यावर कोसळलेल्या दुःखाची तिव्रता कमी करण्यात त्याचा केवढा मोठा वाटा आहे हे मलाच महित आहे. सांग कधी कधी तर आठवणींचं चक्र सुरू झालं तर मला रात्री दोन वाजता जाग येते. डोळ्याला डोळा लागत नाही. आणि मग सकाळपर्यंत मी एखादं पुस्तक हातात घेतो आणि वाचत राहतो. वाटतं हे नसतं तर कसा वेळ गेला असता. रात्री गेल्य असत्या? कदाचित माझ्यासारख्या एकट्या झालेल्या, पतीची किंवा पत्नीची साथ सुटलेल्या अनेक बंधू-भगिनींचा हाच अनुभव असावा. आज तिला जाऊन एक वर्ष

झालं. तिच्या पावन स्मृतीला मी अभिवादन करतो. माझ्याच दोन ओळीत मला असं म्हणता येईल, "

"कौन कहता है तुम चली गई, तुम तो मेरे पास हो. वो घंटो बाते करना वो हसना, मिठी आवाज का एहसास है. जो बिती उससे बहुत कम बची है जिंदगी,यह काल मेरा साथ दे, बस यह ही है बंदगी. " कालाय तस्मै नमः महा कालाय तस्मै नमः

# छंद

आयुष्यात प्रत्येकाला काही ना काही छंद असतो. कोणी त्याला हॉबिज म्हणतात कोणी नाद म्हणतात. छंद अनेक प्रकारचे असतात. कोणाला गायचा तर कोणाला नृत्याचा. कोणाला नाटकाचा तर कोणाला वेगवेगळे खेळ खेळण्याचा. वाचनाचा, लेखनाचा असे अनेक आणखी कितीतरी छंद सांगता येतील. आता आता रीतसर मुलगी पाहण्याचे किंवा दाखवण्याचे प्रकार कमी झाले आहेत. पण थोड्या वर्षापूर्वी हा प्रकार फार व्हायचा. मग मुलाकडील मंडळी मुलगी पाहायला आली की नाव गाव हे जुजबी प्रश्न झाल्यानंतर ‘ तुला काय छंद आहेत, किंवा तुझ्या काय हॉबीज आहेत?’ हा प्रश्न हमखास विचारायची. सर्वसाधारणपणे सर्वच मुली या प्रश्नाचं ठराविक उत्तर द्यायच्या. म्हणजे कुकिंग, पेंटिंग, गायन, विणकाम इत्यादी हॉबीज सांगायच्या. त्यामुळे एखाद वेळी पाहायला आलेली मंडळी फार चौकस असली तर लागलीच एखाद चित्र काढून दाखव किंवा तुला आवडेल ते गाणं म्हणून दाखव असं पुढे म्हणायचे. आणि केवळ उत्तरादाखल उत्तर दिलेल्या मुली यामुळे अडचणीत यायच्या. यापेक्षा मला जुडो कराटे चा छंद आहे असं एखाद्या मुलीने सांगितलं तर त्याची मात्र

कोणी ट्रायल घ्यायचं नाही. छंद कसलाही असो, तो मनापासून जोपासला तर त्यातून आनंदही भरपूर मिळतो. बऱ्याच जणांना एकापेक्षा अधिकही छंद असतात. आवडी असतात. आता माझंच सांगायचं झालं तर मला ब्रिज खेळणं आवडतं, संगीत- गाणं ऐकणं, मग ते लावणी कव्वाली पासून राग मालकंस पर्यंत सगळं आवडतं. भरपूर वाचन करणं, नाटकात काम करणं असे अनेक छंद आहेत मला. आणि मी समतोल ठेवून ते सर्व आयुष्यभर जोपासत आलो आहे. या आवडीनपैकी,छंदांपैकी काहीवेळा काही अपरिहार्य कारणामुळे, वैयक्तिक,कौटुंबिक अडचणींमुळे काही छंदांना, आवडींना काही काळपर्यंत बाजूला ठेवायला लागतं. पण परत वेळ मिळाला की ती उर्मी दबत नाही, वर येतेच. मला नाटकात काम करायची, अभिनयाची अगदी पाचवीपासून खूप आवड होती. तो छंद होता माझा. त्यामुळे मी माझ्या शालेय जीवनात, महाविद्यालयात एकूण दहा-बारा नाटकात काम केलं. अभ्यास सोडून हा वेगळा वेळ त्यासाठी द्यावा लागायचा. मग घरच्यांची नाराजी, स्वतःची अभ्यास बुडत असल्याची खंत, अशा अनेक तडजोडी करायला लागायच्या. पण थोडे जादा तास अभ्यास करू, असं मनाला समजावून मी नाटकात भाग घ्यायचो. शालेय जीवनात दरवर्षी हे मी केलं. पुढे युनिव्हर्सिटी बीएस.सी. पार्ट-1ला मी अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात आल्यानंतर मात्र नाटकांना ब्रेक लागला. कारण विदर्भ महाविद्यालया मध्ये तीव्र स्पर्धा होती. विदर्भ

महाविद्यालयात बी. ए., एम. ए. ,बी. एस सी., एम. एससी. चे सिनियर विद्यार्थी असताना आमच्यासारख्या जुनियर्सना कोण विचारणार? पण पुढे इंजिनीअरिंगच्या शिक्षणासाठी गव्हर्नमेंट इंजिनीरिंग कॉलेज औरंगाबाद ला गेल्यानंतर मात्र अगदी प्रथम वर्षापासूनच परत संधी मिळाली. मला आठवतं, आम्ही प्रथम वर्षाला असताना आमचे प्रभारी प्राध्यापक देशपांडे आणि प्राध्यापक आंबेकर सरांनी दोन मोठ्या एकांकिका करण्याचे ठरवले. कारण जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना भाग घेता यावा हा त्यांचा उद्देश होता. मला पु ल देशपांडे लिखित' विठ्ठल तो आला आला' या एकांकिकेत रोल मिळाला' चांगला रोल होता व त्याला स्कोप होता. मी चांगली केली ती भूमिका. आमच्या सगळयाच मित्रांनी आपापल्या भूमिका छानच केल्या. तालमिच्या वेळी सरांच्या लक्षात आलं की ही सर्व मुलं चांगले कलाकार आहेत.निपुण आहेत. म्हणून, तीन-चार दिवस तालमी झाल्यानंतर, आमचे दोन्ही सर एक दिवस आम्हाला म्हणाले “यावर्षी आपण स्नेहसंमेलनात आणखी एक नवीन प्रयोग करू. आम्ही ठरवलंय,आपण यावर्षी 35 ते 40 मिनिटांचा एक नाट्य वाचनाचा कार्यक्रम करायचा. म्हणजे पात्रांनी आपले स्क्रिप्ट हातात घेऊन आपापल्या पात्राचे डायलॉग्स खुर्चीवर बसून वाचायचे. अभिनय वगैरे काही नाही. फक्त आवाजाचे चढ-उतारावरून, संवादाच्या फेकी वरून परिणाम साधायचा. स्टेजवर पडदा उघडा राहील, तुम्ही बसलेले व समोर प्रेक्षक.” आम्ही सर्वांनी पहिल्यांदा सरांना विरोध

केला. म्हटलं ‘सर गॅदरिंगचा मूड असतो कोणीही ऐकणार नाहीत. सगळं फेल होईल.’ सर म्हणाले ‘हेच तर पाह्यचय आम्हाला. तुम्ही सगळे इतक्या चांगल्या आवाजात वाचणारे, बोलणारे आहात. शिवाय आम्ही दोन-तीन प्रवेश, प्राध्यापक वसंतराव कानेटकर यांनी लिहिलेल्या’ रायगडाला जेव्हा जाग येते’ या नाटकातले निवडले आहेत. ते अत्यंत उत्कृष्ट व भावपूर्ण आहेत. त्यात मुख्यता संभाजी- येसूबाई नंतर त्याच कडीला जोडून असलेला शिवाजी- येसूबाई आणि शेवटी शिवाजी महाराज वारल्यानंतर ते मरतांना काय म्हणाले यावरचे राजाराम आणि संभाजी चे डायलॉगज फार भावस्पर्शी आहेत. आपण वाचनाची रोज तालीम घेऊ. अजून पंधरा दिवस आहेत. प्रयत्न करू. हा एक नवा प्रयोग होईल.’ मग त्यांनी त्या नाटकातील शिवाजी, संभाजी, सोयराबाई, येसूबाई ,राजाराम, हंबीरराव, मोरोपंत या पात्रांसाठी आम्हा सात मुलांचं वाचन घेऊन त्यांची निवड केली. माझी निवड शिवाजी महाराजांच्या वाचनासाठी झाली. मग आम्ही आमच्या एकांकिकेच्या तालमी नंतर नाट्य वाचनाची प्रॅक्टिस सुरू केली. पहिल्या दोन-तीन वाचनानंतर या नाटकानं आमची चांगली पकड घेतली. आणि आम्ही जीव ओतून आवाजाचे चढ-उतार, गांभीर्य, वेदना, सगळं आवाजातून परीणाम साधू लागलो. सरांचा विश्वास वाढत गेला. मग अगदी रंगीत तालमीच्या दोन दिवस अगोदर सरांनी आमच्या कॉलेजमध्ये फायनल इयर मेकॅनिकल च्या जिंदानि ह्या एका विद्यार्थ्याला त्याची व्हायोलिन घेऊन

बोलावलं. तो मुलगा मुंबईचा अन सिंधी होता. आमच्या होस्टेलमध्ये राहायचा. अगदी सुरेख वायलिन वाजवायचा. मला तर त्याचं ते प्रोफेसर या सिनेमा मधलं मोहम्मद रफी ने म्हटलेलं,ऐ, गुलबदन,ऐ गुलबदन, हे गाणं अजूनही आठवतं. खूप सुरेख वाजवायचचा. सरांनी त्याला बोलावून, सर त्याला म्हणाले जिंदानी हमारे लडके गॅदरिंग मे मराठी नाटक तीस-पस्तीस मिनिट तक पढने वाले है. वह स्टेज पर बैठकर पढेंगे. वह जब पढेंगे तब तुम पिछे खडे होकर वायलिन पर सिच्युएशन के लिए और हर मुड के मुताबिक, पिछेसे व्हायलीन पर बॅक ग्राऊंड म्युझिक बजाओगे. आज यह ऊनका सुनकर कलसे उनके साथ वायलिन की प्रॅक्टिस करना, और फिर फायनल. तो म्हणाला ठीक है सर. त्यादिवशी ते बोलणे झाल्यानंतर रात्री आम्ही जेव्हा होस्टेलवर परत जायला निघालो तेव्हा मी जिंदानीला म्हणालो” जिंदानिसाब तुमको मराठी तो समझता नही.फिर हम क्या पढ रहे है ये तुमको कैसे समजेगा? समजा नही तुम बॅकग्राउंड कैसे बजाओगे? तो हसला म्हणाला ‘अरे यार, तुम सातो के सात इतना अच्छा पढ रहे हो की तुम्हारी आवाज परसेही मै सब समझ जाता हू. कल देखना मेरा कमाल. आमच्या नाट्यवाचनाला मिळालेली ही लाखमोलाची पावती होती. तिने आमच्या गृपचा विश्वास वाढला. दुसऱ्या दिवशी आम्ही सरांनाही ते सांगितलं. सर खुष झाले. खरंच अत्यंत प्रामाणिकपणे सांगतो, गॅदरिंग मध्ये ते नाट्य वाचन करतांना पस्तीस चाळीस मिनिटं आम्ही त्या गॅदरिंगच्या मूडमध्येही

विद्यार्थी- प्राध्यापक आणि सर्व प्रेक्षक व वृद्धांना खिळवून ठेवलं. आमच्या नाट्य वाचनाचा तो कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला.त्या नाटकातले संभाजी येसूबाई व शिवाजी येसूबाई यांच्यामधल्या संभाषणाची मला इतकी आवड निर्माण झाली, त्यांनी इतकं माझ्या मनात घर केलं, की ते दोन्ही प्रसंग मी पाठ करून टाकले. पुढे मी जवळजवळ दहा वर्ष अमरावती व औरंगाबाद येथे प्राध्यापक असताना नाटकाचा प्रभारी प्राध्यापक होतो. आणि त्यावेळी मी जवळ जवळ दहा नाटकं दिग्दर्शित केली. त्यापैकी अमरावतीला केलेल्या" वाजे पाऊल आपुले" या विश्राम बेडेकर लिखित नाटकाला तर खोलकुते ढाल स्पर्धेत विदर्भ स्तरावर आम्हाला दुसरं बक्षीस व माझ्या दोन विद्यार्थ्यांना अभिनयाची दुसरी व तिसरी पारितोषिकही मिळाली. त्या वेळी कधी कधी मी गॅदरींगमध्ये,अन पुढे पुढे काही प्रसंगी 'रायगडाला जेव्हा जाग येते' यातले ते दोन प्रसंग मी एक पात्री करून दाखवले आहेत. या एकपात्री वरून मला आणखी एक प्रसंग आठवतो. मी फायनल इयर इंजीनियरिंग ला असताना आमच्या स्नेहसंमेलनासाठी 'मुंबईची माणसं' हे बाळ कोल्हटकर यांचं तीन अंकी नाटक करायचं ठरलं. पात्रांची निवड करण्यासाठी विद्यार्थ्यांना ज्यादिवशी बोलावलं त्या दिवशी मी ट्रायल ला गेलो नाही, कारण पहिल्या सत्रात मी जवळजवळ तिन आठवडे आजारी होतो व 15 दिवस तर मेडिकल कॉलेजमध्ये ऍडमिट होतो. त्यात माझा बराच अभ्यास बुडाला. क्लासेस तर आलेच पण प्रॅक्टिकल्स मागे राहीले. मला बरेचशे

विषयही कव्हर करायचे होते. मी ते आटोक्यात आणू शकलो नाही. मी प्रथम व दुसऱ्या वर्षाला नाटकात कामं केली होती. आता फायनल इयरला ते ही आजारात काही आठवडे गेल्यानंतर, नाटकात काम करायचं नाही असं मी ठरवून ठेवलं होतं. ट्रायलला मी गेलोच नाही. आमचे प्रभारी प्राध्यापक दोन तीन दिवसानंतर मला म्हणाले की अरे त्या नाटकातल्या श्यामच्या वडिलांच्या रोलसाठी म्हणजे पाटलाच्या रोलसाठी आम्ही तुझी योजना करून ठेवली होती. का आला नाहीस असं त्यांनी विचारलं. मग मी त्यांना सर्व सांगितलं. म्हटलं सर माझा खूप वेळ गेला असता. त्यांच्या तालमी सुरू झाल्या. माझा एक मित्र, फायनल इयर सिव्हील चा धर्माधिकारी हिरोचं म्हणजे श्याम चे काम करत होता. आठ नऊ दिवसांनी एक-दोन वेळा त्यांच्या तालमी पाहायला मी गेलो. आणि रूम वर परत आल्यावर अस्वस्थ झालो. माझं मन त्या नाटकाच्या छंदामुळे, आवडीमुळे मला स्वस्थ बसू देईना. होस्टेलमध्ये आमचे विदर्भाचे 8-9 मित्र होते व आमचा एक जवळचा ग्रुप होता. सर्व चांगले होते. मी त्यांना सहज म्हणालो माझ्या ह्या अवस्थेबद्दल. त्यातले दोन मित्र म्हणाले. अरे यार अजून आठ-दहा दिवस आहेत. तू एखादं छोटसं एक पात्री बसव. आपण येथेच प्रॅक्टिस घेऊ होस्टेलमध्ये. तुझा जास्त वेळ जाणार नाही. तू खरच कर, एक पात्री. हा ही एक नवीन प्रयोग होता व माझी हौसही फिटणार होती. वेळ खूप जाणार नव्हता. मग आम्ही पुढच्या एक-दोन दिवसात पु ल, जयवंत दळवी,

वसंत सबनीस अशा लेखकांची एकांकी ची काही पुस्तकं मिळवली. आम्हाला विनोदी एकपात्री करायचं होतं. मी दोन चार एकांकिका पाहून साधारण तिस-पस्तीस मिनिटात करता येईल असं एक विनोदी, वसंत सबनीस यांचं ' चोर आलेच पाहिजेत ' हे करायचं ठरवलं. त्यात पाच पात्र होती. एक कारकून असलेला मध्यमवर्गीय, त्याची बायको, दोन चोर व एक पोलिस हवालदार. ही पाचही पात्र मला करायची होती. मग मी ते पाठ केलं. अभिनय आवाज सर्वांची आम्ही होस्टेल मध्येच प्रॅक्टिस केली. अगदी सहा सात दिवसात झकास व्हायला लागलं. आमच्या सर्व ग्रुपला खूप आवडलं. आम्ही रूमवर ते करायचो. सर आपल्याला नक्की परवानगी देतील असं आम्ही गृहीत धरून गॅदरिंगच्या प्रभारी प्राध्यापकांना न विचारता हा उद्योग केला होता. मग अगदी चार दिवस आगोदर आम्ही आमच्या नाटकांच्या सरांकडे गेलो. ते म्हणाले तीन अंकी नाटकाच्या दिवशी आम्ही तुला वेळ देऊ शकणार नाही. तू ते तिसऱ्या दिवशी छात्र रजनी म्हणजे स्टुडंट्स नाईट मध्ये कर. मग आम्ही छात्र रजनीचे प्रभारी प्राध्यापक ताम्हणकर, यांच्याकडे गेलो. ते म्हणाले शक्य नाही. आमचे सगळे कार्यक्रम आता फिक्स झाले आहेत. तुला कुठून वेळ देणार. आम्ही सर्व मित्र खट्टू झालो. पण जिद्द सोडली नाही. मग आम्ही थेट स्नेहसंमेलनाचे प्रभारी प्राध्यापक बक्षी होते, त्यांच्याकडे गेलो आणि त्यांना विनंती केली. स्टुडंट नाईट मध्ये फक्त अर्धा तास मला द्या. ते नाहीच म्हणत होते. आम्ही सारखी विनंती करत होतो.

शेवटी ते म्हणाले परवा तीन अंकी नाटकाची रंगीत तालीम आहे. ती पाहायला प्राचार्य व सर्व विभाग प्रमुख येणार आहेत. तू परवा त्यांची तालीम झाल्यावर सर्वांनसमोर हे करून दाखव. सर्वांना आवडलं तर आम्ही छात्र रजनीत तुला अर्धा तास देऊ. हे ही नव्हे थोडके असं म्हणून आम्ही खूष झालो. दोन दिवस परत चांगली प्रॅक्टिस केली. नाटकाच्या रंगीत तालमीच्या दिवशी तिन अंकी ची तालीम झाल्यानंतर बक्षी सरांनी स्टेजवर येऊन माझ्याबद्दल सांगून अर्धा तास थांबण्याची सर्वांना विनंती केली. मी तयार होतोच. माझ्या एका मित्राने तिन मिनिटात त्या एकांकी ची थीम व पात्र कोण कोणती आहेत ते सांगितलं. अन मग मी सुरु करून बरोबर पस्तीस मिनिटात संपवून सर्वांना नमस्कार करून स्टेजवर उभा राहिलो. जे घडलं ते खरं खरं लिहितोय. सगळ्यांनी कडकडून टाळया वाजल्या. आमचे प्राचार्य प्राध्यापक नगरकर तर उठून उभे राहिले आणि म्हणाले" बक्षी, कोण हो हा मुलगा? कुठल्या वर्गाचा? त्याला बोलवा." बक्षी सरांनी माझ्याबद्दल त्यांना सर्व सांगितलं आणि मला खाली बोलावलं.आमचे प्राचार्य म्हणाले 'अहो बक्षी अगदी उत्तमच केलं ह्या मुलानं. तुम्ही असं करा, उद्या संमेलनाच्या उद्घाटनाला रणजित देसाई येणार आहेत. त्यांचं उद्घाटनाचं भाषण, सर्व उद्घाटन कार्यक्रम झाल्याबरोबर प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत या मुलाचं हे एकपात्री करायचं. मी त्यांना अर्धा-पाऊण तास थांबवून घेईन. आणि याचं संपल्यावर आपण पाहुण्यांना जेवायला घेऊन जाऊ.' त्यांनी माझ्या पाठीवर

थाप मारली आणि म्हणाले शाबास. बक्षीसर मला म्हणाले, आता उद्या मस्त कर. आम्हा सर्व मित्रांचा आनंद गगनात मावेना. मी देवाजवळ प्रार्थना केली देवा उद्याचा माझा प्रयोग ह्याहून चांगला होऊ दे. मग आम्ही दुसऱ्या दिवशी सर्व तयारी- कपडे. लागणारी प्रापर्टी, सर्व घेऊन वेळेत हजर होतो. उद्धाटन समारंभ संपल्यावर पाच मिनिटात आम्ही स्टेज लावलं. आणि पडदा वर गेला. बरोबर 35 मिनिटं माझा एक पात्री प्रयोग झाला. टाळ्या पडल्या.रणजित देसाई साहेबान्नी मला खाली बोलावलं.त्यान्नी माझी पाठ थोपटली. मी त्यांच्या पाया पडलो. त्यांनी एका छोट्या बॅगेतून एक पुस्तक काढून मला बक्षीस दिलं. मी, माझे सर्व मित्र मग दोन तास जल्लोष करत होतो. छात्र रजनीतही तीस मिनिटे न मिळणाऱ्या मला, प्रमुख पाहुण्यांसमोर माझा प्रयोग करता आला हा ,माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा क्षण होता. आयुष्यभर ते क्षण मी जोपासून आहे' अस् असतं छंदांचं. हॉबीजचं. त्यांची उर्मी कधी दाबून ठेवता येत नाही. पण अशा या छंदामुळे जीवनात किती आनंद मिळतो, विरंगुळा मिळतो तो सर्वांनी अनुभवला असेल. ज्यांनी अनुभवला नसेल त्यांनी तो अनुभवावा. त्याचं वेगळं वर्णन करण्याची मला गरज वाटत नाही. कुणीतरी ह्याच्या पलीकडे जाऊन म्हटलं आहे "असा धरी छंद, जाई तुटूनिया भवबंद " आपल्याला भवबंद तोडायचे नाहीत. आपण सामान्य माणसं आहोत. पण इतक्या आनंदात आपणला रममाण होता आलं पाहिजे. असे हे छंद.

# पारीख मॅडम

काही काही व्यक्तींचा आपल्या जीवनावर खूप प्रभाव असतो. माझ्या स्वतःच्या जीवनावर ज्या ज्या व्यक्तींचा प्रभाव पडला असं मला वाटतं त्यात पारीख मॅडम एक आहेत. मी एक इंजिनिअरिंग कॉलेजमधील प्राध्यापक होतो. शिकवणं व त्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी आत्मसात करणं हे ओघानचं आलं. ह्या बाबतीत मला मॅडमचा कधीच विसर पडणार नाही. मुंबईतल्या आय आय टी मधल्या मेकॅनिकल डिपार्टमेंटच्या डॉक्टर प्रविणा पारीख या प्राध्यापक होत्या. त्यांना सेवानिवृत्त झालेल्यालाही आता पंचवीस वर्षे झाली आहेत. मी अमरावतीच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये 9 वर्ष शिकवल्यानंतर आयआयटीत नियमित विद्यार्थी म्हणून दोन वर्षाचं एम.टेक. करायला 1975 मध्ये प्रवेश घेतला. त्यावेळी आम्हाला एम.टेक च्या प्रथम वर्षी दहा विषय व एक एक्सपेरिमेंटल लॅबोरेटरी असे कोर्स होते. नंतर दुसऱ्या वर्षीच्या पूर्वार्धात आणखी तीन विषय, दोन क्रेडिट सेमिनार व प्रोजेक्ट ची पहिली स्टेज करायची व शेवटचे सहा महिने म्हणजे चौथ्या सेमिस्टर मध्ये उरलेलं प्रोजेक्ट पूर्ण करायचं व त्यावर थेसिस लिहून,त्या प्रोजेक्ट रिपोर्ट ला आयआयटी मध्ये सबमिट

करायचं. त्याला तिथे एम.टेक डिझरटेशन असं म्हणतात. मग त्याच्यावर परीक्षा -प्रेझेंटेशन व्हायचं. साधारणत: त्याच्या पुढच्या दोन-तीन महिन्यात आमचं एम.टेक पूर्ण व्हायचं. मी प्रथम सेमिस्टरला एक आणि द्वितीय सेमिस्टरला एक असे ,दोन विषय पारीख मॅडमचे केले. त्या प्रथम सेमिस्टरला एस आय ईंजिंस, म्हणजे पेट्रोल वर चालणारे इंजिन्स, आणि दुसऱ्या सेमिस्टरला सि.आय.ईनजिंस,( डिझेल वर चालणारे इंजिन) असे दोन विषय घ्यायच्या. या विषयातल्या त्या अतिशय तज्ञ होत्या. देशभरात, एवढेच नाही तर इतर देशांमध्ये ह्या बद्दल त्यांचं नाव होतं, लौकिक होता. त्या अत्यंत सखोल अभ्यास करून शिकवायच्या. शिकवणं अगदी नियमित व साचेबद्ध. कधी एक मिनिट उशिरा वर्गावर आल्याचं मला आठवत नाही. आवाज सर्वांना ऐकू येईल असा खणखणीत पण अतिशय मृदू बोलायच्या.सर्वांना ऐकायला जाईल याची काळजी घ्यायच्या. आणि कधी चिडचिड नाही की त्रागा नाही, की उगाच आवाज चढवून बोलणं नाही.त्या अतिशय तन्मयतेनं शिकवायच्या. समोर बसलेल्या विद्यार्थ्यांना मानानं वागवायच्या. She truly knew,what is students dignjty. कधी आमच्या पैकी कोणाला प्रश्न विचारला आणि एखाद्याने उत्तर चुकीचे दिलं तरी त्याला कधी हिणवायच्या नाही. किंवा नाउमेद करायच्या नाहीत. उलट उत्तर दुरुस्त करायला हिंट्स द्यायच्या, आणि त्या विद्यार्थ्याला उत्तराकडे घेऊन जायच्या. मी कितीतरी वेळा वर्गात त्यांना, चुकीचे उत्तर देणाऱ्याला.”

नो सर. हाऊ कॅन इट बी लाईक दॅट, जस्ट थिंक.' असं म्हणून पुढची हिट देतांना ऐकलं आहे. शिकवतांना मधून मधून एम आय क्लियर प्लीज? आर यू गेटिंग इट प्लीज? असं सारखं म्हणायच्या. मी हे शिकलोच पण माझ्या विषयाला आवश्यक असणाऱ्या अनेक गोष्टी मी मॅडम कडून शिकलो. प्रोफेसर सुखात्मे जे आमचे विभाग प्रमुख होते त्यांच्याकडूनही मी बऱ्याच गोष्टी शिकलो. कधीकधी सलग दोन-दोन तास पारीख मॅडम शिकवायच्या, पण कधीही कंटाळवाणं वाटायचं नाही. त्यांच्या दोन्ही विषयात मला सर्वोत्तम म्हणजे ए ग्रेड मिळाले. आणि त्या विषयांची मला गोडी लागली, अन मग पुढे त्याच विषयात माझं एम.टेक प्रोजेक्ट करायचं असं मी ठरवलं. आम्हाला शिकवणार्या प्रत्येक प्राध्यापकांकडे एक किंवा दोन एम.तेक. चे विद्यार्थी प्रोजेक्ट करीत. मॅडम माझ्या प्रोजेक्टसाठी माझ्या गाईड झाल्या आणि त्यांच्याकडे माझा आणखी एक मित्रही प्रोजेक्टला होता. त्यावेळी आय सी इंजिन एक्झॉस्ट एमिशन अँड एअर पॉल्युशन हा अतिशय संबंधित विषय होता. म्हणजे, पेट्रोल डिझेल इंजिन मधून ज्वलना नंतरचे जे गॅसेस बाहेर पडतात त्यांनी होणारं वातावरणाचं प्रदूषण. याच विषयावर नंतर पुढे मी 1981 ते 1984 या काळात मॅडमच्या मार्गदर्शनाखाली आय आय टीत पीएच.डी.ही केलं. असं हे एक वर्ष अन पीएच.डी.चे तीन वर्ष, असे चार वर्ष त्या माझ्या गाईड होत्या. अर्थातच त्यामुळे मी त्यांच्या खूप संपर्कात आलो. मी त्यांचा पीएच.डी.चा पहिलाच विद्यार्थी होतो. ह्या माझ्या चार

वर्षात मी त्यांना फार जवळून पाहिलं ,आणि त्यांच्याकडून अनेक गोष्टी शिकलो. त्या कुठल्याही गोष्टीत इतक्या काटेकोर असायच्या की कुठलीही तडजोड करायची नाही. वेळ मारून नेणे हे त्यांना मान्य नव्हतं. या संबंधात मला एक प्रसंग आठवतो. मी त्यांच्याकडे एम.टेक चा प्रोजेक्ट चा विद्यार्थी असताना त्याच वेळी त्या स्वतःही पीएच.डी करत होत्या. माझं चौथ् सेमिस्टर चालू असताना त्यांचं पीएच.डी.चं काम पूर्ण होऊन त्यांचा प्रबंध म्हणजे पीएच.डी.चा थेसिस त्यांनी आय आय टी ला सबमिट केला. डॉक्टर त्यागी व डॉक्टर सुखात्मे त्यांचे गाईड होते. त्याच्या थीसिस असेसमेंट चे दोन्ही परीक्षकांचे रिपोर्ट (त्यातला एक भारतातला आणि एक परदेशातला परीक्षक ) आल्यानंतर त्यांच्या प्रेझेंटेशनची व्हायवा म्हणजे मौखिक परीक्षा याची तारीख ठरली. त्याला आय आय टीत पीएच.डी. डिफेन्स असं म्हणतात. आयआयटी मद्रास्चे डॉक्टर शास्त्री परीक्षक म्हणून येणार होते. पंधरा दिवस अगोदरच हे मॅडम ना कळलं होतं. आयआयटी त पीएचडी चं काम परीक्षकां समोर व तज्ञ लोकांसमोर सादर करायला फक्त 40 ते 50 मिनिटांचा अवधी देतात. नंतर प्रश्न उत्तर होतात. तिन ते पाच वर्ष आपण जे संशोधनाचं काम करतो त्याच्या पार्श्वभूमी पासून आपण केलेली तयारी,रिसर्च ची पद्धती, त्यात आपले आलेले रिझल्टस, हे सगळं 40 ते 50 मिनिटात सादर करणं ही मोठी कसरत असते. त्यात अनेक आकृत्या, ग्राफ, समीकरणं, स्लाईड प्रोजेक्टर वर आणि ओवरहेड प्रोजेक्टर वर,

त्यांच्या मदतीने पडद्यावर दाखवून त्या समजावून सांगाव्या लागतात. 1975- 76 ला हल्ली सारखं पावर पॉइंट प्रेझेंटेशन वगैरे उपलब्ध नव्हतं. मॅडमनी मला एक दिवस बोलावलं आणि म्हणाल्या माझं ओवरहेड प्रोजेक्टर सगळं तुम्ही ऑपरेट करायचं आहे. मी प्रेझेंटेशन देत असताना मला ज्या ज्या आकृत्या पाहिजे असतील समीकरणे पाहिजे असतील ते तुम्ही माझ्याच फ्लोमध्ये पडद्यावर प्रोजेक्ट करायचं. आपलं ट्यूनिंग असं झालं पाहिजे की मी तुम्हाला इशारा करणार नाही किंवा नेक्स्ट, असं म्हणणार नाही. त्यासाठी आपल्याला एकत्र रिहर्सल करावी लागेल. मग आम्ही दोघांनी सुरुवातीला दोन रिहर्सल केल्या. नंतर मॅडमनी आपल्या विभागातल्या त्यांच्या प्राध्यापक मित्रांसमोर एक ट्रायल दिली व नंतर शेवटी त्यांनी आपले दोन्ही गाईड डॉक्टर त्यागी व डॉक्टर सुखात्मे यांच्या समोरही ट्रायल दिली. आणि नंतर त्यान्ना ज्या काही सूचना मिळाल्या त्याचा समावेश करून आपल्या फायनल डिफेन्स साठी त्या तयार झाल्या. डिफेंसच्या दिवशी त्यांचं प्रेझेन्टेशन अगदी सूत्रबद्ध, काटेकोर आणि वेळेच्या बंधनाला धरून झालं. ते तसं व्हावं म्हणून त्यांनी घेतलेली मेहनत मी प्रत्यक्ष पाहिली आणि त्यातून मी जे काही शिकलो ते आयुष्यभर मला उपयोगी पडलं. मी माझ्या एम.टेक.व पीएच. डी. दोन्ही कामाचे वेळी असं पाहिलं की त्या नेहमी खेळीमेळीने बोलायच्या. काही सूचना करायच्या असल्या तर अगदी चांगल्या पद्धतीने सांगायच्या. एवढंच काय, काही

जास्तीचे प्रयोग किंवा रिसर्च वर्क मधला एखादा नवीन मुद्दा शोधायचा असला, नवीन कल्पनेवर काम करायचं असलं, तर ते सांगताना अशा भाषेत सांगायच्या की मला टेन्शन येणार नाही. मित्रासारखं वागवायच्या. पण कामात कधी तडजोड नाही. जे पाहिजे, जसं पाहिजे तसं ते झालंच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता.एम.टेक. च्या दुसऱ्या वर्षाला, आणि पीएच.डी.ला तीन वर्ष, माझ्या बायको मुलांसोबत सोबत मी आयआयटीत राहिलो. मला त्या वेळी फॅमिली अकामोडेशन मिळालं होतं. बरेच वेळेला आम्हाला आयआयटीतून संध्याकाळी घरी जाताना उशीर व्हायचा, साडे सहा सात वाजायचे. अशावेळी मॅडम आणि मी माझ्या कामावर चर्चा करताना उशीर झाल्यामुळे त्या बऱ्याच वेळा मला म्हणायच्या ‘ चलो मै तुमको तुम्हारे घर छोड देती हू, और तुम्हारी बीबी को बोलती हू की,तुम्हारे मिया ने आज मेरा बहुत सर खाया. मेरे को कुछ चाय वाय पिलाओ.’ मग घरी पोचल्यावर आमच्या दारातूनच ओरडायच्या “प्रेम,(प्रेम हे माझ्या बायकोचं नाव) चलो भाई चाय पिला दो, कुछ खिला भी दो.” इतकं खेळीमेळीने सगळं व्हायचं. पण दुसऱ्या दिवशी सकाळी मला त्यांच्याकडे जाऊन माझ्या प्रयोगाचे काही रिझल्ट दाखवायचे असो की मी लिहिलेला पंधरा-वीस पानांचा रिपोर्ट दाखवायचा असो, मला खूप टेन्शन यायचं. कारण जर त्यांना ते पटलं नाही तर त्या चांगली हजेरी घ्यायच्या. काहीवेळा माझं लिहिलेलं त्यांना आवडलं नाही तर ते कागद परत माझ्याकडे

भिरकावून म्हणायच्या ' ये क्या लिखा है मेरे कुछ पल्ले नही पडता. राईट इट अगेन अँड एक्सप्लेन प्रोपर्ली व्हॉट यु वॉन्ट टू से.' म्हणून मी त्यांच्या रूममध्ये जाण्यापूर्वी रुमच्या व्हेंटिलेटर मधून त्या चांगल्या मूडमध्ये आहेत की नाही, तिथे आणखी कोण कोण बसलेलं आहे, ह्याचा अंदाज घ्यायचो आणि मगच आत जायचो. मी बऱ्याच वेळी त्यांच्या घरी जायचो. तिथे घरी वेगळयाच पारीख मॅडम मला दिसायच्या. त्यांचे मिस्टर पारीखसाहेब, टाटांच्या एका कंपनीत नोकरीला होते. ते महिन्यातून विस दिवस तर ह्या न त्या परदेशाच्या दौऱ्यावर असायचे. एक दौरा झाला की एक दोन दिवस घरी, परत दुसऱ्या दौऱ्यावर. मी पारीख मॅडमचा एक आदर्श गृहिणी चा अवतार घरी पाहायचो.पारीख साहेबांच्या कपड्यांना वेळी-अवेळी इस्त्री करणं, त्याची बॅग भरून देणं, त्यांना आवडेल ती भाजी स्वतः किचन मध्ये जाऊन करणं अशी अनेक कामं करताना मी त्यांना पाहिलं आहे. हे सगळं हसतच करायच्या/ त्या स्वतः संस्थेत इतक्या व्यस्त असून घरची सगळी कामं करायच्या. त्यांना मोठी मुलगी व धाकटा मुलगा होता. दोघांवर त्यांचा फार जीव होता. नेहमी त्यांचं त्या सगळं करायच्या आणि वेळ आल्यास त्यांचा अभ्यासही करून घ्यायच्या. हे सगळं त्या इतक्या सहजपणे करायच्या की मला आश्चर्य वाटायचं.बरं त्या दोघांचा मित्रपरिवारही मोठा. त्यामुळे नेहमी त्यांच्याकडे येणारे जाणारे असायचे. माझ्या बायकोला तर

नेहमी त्यांचं फार कौतुक वाटायचं. कितीतरी वेळा तिने तसं बोलूनही दाखवलं होतं.

मला आठवतं, 2002 ते 2006 पर्यंत मी नागपूरच्या रायसोनी इंजिनिअरिंग कॉलेजचा प्राचार्य असताना मी त्यांना आमच्या कॉलेजमध्ये एका एक्सपर्ट टॉक साठी बोलावलं होतं. त्या आनंदाने आल्या.माझ्या घरी दोन दिवस राहिल्या. त्याच दरम्यान त्या आयआयटीतून सेवानिवृत्त होऊन परत तिथेच प्रोफेसर म्हणून जायच्या. त्यांचं रिसर्च चालूच असायचं. पुढे त्यांनी मुंबईच्या के जे सोमय्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सोमय्या मंडळीच्या आग्रहाखातर दोन वर्ष डायरेक्टर म्हणून काम केलं. त्यादरम्यान मी मुंबईत एकदा त्यांना भेटलो, तर त्या मला म्हणाल्या " जाजू, तुमच्या राज्यपातळी च्या सर्व इंजिनीरिंग कॉलेज बद्दल माझं काही फारसं चांगलं मत नाहीये. मला विशेषता: स्टॉफ बद्दल खूप खंत वाटते. जाजूजी, इन कॉलेजेस मे का स्टाफ मेहनत और अभ्यास कर के पढाताही नही. वही पुराने नोटस.नये का काम नही. लेटेस्ट इंफॉर्मेशन नही. उनको अद्यावत कोई जानकारी नही रहती. ए तुम्हारे स्टाफ के लोग है ना, स्सल साल भर लायब्री मे से किताब नही लेते. ना ही जर्नलस पढते है. मैने खूद लायब्ररी मे जाकर लयब्ररीयन के रजिस्टर और कम्प्युटर से जानकारी ली तो मुझे पता चला. व्हेरी शॉकिंग. हाऊ डू दे टीच विदाऊट लेटेस्ट इन्फॉर्मेशन ॲंड इन द लेटेस्ट कॉन्टक्स्ट?" त्या म्हणाल्या" एकदा मी स्टाफ ची मिटिंग घेऊन त्यांना

याबद्दल विचारलं अन सांगितलं की पंधरा दिवसाच्या आत मला प्रत्येकानं आपापल्या विषयात, जगात आता काय चालू आहे, याबद्दल पंधरा-वीस पानाचं राइटप द्यायचं.” त्या म्हणाल्या काही लोकांना ते आवडलं नाही. सबबी सांगू लागले. अश्या अनेक गोष्टी. शेवटी ते सोडून मी परत आय आय टीत येऊन बसायला लागले. मागच्याच वर्षी मी त्यांना त्यांच्या घरी भेटून आलो. जवळजवळ ऐंशी वर्षाच्या त्याआहेत. पण अजूनही आय आय टीत जातात. जसे जमेल तसे त्यांचं ॲकॅडेमिक्स आणि रिसर्च चालू असतं. कोणत्याही संबंधित विषयावर अजूनही त्या चर्चा करतात. त्यांच्या मित्रपरिवारा प्रमाणे त्यांचा विद्यार्थी परिवारही फार मोठा आहे. आम्ही बरेच जण अजूनही त्यांच्या संपर्कात आहोत. त्यांनी आमचीच नाही तर आमच्या मुलाबाळांची नेहमी चौकशी केली आहे. त्यांच्याकडून शिकलेल्या अनेक गोष्टींची शिदोरी आमच्या बरोबर आहेच. त्यांच्याबरोबर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर माझे दहा शोधप्रबंध प्रकाशित झाले आहेत. त्यापैकी एकाला तर इन्स्टिट्यूशन ऑफ इंजीनियर्स इंडिया कलकत्ता या संस्थेचे आवार्ड ही मिळाले आहे.मी तिथे होतो, त्यावेळी त्यांच्याकडील बी, टेक. च्या बॅचला त्या प्रोजेक्ट द्यायच्या किंवा एम.टेक अथवा पीएच.डी च्या विद्यार्थ्यांना रिसर्च टॉपिक द्यायच्या, तेव्हा त्या रिसर्चच्या प्रयोगांचा उपयोग समाजाला किंवा इंडस्ट्रीला झाला पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असायचा. मला दोन्ही वेळ दिलेले विषय हे पेट्रोल- डिझेल इंजिन च्या

वापराने होणाऱ्या वातावरणाच्या प्रदूषणाला कसं कमी करता येईल ह्यासंबंधीत होते. मी एम.टेक ला त्यांच्याकडे काम करत असताना जी बी. टेक. होम पेपर ची म्हणजे प्रोजेक्टची बॅच त्यांच्याकडे होती, त्यांना तर त्यांनी अतिशय उपयुक्त व मजेदार विषय दिला होता. राजकोटला नॅशनल ट्रेनिंग अंड प्रोटोटाइप डेव्हलपमेंट सेंटर अशी एक केंद्र सरकारची संस्था आहे. ही संस्था शेतकरी लोक इरिगेशन साठी जे पंप आणि डिझेल इंजिन वापरतात त्या सर्वांवर रिसर्च करत असते. तिथले इंजिन पाच किंवा सहा हॉसपावर चे डिझेल इंजिन असतात. त्यांच्यावर रिसर्च चालू असतं. या संस्थेच्या पारीख मॅडम मार्गदर्शक होत्या. या संस्थेच्या मदतीने मॅडमनी आमच्या बी.टेक. बॅचला एक प्रोजेक्ट दिलं होतं.त्यात आमच्या पाचही मुलांनी गुजरात मधल्या वेगवेगळया गावी जाऊन तिथे शेतकरी जे डिझेल इंजिन वापरतात ते बरोबर रीतीने वापरतात की नाही, त्यांच्या कायअडचणी आहेत, इंजिन कुठल्या स्थितीत आहे, ते कसं चालतं, किती डिझेल खातं वगैरे सर्व गोष्टींचा डिटेल सर्वे करून डाटा जमवायचा. कुठे काय काय चुकत आहे हे शोधायचं. आणि त्यावर काय उपाय आहे याचा रिपोर्ट तयार करायचा. असं काम त्यांनी मुलान्ना दिलं होतं. त्या मुलांनी डाटा आणल्यानंतर फॉल्ट फाइंडिंग आणि करेक्टिव्ह मेजरस ह्यासाठी मी त्या मुलांना मदत करायची असं ठरवलं. आमच्या बी. टेक.च्या मुलांनी खुप डाटा आणला व अनेक दोष उघडकीस आणले. मग आम्ही त्यांच्या वर जे

उपाय सुचवले त्यामुळे देशभरात त्यावेळी इरिगेशन साठी वापरल्या जाणाऱ्या पाच दशलक्ष इंजिनवर होणार्या डिझेलच्या खर्चात जवळपास दर वर्षाला 200 कोटी रुपयांची बचत होणार होती. गोबर गॅस हा डिझेल ला पूरक इंधन म्हणून कसा वापरता येईल, यात काय अडचणी येतील, याचा सखोल अभ्यास करण्याचे काम त्यांनी माझ्या आधीच्या एम.टेक विद्यार्थ्यांला दिलं होतं. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. त्यापैकी थोडेसे मी वर लिहिले. पण माझ्या जीवनावर त्यांनी पाडलेला प्रभाव आणि त्यांचं व्यक्तिमत्व मी कधीच विसरू शकणार नाही.मी अजूनही त्यांच्या सम्पर्कात आहे.

# आयुष्यात पहिल्यांदा

आयुष्यात अनेक गोष्टी आपण पहिल्यांदा करतो, पाहतो, ऐकतो, अनुभवतो. त्यापैकी काही काही गोष्टी आपल्याला बरंच काही शिकवून जातात. बरेच प्रसंग आपण विसरूनही जातो, बरेच कायम आठवणीत राहतात. काही काही किस्से तर अगदी मजेदार असतात. या ना त्या वेळी आठवतात. शाळेत किंवा कॉलेजात विद्यार्थी असताना आपण पहिल्यांदा एखाद्या वादविवाद किंवा वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतो. आपले भाषण लिहितो किंवा कोणाकडून तरी लिहून घेतो. मग ते पाठ करतो, म्हणून पाहतो. पण पहिल्यांदाच जेव्हा आपण स्टेजवर जातो बोलण्यासाठी, हातातला कागद पाहतो, तेव्हा तो कागद आणि आपला हात थरथरत असतात. पाय लटपटत असतात. तोंडातून काही वेळा शब्द बाहेर पडत नाही. मग हशा पिकतो. मग आणखी खजील वाटतं. नर्वस होऊन आपण खाली येऊन बसतो. हे असं बऱ्याच जणांना अनुभवावं लागलं असेल. मला आठवतं,एक जुलै 1966ला आम्ही चार-पाच जण अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे वेगवेगळया विभागात लेक्चरर म्हणून रुजू झालो. साधारण महिनाभरानंतर आणखी काही मंडळी रुजू झाली. त्यात नागपूर व्ही आर सी ई मधून पास झालेला आणि पुढे आमचा मित्र बनलेला एक जण मेटलर्जी या विषयात

लेक्चरर म्हणून जॉईन झाला. त्याचं नाव यादव होतं. तो मध्य प्रदेशात राहणारा होता. त्याला मराठी बोलता यायचं नाही. हिंदीत बोलायचचा आमच्याशी. रुजू झाला त्याच्या पुढच्याच आठवड्यात त्याचं पहिलं लेक्चर होतं. त्यांनं खूप तयारी केली. त्यावेळी आम्ही नवीन जॉईन झालेले बऱ्याच वेळी एकत्र जमायचो. यादव ची तयारी झाली त्यादिवशी तो आम्हाला म्हणाला “यार मेरा पहला लेक्चर परसो है. मैंने तयारीत अछी कियी है, 45 मिनिट का लेक्चर है,लेकिन ढाई घंटे बोल सकू इतना मैने मटेरियल तयार किया है. यार टेन्शन आ रहा है.” आम्ही म्हटलं “ यादव घबराने की कोई बात नही. सब ठीक होगा.” ज्यादिवशी त्याचं लेक्चर होतं ते त्यांनी घेतलं आणि झाल्यानंतर आम्ही बसलो होतो तिथे आला. अगदी नर्व्हस दिसत होता तो. मी म्हटलं “क्या हुआ यादव पहिले लेक्चर का? “ तो म्हणाला “यार पूछो मत. सब गडबड हो गई. आधे घंटे मे ही मेरा सब मटेरियल खतम हो गया. आगे याद नही आ रहा था.” आम्ही म्हटलं” फिर बचे हुए पंधरा मिनिट तूने क्या किया?” तो म्हणाला “क्या करता यार? अटेंडंसस लिया. सब के नाम पते पूछे और समय काट दिया. पुढे तीन-चार वर्ष तो आमच्या बरोबर होता. चांगलं शिकवायला लागला. पण त्याचा पहिला दिवस त्याच्या डोक्यातून काही गेला नाही. असं होतं कधी कधी , आम्ही सर्विस मध्ये नवीन नवीन असतानाचाच आणखी एक प्रसंग मला आठवतो. जॉईन होऊन साधारणता पाच-सहा महिने झाले असतील

आमच्या कॉलेज इन्स्पेक्शन साठी नागपूर हून कमिटी आली. त्यात व्ही आर सी ई नागपूर चे प्राचार्य अन तीन विभाग प्रमुख होते.पहिल्याच दिवशी अकरा वाजता त्यांनी आमच्या प्राचार्यांची आणि सर्व विभाग प्रमुखांची बैठक बोलावली. मी त्यावेळा असिस्टंट वर्कशॉप सुपरिंटेंडेंट होतो. आमचे वर्कशॉप सुपरिंटेंडेंट एक म्हातारे गृहस्थ होते. त्यांना नेमकं त्या दिवशी बरं नव्हतं. त्यांनी मला मिटींगला हजर राहायला सांगितलं. चांगली दोन तास मिटिंग झाली. अन दुपारी एक वाजता लंच साठी ते चार पाहूणे आणि आम्ही दहा अकरा जण अमरावतीच्या नीलम हॉटेल मध्ये गेलो. आमच्याबरोबर माझा एक मित्र शिराळकर होता कारण चहापाणी, जेवणाची व्यवस्था त्याच्याकडे सोपविली होती. हॉटेल वर गेल्यावर त्यानं मेनू पाहून लंच ऑर्डर केलं. थोड्या वेळानं वेटरनं सगळ्यासमोर बाऊलमध्ये एक लाल पदार्थ गरम गरम आणून ठेवला. सोबत एक चमचा ही आणला. मला कळेना आता याचं काय करायचं. मी कधी असा पदार्थ पाहिलाच नव्हता. त्यात पोळी कुसकरून खायची की ते प्यायचं , मला काहीच कळेना. मग मी सर्वांकडे पाहत राहिलो. प्रत्येक जण आपापल्या चमच्यानं ते थोडं-थोडं पीत होता. मग मी तसं करायला सुरुवात केली. पण बराच वेळ जेवण- भाजी पोळी वरण काहीच आलं नाही. सर्वांनी ते बाऊल मधलं संपवलं तसं मी संपवलं. मग जेवण करताना मी शिराळकरला विचारलं "यार, तो सुरुवातीला बाऊलमध्ये लाल पदार्थ दिला होता तो काय

होता आणि तो जेवणा आधि का दिला? आणि तो तसाच चमच्याने घ्यायचा असतो का? “ तो हसायला लागला आणि म्हणाला” अरे ते टोमॅटो सूप होतं. टमाट्या पासून केलेलं. तुला माहित नाही? “ मी म्हटलं “खरच माहीत नाही. मी पहिल्यांदाच हा पदार्थ पाहिला. आणि असं जेवणाआधी घेताना मी पहिल्यांदाच पाहतोय.” बी.ई.पास होऊन सहा महिने नोकरी करेपर्यंत मला सुप काय होतं ते माहीत नव्हतं. आमची जडणघडण कशी झाली हे सांगताना माझ्या बऱ्याच भाषणात या प्रसंगाचा मी उल्लेख करतो.पण कॉम्प्लेक्स नठेवता, अज्ञानाला मी कधी लपवलं नाही. सरळ सरळ मित्राला विचारलं. असं शिकत गेलो. आता 11 देशातल्या भेटीत अनेक कॉन्टिनेन्टल ईंटरकोंटिनेंटल सुपं मी घेतली आहेत,पण मी पहिल्यांदा घेतलेल्या त्या सुपाची आठवण अजूनही आहे,प्रत्येक वेळी मला ते आठवतं..

त्याच्याही बऱ्याच आधीचा एक अनुभव मला आठवतो. 1963 ला मी विदर्भ महाविद्यालयातून बीएस.सी. पार्ट 1 पास झालो. तिथे मी दोन वर्ष वस्तीगृहात राहिलो. बीएस.सी भाग1 नंतर मी इंजिनिअरिंग साठी अर्ज करणार होतो, म्हणून उन्हाळ्यात निकाल लागल्याबरोबर मी बुलढाणा जिल्ह्यातील माझ्या खेड्या वरून अमरावतीला टी.सी. आणि मार्कलिस्ट घ्यायला आलो. अमरावतीला राहायची काहीच व्यवस्था नव्हती म्हणून मी येताना ट्रेनमधून फ्रेश होऊन आलो. एक छोटीशी बॅग होती जवळ. ती

घेऊनच साडेदहा वाजता कॉलेजला गेलो. उन्हाळयाची सुट्टी असल्यानं आमची सर्व होस्टेलस ही बंद होती. कॉलेजमध्ये अकरा वाजेच्या दरम्यान आमचे बरेच वर्गमित्र जमले होते. खास करून ज्यांना ज्यांना इंजिनीरिंग मध्ये किंवा मेडिकलमध्ये अर्ज करायचे होते असे सर्व मित्र हमखास आले होते. कारण सर्वांना अर्जासोबत मार्कलिस्ट, टी.सी.च्या प्रती जोडायच्या होत्या. बारा-साडेबाराला आम्हाला आमचे कागदपत्र कॉलेजातून मिळाले. माझा एक जवळचा मित्र जगदीश सिन्हा ही माझ्याबरोबर क्यू मध्ये होता. जगदीश म्हणजे त्यावेळचे सुप्रसिद्ध एडव्होकेट दयाराम सिन्हा यांचा मुलगा. त्याच्या दोन्ही मोठ्या बहिणी त्यावेळी वि.म. वि.त च एम.ए. च्या विद्यार्थ्यांनी होत्या.(आताचे जस्टिस दिलीप सिन्हा हे, जगदीश चे धाकटे भाऊ).आमच्या मार्कलिस्ट वगैरे मिळाल्यानंतर जगदीश मला म्हणाला "जाजू तू आता जेवायला कुठे जाणार आहेस? मेस वगैरे तर बंद आहे. गावात कोणाकडे? मी म्हणालो " नाही. माझं इथे कोणी नाही. जाईन कुठे तरी." तो म्हणाला "असं काय करतोस? माझ्या बरोबर आमच्या घरी चल जेवायला. आणि मग जेवण करून नीट परतीला जा." मला अवघडल्यासारखं झालं. एवढी मोठी माणसं ती. मी खेड्यातून आलेला. अंगावर पायजमा शर्ट.मी म्हणालो " नको जगदीश. मी जेवीन एखाद्या खानावळीत." तो ऐकेच ना. मला त्यानं त्याच्या स्कूटरवर बसवलं आणि घरी घेऊन गेला. तेव्हा त्यांचं घर मांगीलाल प्लॉटमध्ये डॉक्टर अजमिरे

यांच्या घरामागे होतं. तो एक मोठा बंगला होता. मी आत गेलो जगदीश बरोबर. पहिल्यांदाच एवढं मोठं घर पाहत होतो. त्याचे वडील घरी नव्हते. त्याची आई शिक्षणाधिकारी काय होती. ती पण बहुदा घरी नसावी. पण अग्नेश आणि राजेश्वरी ताई व दिलीप घरीच होते.थोड्या वेळानं जगदीश म्हणाला ‘चल जेवायला बसू आपण. ‘ आम्ही आत गेलो तर आत टेबालावर ताटं लावलेली. टेबलावर भाजी वरण वगैरे ठेवलेलं. बसायला खुर्ची. मी आयुष्यात पहिल्यांदाच असो टेबल खुर्चीवर बसून जेवणार होतो. कारण वस्तीग्रहातही आमच्या बीएस.सी. पार्ट वन पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ताट- पाट्यावर जेवायला बसायला लागायचं. मग आता माझी पंचाईत झाली.मला टेबल मॅनर्स वगैरे काहीच माहीत नव्हतं. ताटाच्या बाजूलाच छोटे-छोटे नँपकिंस ठेवले होते. ते कशासाठी मला काही कळेना. पण मी आयुष्यभर कान आणि डोळे उघडे ठेवून शिकत गेलो. आपलं अज्ञान कधीही लपून ठेवले नाही. मोकळेपणी समजलं नाही ते विचारत गेलो. ह्यावेळी मी जगदीश कडे पाहिलं. त्यांनं नॅपकिन उचलून मांडीवर ठेवली.तशी मी ठेवली.मग त्यानं हातानंच वरण भाजी वाढून घेतली. मी ही तसं केलं. पोळ्या मात्र राजेश्वरी ताईनं आतून गरम गरम आणून वाढल्या. मी जेवत होतो, पण अतिशय अवघडलो होतो. ते चमच्याने वरण वगैरे मला जमेना. मग मी सरळ ताटातच वरणात पोळी चुरून खाल्ली. काय करणार. आता अनेक वेळा मला डायनिंग टेबल वर बसताना, घरात, हॉटेलात माझं

टेबलावर बसून जेवताना मी पाहतो तेव्हा मला ते जेवण आठवतं. केवढा लाजलो होतो तेव्हा. माझा टेबलावर जेवण्याचा पहिला अनुभव होता तो. अशा पहिल्या अनुभवाचे अनेक छोटे मोठे प्रसंग माझ्या कायम स्मरणात आहेत. 1974 च्या उन्हाळी परीक्षेसाठी मी व माझ्या जवळचा मित्र जोशी हे नागपूर VRCEला एक्झामिनर म्हणून गेलो. तिचं आमचे अनेक मित्र प्राध्यापक होते. ऐके चोपडे म्हणून आमचाच एक विद्यार्थी व पुढे चांगला मित्र झालेला ,तिथे प्राध्यापक होता. संध्याकाळी सर्व मित्र त्याच्या रूमवर जमा झालो. गप्पा सुरु झाल्या तेव्हा तो म्हणाला “चलो आज गुलमोहर हॉटेल मे खाना खायेंगे. तुमको बियरभी पीलाताहू. “ हॉटेलमध्ये गेल्यानंतर त्यानं तिन बियरच्या बाटल्या बोलावल्या. सर्वांच्या ग्लास मध्ये अर्धा अर्धा ग्लास बियर ओतली. मी अन जोशी, आम्ही त्याच्याआधी कधीच बिअर प्यायलो नव्हतो. आम्ही थोडं मागे पुढे करायला लागलो. चोपडे म्हणाला अरे गोल्डन ईगल आहे. खूप माईल्ड आहे. घ्या. काही होणार नाही. आम्हाला पण एकदा बीअर घेऊन पहायाची होती. म्हणून आम्ही सर्वांबरोबर बिअर घ्यायला लागलो. तीन-चार घोट घेऊन झाले असतील नसतील तसा जोशी उठून उभा राहिला. आम्ही म्हटलं काय झालं? तो सिरीयसली म्हणाला थोडं चालून बघतो यार. चालता येते की नाही ते. उगाच जास्त झाली तर झोकांड्या बिकांड्या खात चालावं लागेल. सर्वजण हसायला लागले. आता मला हसायला येतं. पण त्या दिवशी बिअरचा

पहिला ग्लास संपल्यावर जोशीचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता.बिन पिये नशा छा गया. असा हा मजेदार बिअर पिण्याचचा पहिला प्रसंग.

मी 2003 ला पहिल्यांदा दुसऱ्या देशात गेलो. पोर्तुगाल, लिस्बन येथे वर्ल्ड एज्युकेशन समिट होती. ती अटेंड करायला मला तिथे जायचं होतं. त्याच वेळी लंडनला एका प्रोजेक्टसाठी माझे जावई ही गेलेले होते. मुलगी त्यांच्याबरोबर तिथे रहायची. ते दोन वर्षासाठी गेले होते. नागपूरहून आमचे चेअरमन रायसोनी नि माझं लंडन चं तिकीट काढलं. मला म्हणाले “तुम्ही अगोदर मुलीकडे चार-पाच दिवस रहा. नंतर समिट च्या दिवशी किंवा आदल्या दिवशी पोहचा लिस्बनला. मी मागवून येणार आहे. मग मी लंडनला निघालो. नऊ-दहा तासाचा प्रवास. मग टॉयलेटला वगैरे जायला लागणार. मी देशातल्या देशात बरेच वेळ विमानाने प्रवास केला. पण ते सर्व प्रवास दीड-दोन तासाचे असल्याने प्लेन मध्ये कधीही टॉयलेटला गेलोच नाही. असा नऊ दहा तासाचा फॉरेन चा पहिला प्रवास होता. टॉयलेटला जावंच लागणार. पण मग अनेक शंका यायला लागल्या. परत बाहेर येताना दार उघडेल की नाही, आत कसं असेल, पाणी असेल का? अर्थात आधी मी सर्व इतरांना विचारून ठेवलं होतं. पण मनात प्रश्न आलेच. मग एकदाचा गेलो आणि जीव भांड्यात पडला.

ऑस्ट्रेलियात मी एकदा मेलबोर्नवरून सिडनीला निघालो. तशी माझी कॉन्फरन्स अँडिलेड्ला होती. त्यामध्ये माझा एक शोधप्रबंध होता

आणि मला एक सेशनही चेअर करायचं होतं. पण आधी दोन दिवस मेलबोर्नला मुलीच्या दिराकडे राहिलो. सिडनीला माझे दोन विद्यार्थी होते, त्यांनी मला बोलावलं होतं म्हणून एका दिवसासाठी चाललो होतो. मेलबोर्न ते सिडनी साधारण दीड एक तासाचं अंतर होतं. फ्लाईट मध्ये बसल्यानंतर एअर होस्टेसनं आधी काही चॉकलेट्स वगैरे आणली. मग दुसरी एअर होस्टेस आली. तिच्या मोठ्या ट्रेमध्ये वाईन च्या छोट्या छोट्या बाटल्या होत्या. तिने ट्रे समोर धरला तेव्हा माझ्या बाजूच्या पॅसेंजर न ट्रे मधल्या दोन बाटल्या उचलल्या. पण पैसे द्यावे लागतील या भीतीने मी काही त्या घेतल्या नाही. पण नंतर लक्षात आलं की त्या पॅसेंजरने तर काही पैसे दिलेच नाही. रात्री मेलबोर्नला परत आल्यावर मी मुलीच्या दिराला ते सांगितलं तो म्हणाला काका इथे खूप वाईनरीज आहेत. बऱ्याच फ्लाईट मध्ये त्या वाईनच्या कॉम्प्लिमेंटरी बाटल्या ते देतात. तुम्ही घेतल्या का नाही? मी म्हटलं' मला वाटलं त्याच्यासाठी पैसे द्यावे लागतील, म्हणून नाही घेतल्या. मग मला पश्चाताप झाला.अशा गमती जमती होतात.

पहिल्या पहिल्यांदा काही वेळा आपल्याला माहित नसलेल्या किंवा असलेल्या शब्दार्थःत ही गोंधळ होतो. मी औरंगाबादला 1963 ला प्रथम वर्षे इंजिनीअरिंगचा विद्यार्थी असताना, आम्हाला प्राध्यापक बाहेती एक विषय शिकवायचे. ते विषयात तर चांगले होतेच पण मध्येमध्ये काही मजेदार गोष्टी सांगायचे. एकदा ते म्हणाले अरे तुम्हाला आजकालच्या

विद्यार्थ्यांना बऱ्याच गोष्टी माहीत आहेत. आम्हाला तर साध्या साध्या गोष्टी माहीत नव्हत्या. ते बाहेती सर पैठण जवळच्या एका खेड्याचे, पाडळी चे राहणार होते. ते औरंगाबादहून प्री प्रोफेशनल पास झाल्यानंतर इंजिनिअरिंग साठी पुण्याच्या कॉलेजमध्ये गेले. ते म्हणाले “ आम्हाला फर्स्ट इयरला इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग चे प्रॅक्टिकल होते. एकदा प्रॅक्टिकल घेताना आमचे सर म्हणाले की ही इलेक्ट्रिक मोटर आहे. ही इंडक्शन मोटर आहे. तशीच शंट मोटरही असते. मी इकडे तिकडे पाहायला लागलो, आणि सरांना विचारलं, सर मोटर कुठे आहे? आणि एवढी मोठी मोटर प्रयोगशाळेत कशी आली? “ सर म्हणाले ही इलेक्ट्रिक मोटर आहे. मग मी त्या इंडक्शन मोटर कडे पाहिलं. मला आश्चर्यच वाटलं. कारण मला फक्त आम्ही पाडळी हून औरंगाबादला ज्यात बसून यायचो तीच मोटर माहीत होती. आम्ही नेहमी म्हणायचो,अरे किती वाजताच्या मोटारीने आला, वगैरे. पहिल्यांदा ती इलेक्ट्रिक मोटर पाहून मी चकित झालो. “ बाहेती सरांनी हा त्यांचा किस्सा सांगितला. ते हसले. म्हणाले” मी पहिल्यांदा इलेक्ट्रिक मोटर पुण्याच्या कॉलेजमध्येच पाहिली. असं आणि एवढंच आम्हाला एक्स्पोजर होतं. तुमची टेक-ऑफ लेव्हल फार पुढची आहे. तुम्हाला बरंच काही माहित आहे.” पहिल्यांदा पाहिलेल्या, अनुभवलेल्या ह्या गोष्टींचं, प्रसंगांचं मोठं अप्रूप असतं. आठवले की मनातल्या मनात हसायला येतं. प्रत्येकाच्या गाठीशी हे असे अनुभव असतातच.

# दोनमित्र--दोनपत्र

प्राध्यापक विनायक जोशी हा माझा अतिशय जवळचा मित्र. गेली बावन्न वर्षे आमची ही घनिष्ठ मैत्री टिकून आहे. खरं म्हणजे गेली तिस-पस्तीस वर्षे आम्ही वेगवेगळया गावात राहतो. पण अजूनही आम्ही चांगल्याच संपर्कात आहोत. वर्षाकाठी एकदा तर भेटतोच. आधी आधी आमचा पत्रव्यवहार सुरू होता. आताही आहेच. पण आता आधी फोन, नंतर मोबाईल नंतर व्हॉट्सऍप यामुळे पत्रांची फ्रिक्वेन्सी कमी झाली आहे. आम्ही दोघेही एकाच वेळी एकाच दिवशी म्हणजे एक जुलै 1966 ला अमरावतीला गव्हर्नमेंट इंजीनियरिंग कॉलेजमध्ये अधिव्याख्याता म्हणून रुजू झालो. त्याआधी आम्ही एकमेकांना पाहिलं सुद्धा नव्हतं. खरं म्हणजे मी मेकॅनिकल डिपार्टमेंट मधला आणि जोशी केमिस्ट्री मध्ये. तसा तोही नागपूरच्या एल आय टी मधून बी. टेक. केमिकल झालेला. पूर्वी केमिकल इंजीनियरिंग ही शाखा अमरावतीत नव्हती. अताही नाही. म्हणून जोशी केमिस्ट्री डिपार्टमेंट ला रुजू झाला. पहिल्या दिवशी पासूनच आमच्या तारा अशा जुळल्या की त्यांचं घनिष्ठ मैत्रीत रूपांतर झालं. त्याच्याबद्दल मला जे लिहायचं ते एखाद्या वेगळ्या लेखात लिहिन. पण त्याचं 9 ऑक्टोबर 2011

ला मला जे पत्र आलं अन त्याचं मी जे उत्तर त्याला दिलं ती दोन्ही पत्रं मी आमचे दोघांचे कॉमन मित्र असलेल्या डॉक्टर अनंत मराठ्यांना दाखविली. मराठे म्हणाले सर ही दोन्ही पत्र छापण्यासारखी आहेत. आणि त्यांनी माझ्याकडून ती दोन्ही पत्रं घेऊन ती दैनिक हिंदुस्थानला दिली. ती 16 ऑक्टोबर 2011 ला दैनिक हिंदूस्तानात प्रकाशित झाली. त्या दोन्ही पत्राआगोदर हिंदुस्थानच्या संयोजकांनी जे लिहिलं होतं, ते असं----

“ संध्याछायेतिल दोन विद्यार्थीप्रिय, अभियांत्रिकी शाखेतील यशस्वी शिक्षकांमधील हा पत्रव्यवहार. आयुष्याचे सिंहावलोकन करताना मैत्री संबंध, विद्यार्थ्यांच्ता जडणघडणीत रममाण झालेले शिक्षक, खाजगी जीवनातल्या सुखदुःखात सहभागी होणारे सहाध्यायी,त्यांच्या मानवी संबंधाची ही सूक्ष्म विण ह्या पत्रात दिसते. इतकच नव्हे उत्तम साहित्य ह्या देवाण-घेवाणात निर्माण झालं आहे. जुन्या पिढीतील व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील वातावरण, आजचे धंदेवाईक शिक्षण क्षेत्रातील परिस्थिती वरील, चिंतन मनन करण्यासाठी या उत्कृष्ट साहित्याचा आनंद वाचकांना मिळावा म्हणून हा खाजगी पत्रव्यवहार संबंधितांची परवानगी घेऊन आम्ही प्रकाशित करीत आहोत. डॉक्टर जाजू सर व जोशी सर यांना हार्दिक कुर्निसात.”

तीच दोन पत्रं मी आज ह्या लेखात देतो आहे.

प्रिय जाजूस , आजच्या दैनिक लोकमत अकोला आवृत्ती मध्ये येथिल खासदार, माननीय संजय धोत्रे यांचा लेख आला आहे. ते अमरावती इंजिनिअरिंग कॉलेजचे 1976 चे विद्यार्थी आहेत. त्यांच्या जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या प्राध्यापकांची जी नावं त्यांनी त्या लेखात लिहिली आहेत त्यात डॉक्टर पिंगळे, डॉक्टर जाजू ,डॉक्टर विश्वनाथ कराड यांच्या नावासोबत प्राध्यापक वि.ल. जोशी यांचे ही नाव आहे. मला सविनय ज्ञात आहे की वरील तिघांच्या तुलनेत चौथे नाव बसत नाही. असे हजारो विद्यार्थी आहेत की यांच्या जीवनावर प्राध्यापक जाजू यांनी नुसता प्रभावाच पडला नाही तर त्यांच्या जीवनाला वळण लावलं. त्या निमित्तानं मला लेखन उर्मि मिळाली ती अशी. कृपया स्वीकार कर. सौभाग्यवती वहिनींना सप्रेम नमस्कार सांग.

सूर्याला संस्कृतमध्ये मित्र असे नाव आहे. किती सार्थक आहे हे संबोधन. मित्रा मुळे आपल्या जीवनाला प्रकाश मिळतो. आपल्या अस्तित्वाला अर्थ येतो. सूर्याच्या तत्वत मित्राच्या हृदयातील विचारांचे अविरत होणारे स्पोट, त्याची भव्यता, त्याची श्रेष्ठता, त्याची दिव्यता, त्याचं सामर्थ्य हे केवळ त्याचं. इतर कोणी त्याची बरोबरी करू शकत नाही. ‘तेजात जन्मवरून तेजाचा नवीन साज, हे दिनमणि योमराज, ‘ असे सूर्याला, तेजोगरबाला त्या दिव्य भास्कर याला आपण म्हणतो. पण एखाद्या प्रभाकर पणशीकर ह्यांच्यासारखा नटश्रेष्ठानी जिवंत, साकार केला, त्या प्राध्यापक,

प्राचार्यान्नाही आपण तसं म्हणू शकतो. आमचे कवी म्हणतात ‘अमर्याद मित्रा तुझी थोरवी, अन् मला ज्ञात मी एक धूलिकण ‘ कुसुमाग्रज यांचे पृथ्वीच्या आत्म कहाणी चे संबोधन अतुलनीय असेच गायले गेले आहे. त्यांनी स्पष्ट कबुली दिली आहे की “नको क्षूद्र शृंगार तो दुर्बलांचा, तुझी दूरता त्याहूनी त्याहूनी सहावे” मित्रांमध्ये व्यवहारात आडपडदा नसतोच. म्हणून मैत्रीसंबंध क्वचित शृंगाराच्या कक्षेतही जातात. असे म्हणतात की तुमची हृदयाची श्रीमंती तुम्हाला किती मित्र आहेत यापेक्षा तुमचे मित्र कसे आहेत यावर ठरते. आता इथून पुढं मी कसा श्रीमंत आहे हे सांगणार आहे. पण ते सांगताना कदाचित आत्मश्लाघेचं, आत्मस्तुतीचं अवगुंठन होईल, पृथ्वी जवळून पाहिली किंवा ती सूर्याभोवती फिरताना पाहिली काय,त्यात जो वर्णनाच्या तपशीलात फरक होईल, तोच माझ्या ह्या लिखाणात आढळेल. माझे दोन्ही मित्र प्राचार्य आहेत. प्राचार्य जाजू व प्राचार्य मराठे. दोघांची प्रकृती भिन्न असली तरी ते दोघेही मला आवडण्याचं कारण सारखंच आहे. एक, क्रांतिकारक यांचा मुलगा आहे. त्याच्यापासून मानवाच्या कर्तृत्वाचा इतिहास मी जाणला. तर दुसरा स्वतः कलाकार असल्यामुळे मानवाच्या भावना मला कळल्या. जो कलाकार आहे तो बराचसा नाट्यकलावंत, नाट्यदिग्दर्शक आहे. भावना कळल्या असं जेव्हा मी म्हणतो तेव्हा अगदी दोघांनी, आमच्या कौटुंबिक प्रसंगी एकमेकांच्या

गळ्यात गळा घालून, तर दर्द भरी कविता ऐकताना किंवा तशी कलाकृती बघतान्ना सामूहिक रुदन केलेले आहे.

पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या वर्हाडी माणसं किंवा कट्यार काळजात घुसली ह्या नाटकाचं त्याच्याबरोबर केलेलं समीक्षण पुन्हा आठवणं अपरिहार्य आहे. वसंतराव कानेटकर यांच्या रायगडाला जेव्हा जाग येते मधल्या संभाजी- येसूबाई चे व शिवाजी-येसूबाईंचे केलेले एक पात्री प्रवेश प्रकर्षाने आठवतात. त्यामधले पिता-पुत्रा मधील समज अपसमज यांची गुंफण, त्याने सजीव पणे सादर केल्याचं अजूनही आठवतं. तो जीवओतून सगळ करायचा. म्हणून मित्र म्हणून मला त्याचा गर्व आहे. अंढेर्या यासारख्या लहान खेड्याच्या, अरुंद गल्लीतून धावणारा बंकट, संकटावर वार करित,करित पायरीपायरीनं प्राचार्य झालेला हा प्राणी, याची मित्र म्हणून झालेली प्राप्ती अभिमान वाटावा अशी आहे. अमरावतीच्याजोशी हॉल मध्ये असो किंवा खापर्डे बगीच्यातील रेल्वे गणेश मंडळाचा मंडप असो की कलोपासक मंडळाचे कार्यक्रम असोत, आम्ही दोघांनी योगिनी जोगळेकर यांची भैरवी,ज्योत्स्ना भोळे यांची नाट्यगीतं. परविन सुलतानाची रागदारी, हरिप्रसाद चौरसियाचि बासरी किंवा हलीम जाफर चा तबला, हा सर्व थरार बरोबरीनं अनुभवला. व मग ह्या निर्णयावर आलो की, आर्ट्स- कॉमर्सच्या विद्यार्थ्यांपेक्षा आपण इंजिनिअरिंगची माणसं जास्त कलावंत असतो, रसिक असतो. आता आम्ही दोघांना पूरक कसे ठरलो त्याची गोष्ट.

सांस्कृतिक कार्यक्रमाची जबाबदारी प्राचार्य आम्हा दोघांवर टाकायचे. 1975ला चंद्रपूर येथे झालेल्या रानडे वादविवादस्पर्धेत एकूण 26 महाविद्यालयांच्या चमू आल्या होत्या. मेडिकल कॉलेज, एलएडी,नागपूर ह्यांच्या चमू चांगल्याच असायच्या. आम्ही अमरावतीहून आमची चमू पाठवली. मी स्वतः, चंद्रशेखर वऱ्हाडपांडे व श्रीकांत देशमुख या आमच्या स्पर्धकांना प्रभारी प्राध्यापक म्हणून घेऊन गेलो. खूप तयारी करून घेतली होती आम्ही मुलांची.विष्याचे मुद्दे, आवाजाचा चढ-उतार, भाषेची शुद्धता, वेळेचे भान, विषयाची मुद्देसूद मांडणी हे व्यवस्थित जमलं, व आम्ही विजयी होऊन परत आलो. आमच्या महाविद्यालयात आमचा सत्कार झाला. सांघिक ढाल व वैयक्तिक बक्षिसे आम्ही मिळवली. माझ्या ह्या मित्रानेच जाजूनेच, फक्त आमचे कष्ट जाणले व आम्ही मिळवलेल्या विजयाचे महत्त्व सर्वांना पटवून दिलं. नेहमी वाद विवाद व कार्यक्रम संचालन चे काम माझ्याकडे व नाट्यक्षेत्र, स्नेहसंमेलन हे माझ्या ह्या मित्राकडे असायचं. मला कॉलेजचा अमीन सयानी बनवण्याचं श्रेय माझ्या ह्या मित्राकडे आहे' आमच्या स्नेहसंमेलनाला आलेले प्राचार्य शिवाजीराव भोसले,वि.आ. बुवा, वामन चोरघडे, गंगाधर गाडगीळ, बाळासाहेब मराठे प्राचार्य काणे हे प्रमुख अतिथी मला अजूनही आठवतात. त्यांचा करून दिलेला परिचय आठवतो. त्याचवेळी जाजू ही कॉलेजचे रंगमंच दणानून सोडत होता." तू दिग्दर्शित केलेली, विश्राम बेडेकरांचं वाजे पाउल आपले, बाळ कोल्हटकर

यांचे मुंबई ची माणसं, किशोर प्रधानांचं काका किश्याचचा व पई पई पई आणि आत्माराम सावंत यांचं वरचा मजला रिकामा ही नाटकं चिरस्मरणात राहतील, अशी झाली होती. त्यातून तू घडवलेले विद्यार्थी नट, सुरेश मगरकर, विनोद नागोरी, प्रकाश डहाके, अशोक बावने, जयप्रकाश मुदलीयार अजूनही आठवतात. प्राचार्य देशपांडे यांच्या देवाघरची वाट या नाटकासाठी तू यशस्वी रित्या तयार केलेला फिरता रंगमंच व तू केलेलं दिग्दर्शन अजून डोळ्यासमोर आहे. देवा घरची वाट मधलं, एका रम्य संध्याकाळी प्रियकर प्रेयसीला घेऊन क्षितिजा कडे जाणाऱ्या आणि मावळणाऱ्या सूर्याकडे पाहून, त्याच्या मोठ्या लाल प्रतिमे कडे बोट दाखवून विचारतो, " हे दृश्य पाहून तुला काय वाटतं सांग बघू? तेव्हा ती प्रेयसी ताबडतोब उत्तर देते , "कढईत असलेल्या गरम तेलात, आलू बेसनचा गोळा सोडतो आहे, असं वाटतं" अन तो प्रियकर कपाळावर हात मारून घेतो. असे खुमासदार प्रसंग तू दिग्दर्शित केले. गोपाल टॉकीज मध्ये एक परिसंवाद होता. आम्ही दोघेही बोललो. तू भाषण संपवून खाली आमच्यात येऊन बसला. तसा मी म्हणालो उत्स्फूर्तपणे वेळेवर मुद्दा मांडणं ह्या साल्याला कसं काय जमतं देव जाणे. माझं भाषण संपलं तेव्हा मी येऊन बसल्यावर माझ्या भाषणातील चुक मला न दुखावता तू सांगितली. माझा मित्र, माझा समर्थक, टीकाकारही होता तू. आता आम्ही दोघेही आयुष्याच्या संध्याकाळी एकमेकांना अधून मधून पत्र लिहितो..जाजू तू नंतर अनेक वर्ष चार मोठ्या

महाविद्यालयाचा प्राचार्य होतास. अनेक मान-मरातब तुला मिळाले. त्यात महाराष्ट्र राज्याचा आदर्श शिक्षक पुरस्कार, इंडियन अचिव्हर्स फाउंडेशन नवी दिल्ली यांचा शिक्षा भारती पुरस्कार, एम एस ग्रुप यांचा डॉक्टर सी व्ही रमण अवॉर्ड, फॉर एक्सलन्स इन इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी हे मला आवर्जून आठवतात. तू दोन पुस्तकं प्रकाशित केली. मी जीवघेण्या आजाराशी झुंजत असताना तू लिहिलेली ती दोन पुस्तक माझ्या हातात पडावी म्हणून खास माणसा कडून तू मला पाठवली. त्यात एक तर हिंदी कविता संग्रह विद्रोह आहे आहे अन दुसरं आमच्या जीवनाशी संबंधित वर्ग खोलीत प्रवेश ते निकास पर्यंतच्या अनुभववावर आहे. अजूनही माझी पत्र तू सांभाळून ठेवतोस. क्वचित माझी पत्र वाचून कदाचित तुझ्या डोळयाच्या कडा ओल्या होत असतील. हीच माझी कमाई आहे हे माझं संचित आहे. रचित एवढा छान रचनाकार, भाबडा आहे. प्राची वर सूर्योदय पाहणारा व साहित्य सुमनांच्या व परागावर मधुकर करणारा हा कलावंत, प्रेमावरच प्रेम करतो. माझा दुसरा मित्र प्राचार्य आहे. सध्या तो थोडा रुसला आहे. असो विद्यार्थी आणि आपण नेहमी बरोबर असायचो याची मला अभिमानानं नोंद करावीशी वाटते.

प्रिय जोशी,

अत्यंत सुंदर असं तुझं पत्र 13 सप्टेंबरला अमरावतीला पोहोचलं पण मला मात्र ते 9 ऑक्टोबरला मिळालं वाचायला. मी नेमका 22

सप्टेंबरला पुण्याला गेलो तो नऊ ऑक्टोबरलाच सकाळीच पुण्याहून परतलो. 19 सप्टेंबरला दैनिक लोकमत मध्ये खासदार माननीय संजय धोत्रे यांनी त्यांच्या जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या प्राध्यापकांची जी नावं घेतली, डॉक्टर पिंगळे, डॉक्टर जाजू ,डॉक्टर कराड ह्या नावानंबरोबर प्राध्यापक वि.ल. जोशी चे नाव आहे, ह्याचं तुला आश्चर्य वाटण्याचं मुळीच कारण नाही. आम्हा तिघांपैकी सगळ्यांनी प्रथम वर्ष अभियांत्रिकी ला क्वचितच शिकवलं. पुढे द्वितीय वर्षे ते अंतिम वर्षापर्यंत हजारो विद्यार्थी आमच्या संपर्कात राहिले आणि त्यांच्या संपर्कात राहायला अन त्यांची जडणघडण करायला आम्हाला चक्क तीन तीन वर्षे मिळाली. एवढा मोठा कालावधी मिळाला. पण तू तर केवळ एकच वर्ष म्हणजे प्रथम वर्ष त्यांना शिकवायचा. तरीही ह्या अल्पावधीत तुझ्या शिकवण्याचा, तुझ्या व्यक्तिमत्वाचा, तुझ्या विद्यार्थ्यांबद्दल च्या तळमळीचा ठसा तू हजारो विद्यार्थ्यांच्या मनावर कोरला आहे. उमटविला आहे. आम्ही कदाचित मूर्तिकार असू पण एक सुंदर मूर्ती घडवायला लागणारी प्रमाणबद्ध व उपयुक्त अशी माती आमच्या हाती देणारा तू कुंभार आहेस. आदर्श शिक्षक कसा असतो आणि त्याच्या जीवनात शिक्षणाचं काय महत्त्व आहे याचं मूर्तीमंत प्रतिक तू. या नव प्रवेशित विद्यार्थ्यांसमोर आदर्श उभा करायचा अन मग पुढे ते आमच्या संपर्कात द्यायची ही तुझी करामत. जमिनीची मशागत करणारा खरा कास्तकार, कलाकार तर तूच. आम्हाला, मला मोठे म्हणतोस हे तुझं

मोठेपण. माझ्या जीवनात तुझ्यासारख्या मित्राचं हे मोठेपण मी अनेक वेळा अनुभवलं आहे. प्राध्यापक वि.ल. जोशी, डॉक्टर एन.एल. सारडा, डॉक्टर डी.जे. तिडके, प्राध्यापक बी.ए. पाटील, प्राध्यापक भोपळे, प्राध्यापक ह.रा. साबू आणि कित्येक जवळचे मित्र ही माझ्या आयुष्यात संपादन केलेली सर्वात मोठी संपत्ती समजतो मी. माझ्या जीवनात मला मिळालेल्या अनेक यशांचा, पुरस्कारांचा तू खऱ्या अर्थाने भागीदार आहेस. अशा प्रत्येक वेळी तू माझ्यावर मुक्तकंठानं मुक्त हातानं स्तुतिसुमनां ची उधळण केली. केवढी प्रेरणा केवढी शक्ती तुझ्यासारख्या मित्रांकडून मला मिळाली हे फक्त मलाच ठाऊक आहे. चांगले मित्र मिळवणारा तू एकटाच श्रीमंत नाहीये मीही तुझ्या इतकाच श्रीमंत आहे.

तुझ्या पत्रानं सरसर सगळा चित्रपट डोळयासमोरून सरकला. विशेषता आमच्या तारुण्यातील व नंतरची काही वर्ष. आपण कसे जवळचे मित्र झालो हे परत एकदा आठवलं. पण आपल्या आवडीनिवडी आपल्या सवयी आपले आदर्श आपली अंतर्मनं सगळं हळूहळू एक होत गेलं. मग ते वर्गात शिकवणं असू देत वाद विवाद स्पर्धा असू देत, मराठी नाटक बसवणं असू देत, शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीताच्या मैफिली असू देत ,किंवा चोरून, कॉलेजात ट्रांजिस्टर वर क्रिकेट ची कॉमेंट्री ऐकणं असू देत किंवा आपलं ब्रिज खेळ असू देत, आपण नेहमी बरोबर असायचो. आपल्या प्रमाणेच पुढे आपल्या बायका मुलांची मन जुळली आणि खऱ्या अर्थानं

आपल्या कुटुंबांनी आपली मैत्री सहन केली. अजूनही घरी बोलताना डॉक्टर समीर जोशी, इंजिनीयर तुषार जोशी.डॉ. पराग जोशी हे माझ्या व माझ्या पत्नीच्या, माझी मुलगी प्राची आणि माझा मुलगा पराग यांच्या बोलण्यातील विषय असतात. परवा डॉक्टर मराठ्यांना तुझे पत्र वाचायला दिलं. त्यांनी सगळं वाचलं आणि म्हणाले सर हे पत्र मला द्या. मला ते छापायचं आहे. पत्राच्या अगदी शेवटी तू लिहिलेली ती वाक्यं डॉक्टर मराठ्यांना त्यांच्या संदर्भासहित (त्यांचा संदर्भ त्यांना माहीत नसल्याने) परत मी वाचून दाखवली.” रचित एवढाच रचनाकार भाबडा आहे. प्राची वर सूर्योदय पाहणारा व साहित्य सुमनांच्या परागावर मधु वेचणारा हा कलावंत तर प्रेमावरच प्रेम करतो. “ मराठ्यांना मी म्हटलं मराठे, वरच्या तीन वाक्यातला रचित हा माझा नातू आहे, रचना माझी सून आहे, प्राची माझी मुलगी आहे, पराग माझा मुलगा आहे, तर प्रेम हे माझ्या बायकोचं नाव आहे. कोण म्हणतं आम्ही इंजिनियर साहित्यिक नाही म्हणून?

मी आपल्या अनेक विद्यार्थ्यांच्या अजून संपर्कात आहे. फार मोठी माणसं आहेत ती. टाटा मोटर्स, बजाज ऑटो, भारत फोर्ज, किर्लोस्कर कमिन्स, महिंद्रा अँड महिंद्रा अशा मोठ्या मोठ्या कंपन्यांमध्ये जनरल मॅनेजर डेप्युटी जनरल मॅनेजर, डायरेक्टर अशा पदावर आहेत ती. तर पब्लिक सेक्टर मध्ये चीफ इंजिनियर,सुपरींटेंडिंग इंजिनियर पर्यंत, राजकारणात यशस्वी असलेले खासदार संजय धोत्रे, आमदार प्रकाश डहाके

आमदार श्रीकांत जोशी आमदार सतीश चव्हाण, रंगनाथ काळे असे ही सर्व आहेत. मी तर नेहमी असं म्हणतो की विश्वास ठेव हे सर्व आवर्जून तुझी आठवण काढतात. फक्त प्रथम वर्ष अभियांत्रिकीला शिकवणाऱ्या एका शिक्षकाला मिळणारं हे स्थान मिळवायला फार मोठी ताकद लागते. तुझ्या ताकदि बद्दल मी काय सांगू? दोन वर्षापूर्वी मेंदुज्वर याच्या जबरदस्त फटक्यानंतर, हात पायही न हलवता येणारा, तिन-चार महिने न बोलू शकणारा, माझा हा मित्र त्याच्या डॉक्टर मुलांनी मृत्यूच्या दारातून परत ओढून आणला. आता तो बोलतो, हसतो, चालतो आणि कथा कविता लिहितो आहे.सर्व परमेश्वराची कृपा आणि ईश्वरी चमत्कार. पण म्हणतात त्याला ही पुण्याई लागते.

आणखी काय लिहू? या इंटरनेट आणि ई-मेल, फेसबुक, व्हाट्सअप च्या जमान्यात अशी पत्रं लिहिण्याचे प्रसंग कदाचित येतात.पण आले की मी ते दवडत नाही.' आजकालच्या ह्या मॉडर्न युगात मित्र-मैत्रिणी एकमेकांना, सागर- सरिता, पराग- प्रणिता, सुहास- सुचिता,असं संबोधतात. आपण घनिष्ठ मित्र असून सुद्धा एकमेकांना अजूनही प्रिय जोशी आणि प्रिय जाजू असं संबोधतो. आऊट डेटेड झाल्यासारखं वाटतं नाही?

# अनामिक बंधांच्या नि:शब्द भावना

चार दिवसांपूर्वीच नाशिकहून,माझ्या मुलीनं मला एक कविता पाठवली–

I had my own notion of grief,I thought that it was the sad time that followed the death of someone you love And you had to push through it to get to the other side. But I am learning there is no other side. There is no pushing through. But rather there is absorption, adjustment, acceptance.. And grief is not something you complete

But rather you endure. grief is not a task to finish and move on, But an element of yourself. An alteration of your being. A new way of seeing.A new definition of self.

परवा आठ नोव्हेंबरला माझ्या पत्नीचं देहवसान होऊन दोन वर्षे होतील. वर दिलेल्या कवितेतिल शब्दनशब्द मी गेली दोन वर्ष अनुभवतो आहे. खरंच, देअर इज नो अदर साइड अँड यू हॅंव टू पुश थ्रू इट. असं काहीच नसतं. खऱ्या अर्थानं ती एक स्वीकृती, तडजोड, स्वीकार करूणंच असतं.

चला आता हे भोगू ( दुःख ) आणि एकदाचं संपवून टाकू, असं काहीच नसतं. खऱ्या अर्थाने हा स्वतःत घडवून आणण्याचा किंवा आलेला बदल असतो. तुमच्या अस्तित्वात आलेला बदल. अँन अल्टरेशन ऑफ यूर बींईंग. आपण ज्या व्यक्तीवर मनापासून प्रेम करतो त्याच्या अस्तित्वाशी आपलं अस्तित्व किती एकरूप झालेले असतं याची त्यावेळी आपल्याला कल्पनाही नसते. मला नीट आठवत नाही पण बहुदा व पु काळे यांनी की कोणी एका ठिकाणी लिहिलेलं ते मी वाचलंय " माणूस मेल्यानंतर घर रितं होतं. मन मात्र भरून राहतं बऱ्याच आठवणींनी. त्याच्या अनामिक बंधांनी. आणि सहवासात घडलेल्या अनेक प्रसंगान्नी. कालचक्र थांबत नाही,आपण पुढे सरकत राहतो. आपल्यालाही आयुष्याचं पान कधीतरी गळून पडणारच असतं. कोणालाही हे विसरता येईल येत नाही आणि कोणी विसरू नये." पती-पत्नीच्या संवादातील ,त्यां नात्याच्या बंधांनी बांधलेल्या अनंत आठवणी आपल्या बरोबर असतात. मी मागच्या वर्षीच्या माझ्या एका लेखात आमच्या पिढीतल्या ह्या नवरा बायकोच्या जोड्या फुटल्या की मागे राहणाराचं जीवन कसं बेरंग, बेचव, अस्तित्वहीन झाल्यासारखं राहतं, ते लिहिलं होतं. कदाचित सर्वच पिढ्यांचं हे असंच असावं. पण प्रत्येक पीढीच्या भाव संबंधाचे संदर्भ वेगवेगळे असतात.काळ, समाज, सभोवतालची जीवनशैली ह्या सगळयांचा त्याच्यावर बेमालूम परिणाम होतच असतो." पगडी घरी नाही किंवा टोपी घरी नाही असं सांगणाऱ्या

पत्नीचे संदर्भ वेगळे. तर हे घरी नाहीयेत किंवा हे जरा बाहेर गेलेत, येतील एवढ्यात, बसा.असं म्हणणार्य पत्नीचे संदर्भ वेगळे.आणी, पता नही कहा गये, अभी तो यहाही थे, म्हणणाऱ्या पत्नीचे संदर्भ त्याहूनही वेगळे.” मी फक्त माझ्या पीढीच्या अनामिक बंधना बद्दल बोलू शकतो. कारण आय वाज पार्टी टू इट. मी त्यातलाच एक. एकमेकांमध्ये गुरफटून गेलेली आमची अस्तित्व, त्या सहवासाच्या आठवणी, यांना बाजूला सारून पुढे जाता येत नसतं. देअर इज नो पुशिंग थ्रू.. अशा अनंत आठवणींचं गाठोडं बगलेत घेऊन पुढे चालत जायचं असतं. मला आठवतं, छेचाळीस वर्षांच्या आम्ही दोघांनी एकत्र घालवलेल्या आमच्या जीवनात केवळ विसच महिने आम्ही या ना त्या कारणामुळे एकमेकांपासून दूर राहिलो. कधी चार दिवस, कधी 10 तर कधी एक महिना ,तर कधी सहा महिने असे. पण या आमच्या वेगवेगळया वियोगाच्या एकूण वीस महिन्यात, आम्ही एकमेकांना 118 पत्र लिहिली. ती मेल्यानंतर, मी ती पत्रं तारीख वार लावून ठेवली आहेत माझ्याजवळ. ही सगळी काही, प्रेमपत्र नव्हती. आमच्या मनोगताची, आमच्या हितगुजांची ही पत्र. एकमेकांशी बोलत राहण्याची, अभिव्यक्त करत राहण्याच्या ओढीची ही पत्रं. त्यात सगळं होतं. प्रेमही, रागही रुसवाही, ओढही,अगदि सगळं. माणसांची अस्तित्वं एवढी एकमेकांमध्ये मिसळून जातात. अन म्हणूनच त्या अनामिक बंधांच्या आठवणीनं, त्याच्या त्या गाठोड्यानं मन भरलेलं असतं. त्या आठवणी विसरता येत नाहीत आणि

विसरूही नयेत. पुढचा मार्ग चालताना त्या आठवणींचा मोठा आधार असतो. अशा अनेक हृद्य आठवणी माझ्या ही गाठोड्यात आहेत. त्या आठवताना कधी कधी भावनेच्या भरात आपण दुर्बल तर बनून जात नाही ना अशी भीती वाटायला लागते. कधीकधी सर्वच निरर्थक वाटायला लागतं. पण आयुष्यात काही वेळा आलेल्या काही कठीण प्रसंगात तिने दिलेल्या धीराची आठवण होते. नेहमी ती म्हणायची "सगळं व्यवस्थित होईल. परमेश्वर आपलं कधी वाईट होऊ देणार नाही" हे तिचे धीराचे, दिलेल्या हिमतीचे बोल आठवतात,आणि बळ येतं. मी कुठेसं वाचलंय" स्त्रीमुळे आयुष्याला मार्दव येतं. उत्कट जाणीवा एकाएकी पडत नाहीत. आणि मुख्य म्हणजे मरणाची आठवण लांबत जाते' अनिल कुलकर्णी यांनी त्यंच्या सॉलीटरी क्रिपर या पुस्तकात म्हटलं आहे, " ती जिवंत असती तर काय झालं असतं? तिलाही अधिकाधिक वार्धक्याने घेरलं असतं. दुरच्या हाकेला भीत-भीत ओ द्यावी तसं तिचं हसणं वाटलं असतं. तरीही तिच्या सहवासातलं स्वारस्य संपलं नसतं. मृत्युची वाट पाहताना ,सोबत दुसरं कोणी असलं म्हणजे केवढा धीर येतो? " पण ही सोबत सुटली की मग आयुष्याच उसवून जायला लागतं. पण आठवणी च्या धाग्यांची घट्ट वीण सहजासहजी उसवत नाही. त्या निरगाठी सारख्या सोडता सुटत नाही. अश्या तिच्या बरोबरच्या अनेक आठवणींनी माझी कालक्रमणा सुरू आहे. मग ते मला मुंबई आयआयटीत पीएच.डी साठी प्रवेश मिळण्यापासून तर ठराविक

वेळी ते यशस्वीरित्या पूर्ण होण्यासाठी, तिने केलेली गजानन महाराजांची पोथीची पारायणं असोत, की माझी ॲन्जिओप्लास्टी चालू असताना ती यशस्वीरीत्या पूर्ण व्हावी, ह्यासाठी तिची जवळून चाललेली परमेश्वराची प्रार्थना असो, अशा आणि इतर अनेक. दुःखाच्या प्रसंगी, मला त्याची, तीव्रता जाणवू नये, मी मनाला ते लावून घेऊ नये म्हणून त्या विषयावर बोलायचे ती टाळायची. माझ्या शिकवण्याच्या पद्धतीला, माझ्या सर्व आवडींना,छंदांना भरभरून प्रोत्साहन द्यायची. मग ते माझं नाटकाचं वेड असो, कविता लिहिण्याचं असो किंवा ब्रिज खेळण्याचं असो.माझा मित्र प्राध्यापक जोशी तर नेहमी म्हणतो की तुझ्या यशात वहिनींचा फार मोठा वाटा आहे. अशा सुख-दुःखाच्या आठवणी, तिच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाच्या आठवणी सारख्या बरोबर असतात. आणि मला अभिमान याचा आहे की केवळ मीच नाही, तर माझे ड्रायव्हर, आमच्याकडच्या कामवाल्या बायांपासून तर माझे विद्यार्थी, मित्र, नातेवाईक सर्वजण तिची वेळोवेळी आवर्जून आठवण काढतात. यामुळे या रितेपणातही भरल्या भरल्या सारखं वाटतं. माझ्या भावना मला नीट व्यक्त करता येत नाहीत, पण माझ्याच एका कवितेतील शब्द मला आठवतात, “मत कापते हातोमे मेरे लेखनी दो, मत शब्द दो नि: शब्द गीतो को मेरे. मै खो चुकाहू, भावना को,चेतनना को, स्वप्न सुंदर और मीतो को मेरे. अब दर्द मेरी कल्पना खुद बन रही जब,मत और मुझको ज्ख्म दो. आख मे आसू नही, जो घाव मेरे धो सके, मत और

मुझको जख्म दो.” तिच्या द्वितीय पुण्यस्मरणाला श्रद्धांजली देताना सहज मनात आलेले भाव--- आसू खुषी के हो या गम के, दिल की भाषा होते है.छुपे दर्द और छलके खुषी की परिभाषा होते है. कभी चेहरे पर मत जाना है,वह कुछ और कहता होगा,आंखके आसू दर्द का आईना है, जो दिल खामोष सहता होगा. भावनाये भी नि:शब्द होती है, कभी अव्यक्त रह जाती है,मरहम वक्त का लग जाता है,पर यादे टीस बनकर रहजाती है.” शेवटी एका शायराचा शेर आठवतो—‘ अगर मेरे हैएहसास बया होजाते लफब्जो मे, तो कौन खबर लेता इन खामोशियो की.

“ Those who live in the hearts they leave behind, never die”.

# ती साठ मिनिटं

वर्गात कसं शिकवावं ह्या विषयावर " From Entry to Exit-Treatise on Classroom Experiences" ह्या शिर्षकाचं माझं एक इंग्रजी पुस्तक 2009 मध्ये प्रकाशित झालं आहे. 1966 ते 2003 अशी जवळजवळ सदतीस वर्षे मी क्लासरूम मध्ये इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांना 11 वेगवेगळे विषय शिकवले आहेत.त्यात 2001 ते 2003 मध्ये नागपूरला रायसोनी कॉलेजात प्राचार्य असतानाही मी वर्गात शिकवलं, ती तीन वर्ष समाविष्ट आहेत. पुढे पुढे माझा रायसोनीत कामाचा व्याप वाढला व विशेष म्हणजे ठरल्या वेळी मला वर्गात जाणं शक्य होत नव्हतं, त्यामुळे मी वर्गात शिकवणं सोडलं. पण पुढची तिथली तीन वर्ष,अन एच. वि. पि. एम. अमरावती येथील त्याच्या पुढची सहा वर्ष अन आजतागायत मी बऱ्याच इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये फॅकल्टी डेव्हलपमेंट ह्या सदराखाली प्राध्यापकांसाठी टॉक्स देतो. त्यात मुख्यतः इफेक्टिव टीचिंग इन क्लासरूम, टीचिंग लर्निंग इन द लेटेस्ट कॉन्टेक्स्ट, रिसर्च अँड रिसर्च मेथोडोलॉजी, टेक्निकल रायटिंग अँड प्रेझेंटेशन,असे प्रत्येकी दोन दोन तासाची भाषणं मी देत असतो. सुरुवातीच्या काही वर्षानंतर मी श्रोत्यांना माझ्या अन माझ्या

मित्रांच्या क्लासरूम व शिकवण्याच्या अनुभवाबद्दल बरीच उदाहरणं, किस्से सांगायला लागलो. ते जास्त परिणामकारक होतं असं मला वाटलं. मग हद्या माझ्या अनुभवावर आधारित ,मी, 2009 मध्ये, वर सांगितलेलं पुस्तक लिहिलं. ते नागपूरच्या एस. जी. आर. मीडिया प्रायव्हेट लिमिटेड या रायसोनी च्या प्रकाशनानं प्रकाशित केलं. मी त्यांनाच कॉपीराइट दिले. पहिल्या हजार प्रति संपल्यानंतर मी रायसोनीन्ना विनंती केली की हे पुस्तक मला पीडीएफ मध्ये करून ऑनलाइन, सर्वांना विनामूल्य उपलब्ध करून द्यायचं आहे तुमची परवानगी मला हवी आहे. सुनील जी रायसोनी म्हणाले' सर आप इतना अच्छा काम कर रहे हो, मेरे परवानगी की जरूरततही नही.' मग मी त्यात रॅगिंग वरचा आणखी एक चाप्टर वाढवून ते पुस्तक पीडीएफ मध्ये कॉम्प्यूटरवर सर्वांना विनामूल्य उपलब्ध होईल याची व्यवस्था केली. हे पुस्तक जरी इंजिनीअरिंगचे प्राध्यापक डोळयासमोर धरून लिहिलं असलं तरी त्यातल्या काही काही गोष्टी सर्वच शिक्षकांना, प्राध्यापकांना उपयोगी पडतिल, म्हणून त्यातल्या ह्या बाबींचा उल्लेख करण्यासाठी मी हा प्रपंच करतो आहे. ह्यात मी जे लिहिलंय त्यात काही नवीन नाही. फक्त वन मोअर रिमाइंडर आहे हे. काही अनुभवाचे किसे आहेत जोडीला.

सर्वात प्रथम म्हणजे जो विषय आपल्याला शिकवायचा आहे त्याची चांगली तयारी करणं. चांगली तयारी करण्यासाठी त्या त्या विषयाची एका पेक्षा जास्त चांगली पुस्तकं वाचली पाहिजेत. गाईड्स कधीच वाचू नयेत

किंवा वापरू नयेत. या चांगल्या पुस्तकांमधून मग चांगल्या क्लास नोट्स लिहून तयार कराव्यात. वर्गात पुस्तक घेऊन जाऊ नये, असं मी आमच्या प्राध्यापक मंडळींना नेहमी सांगतो. वर्गात पुस्तक घेऊन जाण्याचे दोन तोटे आहेत. एक म्हणजे तुम्ही पुस्तक घेऊन वर्गात गेलात की विद्यार्थ्यांना वाटतं आज सरांची किंवा मॅडम ची तयारी नाही. आज हे पुस्तकाची काही पानं वाचून दाखवून वेळ मारून नेणार आहेत.ह्याला मी फर्स्ट विक सिग्नल म्हणतो. दुसरं म्हणजे या भारी वजनांच्या पुस्तकांना हातात घेऊन हवं ते पान काढून, त्यातून पाहून, आकृत्या काढणे किंवा समीकरण लिहिणं हे अतिशय अवघडून गेल्यासारखं होत.. एका हातात वजन, वर जोरात पंखा चालू,पानं उडतात आहे ,पुस्तक, ते पान सांभाळता सांभाळता त्रेधा उडते. म्हणून स्वतः लिहिलेल्या नोट्स, त्या तासाला पुरतील एवढे आठ दहा पानच असलेल्या नोट्स, वर्गात न्याव्यात. चांगलं झटकलेलं डस्टर, हव्या त्या रंगांचे खडू, घेऊन जावेत. वर्गात मरगळल्या सारखा प्रवेश करू नये किंवा डिस्चार्ज झालेल्या बॅटरी सारखं बोलू नये. तुमची एनर्जी लेव्हल हाय पाहिजे. कपडे व्यवस्थित पाहिजेत. वर्गात जाण्यापूर्वी स्वतःकडे चांगलं पाहून नंतरच वर्गात जावं. वेंधळ्यासारखं वर्गात जाऊ नये. बऱ्याच वेळा विषयाची किंवा टॉपिक ची सुरुवात करताना तो विषय, तो टॉपिक, आपण का शिकवतो आहे आणी विद्यार्थ्यांनी तो का शिकायचा आहे, त्याचा रेलेव्हन्स काय आहे, किंवा कॉन्टेक्स्ट काय आहे हे बरेच प्राध्यापक सांगत

नाहीत. विद्यार्थ्यांना त्या विषयाची गोडी लावण्यासाठी, त्यांची उत्सुकता जागृत करण्यासाठी ,हे सांगणं फार आवश्यक आहे.

मला आठवतं, 1993-94 च्या दरम्यान मी एकदा चिखलीच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये एका सेमिनारचा प्रमुख पाहुणा म्हणून गेलो. तिथे माझे काही जुने विद्यार्थी प्राध्यापक होते. एक जण माझ्याजवळ आला आणि मला म्हणाला ’ सर नमस्कार. मला ओळखलं?’मी म्हटलं हो. किती वर्षे झाली तुला इथे?तो म्हणाला तीन चार वर्षे झाली सर. मी म्हटलं कुठले विषय आणि कोणत्या वर्गाला शिकवतोस? तो म्हणाला “ सर सेकंड ईअरला एक विषय आणि फायनल इयरला एक विषय, असे दोन विषय शिकवतो. मी म्हणालो फायनल ईयर ला कोणता विषय शिकवतो? तो म्हणाला “ सर मॉड्रन एनेर्जी सोर्सेस (अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत). मी म्हटलं कशी सुरुवात करतोस? म्हणाला ‘सर अगोदर पारंपारिक व अपारंपारिक सोर्सेस मधला फरक सांगतो. मग अपारंपारिक चे प्रकार म्हणजे सोलर एनर्जी, विंड पॉवर, बायो गॅस, एम. एच. डी. वगैरे एकेक सुरू करतो. मी त्याला विचारलं ‘ आजच्या घडीला आपल्या भारताला, कारखाने, वाहतूक, शेती अवजार, घरगुती उपयोग असे सगळे सेक्टर्स धरून किती मेगावॅट एनर्जी लागते? व त्यापैकी सध्या आपण किती पारंपारिक न मिळवतो आणि किती अपारंपारिक सोर्सेस मधून घेतो? तो पाच मिनिटं काहीच बोलला नाही. मी म्हटलं कीती मेगावाट, सांग. निदान आंदाज तरी

सांग. तो आणखी थोडा वेळ थांबून म्हणाला सर नक्की सांगतासांगता येणार नाही, पण पंधरा वीस हजार मेगावॉट लागत असतील सर. मग मी त्याला सांगितलं अरे जवळजवळ एक लाख मेगावाट लागतात आज. त्यापैकी 90 टक्के अजूनही आपण पारंपारिक म्हणजे कन्वेंशनल सोर्सेस कडून म्हणजे कोळसा, डिझेल, पेट्रोल, फर्नेस ऑईल, केरोसीन या कडून घेतो. आणि ह्या सर्वांचे साठे म्हणजे रिझर्व आता फार जलद गतीने संपत चालले आहेत. किमती भरमसाट वाढत आहेत. त्यामुळे लवकरात लवकर आपल्याला अनकन्वेनशनल, रिन्युएबल एनर्जी ची गरज आहे. पुढे मी म्हणालो, हे सगळं विद्यार्थ्यांना सांगून आणि या विषयाचा योग्य संदर्भ, गांभीर्य सांगून तू या विषयाची ची सुरुवात केली पाहिजे. खरं म्हणजे असं हे प्रत्येक विषयासाठी, टॉपिक साठी करणं आवश्यक आहे.

1969- 70 ला औरंगाबाद इंजिनिअरिंग कॉलेजच्या इलेक्ट्रिकल विभागाच्या एका सीनियर प्राध्यापकाची अमरावतीला बदली झाली. मी अमरावतीला मेकॅनिकल विभागात होतो. ह्याच प्राध्यापकांनी मी औरंगाबादला विद्यार्थी असताना मला 1964- 65 ला, सेकंड इयर एक विषय शिकवला होता. ते अमरावती ला आल्यानंतर एक दिवस मी टी क्लब मध्ये त्यांच्या जवळ गेलो आणि म्हणालो ‘सर मला ओळखलं?’ त्यांनी माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाले हो तू माझा विद्यार्थी होतास. मला नाव नाही आठवत तुझं.मी त्यांना सांगितलं. आणि म्हणालो सर

इलेक्ट्रिकल मध्ये 3 फेज असतात हे मला पास झाल्यानंतरच कळलं. मला फक्त दोनच फेज माहीत आहेत. ते म्हणाले का बुवा?’ मी म्हणालो ‘सर बोर्ड वर तुम्ही पहिला आर, दुसरा वाय,अन नंतर तिसरा काय म्हणायचे ते आम्हाला कधी ऐकायलाच यायचं नाही. त्यामुळे मला तिसरा बी भेज, माहीतच नाही. ते अन इतर मित्र हसायला लागले. मी पुढे म्हणालो “सर तुम्ही विषयात खूप तज्ञ आहात. आम्हाला तुमच्याबद्दल खूप आदर होता. पण वर्गात तुम्ही इतके हळू बोलायचे की पुढच्या दोन रांगेला सोडून बाकीच्यांना काहीच ऐकायला यायचं नाही.” वर्गात शिकवतांना कधी साठ तर कधी 70 विद्यार्थी वर्गात असतात. सर्वांना ऐकायला जाईल एवढ्या आवाजात बोलणं अत्यंत आवश्यक असतं. पण म्हणून उगाच घसा फाडूनही चालत नाही. कारण आपली एनर्जी लेव्हल आपल्याला साठ मिनिटं टिकवायची असते. घसा खराब करायचा नसतो. आमच्याकडे अमरावतीला आमच्या विभागात मी एम-3 रूम मध्ये फायनल इयरला आय.सी. इंजिन हा विषय शिकवायचो. त्याच वेळी एम 2 रूममध्ये माझे एक मित्र थेअरी ऑफ मशीन हा विषय दुसऱ्या वर्गाला शिकवायचे. ते फार घसा ओरडून-ओरडून बोलायचे. एक दिवस मी टी क्लब मध्ये त्यांना म्हणालो ‘यार, तुम एम2 मे थेरी ऑफ मशीन पढाते हो और मै एम3 मे आय.सी.इंजिन, लेकिन मेरे विद्यार्थी भी थेरी ऑफ मशीन ही सिखते है.’ तो हसायला लागला. म्हणाला ‘यार क्या करू? आवाज पर कंट्रोल करना

चाहता हूँ. पर मेरा पीच पढाते पढाते बडा हो जाता है.' हे असं व्हायला नको. मी नेहमी प्राध्यापकांना सांगतो की वर्गात गेलो की अंगात आल्यासारखं शिकवायचं असतं. म्हणजे अंगात आणायचं नाही, पण इतकं सगळं विसरून शिकवलं पाहिजे की तंद्री लागली पाहिजे, समाधी लागली पाहिजे. मग त्यात खरा आनंद मिळतो. वर्ग झाल्यावर थकल्यासारखं न वाटता, ताजंतवानं झाल्यासारखं वाटतं.

1986 ला आम्ही अमरावती इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये पार्ट टाइम एम.ई. चा कोर्स सुरू केला. रोज संध्याकाळी सात ते नऊ असा एकेक विषय आम्ही शिकवायचो. ज्याचा ज्या दिवशी एम.ई.चा क्लास असेल, तो साडेचार पाचच्या दरम्यान घरी जाऊन फ्रेश होऊन चहा वगैरे घेऊन परत पावणे सात पर्यंत क्लासला यायचा. असाच एक दिवस माझा क्लास असताना मी साडे चारला घरी आलो. त्या दिवशी माझं डोकं खूप दुखत होतं. अगदी मायग्रेन. तोंड धुतलं. चहा वगैरे झाला. पण बरं वाटेना. मला डोकेदुखीचा त्रास नेहमीच असायचा पण त्या दिवशी डोकं खूपच ठणकत होतं. अगदी मायग्रेन. मग माझी बायको सुंठ उगाळून त्याचा लेप घेऊन आली. तो लेप तिनं माझ्या डोक्यावर लावला. तो वाळत आला की नेहमी मला बरं वाटायचं. त्यादिवशी हे सगळं केलं पण मला बरं वाटेना. सहा सव्वा सहा वाजले तरी आराम पडला नव्हता. मग बायको म्हणाली. आजचा दिवस जाऊ नका क्लासला. मी म्हटलं " आमचे एम. ई. चे

विद्यार्थी बाहेर गावाहून म्हणजे पुसद, अकोला, बडनेरा येथून येतात. असं कसं चालेल? मला गेलं पाहिजे.” मी गोळी घेतली तरी डोकं दुखत होतं. मग माझ्याच्याने रहावेच ना. शेवटी मी तशी स्कूटर काढली, किक मारली आणि पावणे सातला कॉलेजमध्ये पोहचलो. बरोबर सात वाजता मी माझा नेहमीसारखा क्लास सुरू केला. मी त्यावेळी हीट ट्रान्सफर हा विषय शिकवायचचो. सात वाजता सुरू करून बरोबर नऊ वाजता मी माझा क्लास संपवून माझ्या रूम मध्ये येऊन बसलो. एक ग्लास पाणी प्यायलो. अत्यंत प्रामाणिकपणे सांगतो. मला खूप प्रसन्न वाटत होतं. डोकेदुखी वगैरे सगळं गायब. घरी होणाऱ्या वेदनांचा मागमूसही नव्हता. समाधीचं हे असं असतं. विश्वास ठेवा. हे अनेकांनी अनुभवलं असेल.

शिकवण्याचं माध्यम म्हणजे भाषा. आपली भाषा चांगली असली पाहिजे, विशेष करुन इंग्रजी भाषा. कारण ते आमचं शिकवण्याचं माध्यम आहे. शिकवणं परिणामकारक व्हायला चांगल्या भाषेत ते शिकवणं, अत्यंत आवश्यक आहे. अब्राहम लिंकन यांनी आपल्या आत्मचरित्रात एका ठिकाणी लिहून ठेवलंय ‘इफ यू गिव्ह मी एट आवर्स टू कट अ ट्री, आय विल शार्पन माय अँक्स फॉर सिक्स आवर्स. टूल शार्प असलं की पुढचं काम सोपं आणि जलद होतं. लैंग्वेज इतकच महत्व बॉडी लॅंग्वेज ला आहे. उगाच वेड्यावाकड्या हालचाली, हातवारे करु नये. तेच ते शब्द परत परत उच्चारु नयेत. विद्यार्थ्यांच्या नजरेस नजर मिळवून न शिकवणे ही टाळता

आलं पाहिजे. विद्यार्थ्यांचं ह्याकडे बारकाईनं लक्ष असतं, आमचे एक मित्र तर वर्गात गेल्यानंतर पाच सहा मिनिटात पायाला आढि घालून उभं रहायचे. ज्या दिवशी त्यांनी असं केलं नाही, त्यादिवशी विद्यार्थी ओरडायचे "सर कैची. कैची." कैची मारल्याशिवाय सुरुवात व्हायची नाही. आमचे एक दूसरे मित्र बोलताना दोन्ही हातात खडू सारखे घोळत राहायचे. लिहायची वेळ येईपर्यंत त्या खडूचा पार भुगा झालेला असे. एक मित्र तर सारखे टाचा उंच करायचे. कोणी,फालोड,फालोड असं साठ मिनिटात 70 वेळा म्हणायचे. हे सगळं टाळता आलं पाहिजे. वर्गात अगदी वेळेवर प्रवेश करणं अन शेवटच्या मिनिटापर्यंत न सोडणं ह्या गोष्टी शिस्तीने पाळल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांना शिकवताना सहभागी करून घेणं ज्याला आम्ही इंटरॅक्टिव्ह टिचिंग म्हणतो,जमलं पाहिजे. त्यांना मधून मधून प्रश्न विचारणं त्यांच्याकडून आलेल्या चुकीच्या उत्तराला न हसता, त्यांना योग्य उत्तरासाठी हिंट्स देणं हे नेहमी करता आलं पाहिजे. संबंधित, प्रासंगिक विनोदाचं अन उदाहरणं देण्याचंही तेवढंच महत्त्व आहे. त्यामुळे वर्गातिल वातावरण प्रफुल्लित होतं. विद्यार्थ्यांना नावानं ओळखणं ही ही तितकीच गरजेची बाब आहे. वर्गात किंवा वर्गाबाहेर विद्यार्थ्यांमध्ये गुंतवणूक असंणं, म्हणजे नो इनडिफरन्स, हे अत्यंत महत्त्वाचं आहे. आपलं शिकवणं खेळीमेळीचं परिणामकारक करण्यासाठी आणखी अनेक गोष्टी मला लिहिता येतील. पण त्या सगळयाचा इथे उहापोह करता येणार नाही..माझं

पुस्तक पीडीएफ मध्ये ऑन लाइन वाचता येईल, मला तुमचा मेल आय,डी. कळवला तर माझं पुस्तक मेलनं पाठवू शकेन., Title of the book is—-’ From Entry to Exit -Treatise on Classroom Experiences.

# सुसंगती सदा घडो

बऱ्याच कॉलेजेस मध्ये मी वेगवेगळया विषयांवर बोलायला अजूनही जातो. माझी ही जवळजवळ सर्व टॉक्स, ईंगिनिअरींगशी निगडित असतात. बहुतांशी प्राध्यापक मंडळी साठी असतात. काही केळा विद्यार्थ्यांसाठी ही टेक्निकल विषयावर किंवा त्यांच्या सर्वांगीण विकासा बद्दलही मी बोलतो. ज्या ज्या ठिकाणी मी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबद्दल म्हणजे टोटल पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट बद्दल बोलतो, तेव्हा त्यात अनेक बाबींचा मी समावेश करतो. उदाहरणार्थ कम्युनिकेशन स्किलस बद्दल, कॅरेक्टर बिल्डिंग बद्दल, व्हॅल्यूज म्हणजे जीवनमूल्यांबद्दल, डिग्निटी ऑफ वर्क आणि डिग्निटी ऑफ हुमन बिईंग बद्दल, सेल्फ डिसिप्लिन बद्दल, त्यांच्या संगती बद्दल, अशा अनेक मुद्ध्यावर मी बोलतो. पण प्रत्येक अशा टॉक मध्ये त्यांचे मित्र आणि संगत या दोन्ही गोष्टींचा त्यांच्या जीवनावर पडणाऱ्या प्रभावा बद्दल मी आवर्जून बोलतो. त्यात मी अनुभवलेली, पाहिलेली अनेक उदाहरण सांगतो. संस्कृत मध्ये एक सुंदर सुभाषित आहे---

आचार्यात पादमाद्त्ते , पादम शिष्य स्वमेधय: ,

पादम स्वब्रह्म चारीभ्यम, पादम काल क्रमणेच.

एक विद्यार्थी आपल्या जीवनात जे काही शिकतो त्यापैकी, एक चतुर्थांश तो आपल्या गुरूकडून शिकतो. दुसरा चतुर्थांश तो आपल्या परमेश्वराने दिलेल्या बुद्धिमत्तानी शिकतो.तिसरे,पादम् स्वब्रम्ह चारीभ्यम, ( चारा पैक) हा तिसरा चतुर्थांश तो आपल्या मित्रांकडून म्हणजे संगती कडून शिकतो. आणि शेवटचा चौथा चतुर्थांश जसजसं आयुष्य पुढे जातं तसं तसं ते आयुष्य म्हणजे त्याची कालक्रमणा त्याला शिकवत असते. यात गुरु किंवा शिक्षक आपण निवडू किंवा ठरवू शकत नाही. तसेच परमेश्वरावरा, मला अशी अन चांगली बुद्धी दे, मला प्रतिभावंत कर असं जन्म देतांना, आपल्याला मागाता येत नाही. आपलं आयुष्य कशी कालक्रमणा करणार आहे अन ते आपल्या पदरी कुठले अनुभव मांडणार आहे, आपल्याला काय धडा शिकवणार आहे, हेही आपल्याला माहीत नसतं. पण तिसरा भाग म्हणजे पादम ब्रह्मचारीभ्यम हा मित्रांकडून शिकण्याचा, संगती मधून शिकण्याचा जो भाग आहे तो बऱ्याच अंशी आपल्या हातात असतो. कारण मित्र आणि संगत आपण निवडतो. गेली पन्नास वर्ष मी विद्यार्थ्यांशी निगडित आहे, त्यांना जवळून पाहतो आहे. त्यामुळे अशी अनेक उदाहरणं मी पाहिली आहेत. मला माहित आहेत जिथे संगतीमुळे विद्यार्थ्यांचं जीवन बदलून गेलं. चांगली अभ्यासू मुलं, चांगल्या कुटुंबातली, चांगल्या वातावरणात वाढलेली मुलं केवळ संगतीमुळे बिघडलेली मी पाहिलेली

आहेत. तशीच काही उनाड मुलं चांगल्या संगतीत आल्यामुळे पुढे पुढे ती खूप चांगली शिकली, चांगली झाली हे मी अनुभवलं आहे. त्यामुळे माझ्या बोलण्यात यावर मी विस्तारानं विद्यार्थ्यांना सांगत असतो.

मला आठवतं, मी नागपूरला जी. एच. रायसोनी इंजिनिअरिंग कॉलेजला प्राचार्य असतांना,एक दिवस प्राध्यापक झाडगावकर मॅडम माझ्या रूम मध्ये आल्या. आम्ही रायसोनीत, फर्स्ट इयर इंजिनिअरिंग च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी एका प्राध्यापकाची कॉर्डिनेटर, समन्वयक म्हणून नियुक्ती करायचो.सर्व फर्स्ट इयर इंजीनियरिंगचं अकॅडमिक मॉनिटरिंग, डिसिप्लिन इत्यादी या समन्वयकाला पहायला लागायचं. अर्थात त्यांना मदतीसाठी प्रत्येक सेक्शनला शिकवणाऱ्या प्राध्यापकान पैकी एकाची आम्ही मुख्यकोऑर्डिनियर चे मदतनीस म्हणून निवड करायचो. त्यावर्षी प्राध्यापक झाडगावकर मॅडम ह्या,मुख्य काम करत होत्या. त्यात विद्यार्थ्यांच्या सर्व बाबी, तक्रारींकडे त्या जातीने लक्ष घालायच्या. एक दिवस त्या आल्या आणि म्हणाल्या ' सर, एका मुलाचे आई-वडील आले आहेत. त्यांना तुम्हाला भेटायचय.' मी म्हणालो 'ठीक आहे, त्यांना आत घेऊन या.' ते आई-वडील आत आले. मी त्यांना आणि आमच्या मॅडम ला बसायला सांगितलं. त्यांनी आपलं नाव सांगितलं,म्हणाले मी व्हेटर्नरी डॉक्टर आहे. त्या मुलाच्या आई पदवीधर होत्या. मी म्हटलं बोला.आमच्या मॅडम म्हणाल्या "सर आपण त्यांना पाठवलेलं तिसरं पत्र त्यांना

मिळालं.त्यांच्या मुलाच्या प्रोग्रेस बद्दलच.” आम्ही रायसोनीत प्रत्येक विद्यार्थ्याच्या पालकाला दर दोन अडीच महिन्यांनी पत्र पाठवून त्यांच्या मुलाची प्रगती म्हणजे त्याची हजेरी, नियमित अनियमितपणा, सबमिशन, क्लास टेस्ट याबद्दल पालकांना कळवायचचो.विशेषत:, ज्या मुलांची प्रगती समाधानकारक नाही, अशा मुलांबद्दलन तर आम्ही खात्रीपूर्वक पालकांना कळवायचो. मी त्या गृहस्थांना म्हणालो “बोला, काय म्हणणं आहे.” ते म्हणाले “सर आज पहिल्यांदा तुमच्या कॉलेजचं पत्र आम्हाला मिळालं आणि माझ्या मुलाची गैरहजेरी, अनियमितपणा, त्याचा क्लास मधला परफॉर्मन्स पाहून आम्हाला धक्काच बसला.” मी म्हणालो “पहिल्यांदा तुम्हाला आमचं पत्र मिळालं? मग आम्ही पाठवलेल्या आधीच्या दोन पत्रांचा काय झालं?’ ते म्हणाले ‘सर आम्हाला ती पत्रं मिळालीच नाहीत.’ मला बरोबर वास आला. मी मॅडमला म्हणालो मॅडम तो विद्यार्थी, यांचा मुलगा कुठे आहे, त्याला आत बोलवा. तो मुलगा आत आला तसं मी त्याला विचारलं ‘कॉलेजनं तुझ्या घरी पाठवलेली आधीची दोन पत्र कुठे आहेत?’ त्यानं खाली मान घातली. काहीच बोलला नाही. मी आवाज वाढवला.” व्हेअर आर अवर अरर्लियर टू लेटरस?’ घाबरुन तो म्हणाला “ सर मीच ती पोस्टमन कडून घेतली व आई बाबांच्या हातात पडू दिली नाहीत. फाडून टाकली. मी म्हणालो “यू आर अबसेंट इन द कॉलेज मोस्ट ऑफ द टाईम.देन व्हेअर डू यू गो?” तो काहीच बोलला नाही. त्याच्या

आईचे डोळे भरून आले. ती म्हणाली “सर हा रोज सकाळी बरोबर पावणे नऊ , नऊला घरून निघतो. संध्याकाळी सहाला घरी येतो. एखाद दिवशी माझा त्याला डबा द्यायला उशीर झाला तर मला उशीर होईल म्हणून माझ्यावर ओरडतो. संध्याकाळी घरी आला अन एखादेवेळी काही काम सांगितलं तर म्हणतो तुला काय माहित आहे, मी किती थकून जातो. मला दिवसभर उभे राहून ड्रॉइंग काढावं लागतं. वर्कशॉप व इतर प्रॅक्टिकल्स करावे लागतात. सर,हा कॉलेजमध्ये जातच नाही, मग कुठे जातो विचारा त्याला.” त्यांना रडायला आलं. मी परत ओरडून म्हणालो ‘कुठे जात असतो तू रोज?’ तो म्हणाला सर स्नुकर खेळायला. माझ्या मित्रांबरोबर. मी म्हणालो आपल्या कॉलेजची काही मुलं आहेत का त्यात? तो म्हणाला सर एक दोन जण येतात पण ते नेहमी येत नाहीत. बाकीचे बाहेरचे माझे अगोदरचे मित्र आहेत. त्या पालकांचा त्याच्याहून मोठा मुलगा फायनल इयर एमबीबीएस ला होता. या मुलालाही बारावीत बरेच चांगले मार्कस मिळाले होते. मग मी त्याला खूप धमकावलं, समजावलं. त्याला म्हटलं “ तू इंजिनियर तुझ्या स्वतःसाठी होतो आहेस. स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी, स्वतःचं जीवन चांगल्या रीतीने जगता यावं यासाठी. तुझ्या आई वडिलांना तुझ्याकडून काही नको आहे. ते आपलं जीवन जगतात आहे व जगतील. तुझ्याकडून शंभर रुपये महिन्याचे मिळावे अशी त्यांची अपेक्षा नाही. तू शिकून स्वतःच्या पायावर उभं राहावं, ते ही स्वतःसाठी.

त्यांच्यासाठी नाही. एवढीच त्यांची अपेक्षा आहे. त्यांच्या म्हातारपणी तू आणखी एक लाएबिलिटी त्यांना होऊ नकोस. बेअर मिनिमम एक्सपेक्टेशन. असं असताना तू वर्ग बुडवून स्नूकर खेळतो. घरी खोटं बोलतो. ह्याची तुला लाज वाटली पाहिजे. हा फेब्रुवारी चा महिना आहे व आता आणखी एकच महिना वर्ग होतील. हे तू नीट केलं, हजेरी नियमित ठेवली आणि ज्यादा वेळेत येऊन मागची सर्व राहिलेली प्रॅक्टिकल्स, सबमिशन केलं तरच मी तुला विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षेला बसू देईन. नाहीतर नाही. तुझ्या आई-वडिलांकडे पाहून मी तुला सुधरण्याची एक संधी देतो आहे." तो खजील झाला. मी सगळं कव्हर करीन असं म्हणाला. मी मॅडमना त्याची काय प्रगती आहे हे बरोबर एक महिन्यांनी मला सांगा असं सांगितलं. ते सर्व गेले. त्या मुलाने खरंच मनावर घेऊन पुढचे सर्व वर्ग व मागचे राहिलेले सबमिशन वगैरे केलं. आणि मग त्याला परीक्षेला बसण्याची आम्ही परवानगी दिली.एका सुशिक्षित घरात वाढलेला, ज्याचा भाऊ मेडिकलच्या अंत्य वर्षाला असलेला, बारावीत चांगले मार्कस मिळवलेला असा हा मुलगा, केवळ संगतीमुळे,आपल्या मित्रांमुळे ट्रॅकवरून घसरला. अशी अनेक उदाहरणं मला देता येतील.

ह्या उलट वाईट, उनाड संगत सोडून , असे मित्र सोडून चांगल्या मित्रांमध्ये आलेली मुलं पुढे फार चांगली झाली आहेत हे मी अनुभवल6 आहे. मी सातव्या वर्गापर्यंत खेड्यात शिकलो. घरातही फार शिकलेलं

त्यावेळी कोणी नव्हतं. अभ्यास चांगला होतो पण अशुद्ध, खेड्याचं मराठी बोलायचो. इंग्रजीतही चुका व्हायच्या. आठव्या वर्गात बुलढाण्याला हायस्कूलमध्ये शिकायला आलो. शाळेचं वातावरण खूप चांगलं होतं. डॉक्टर, वकील, मोठमोठ्या अधिकाऱ्यांची मुलं बरीच होती. अगदी चांगलं मराठी बोलायचे. इंग्रजी चांगलं बोलायचे. मला वाटायचं, आपल्यालाही असं बोलता यायला पाहिजे. मग मी अशा मुलांशी ,अभ्यासू मुलांशी मैत्री केली. मी मुळत: अभ्यासात चांगला आणि गणितात वगैरे हुशार असल्यानं मला सहज चांगले मित्र मिळाले. मग मी अगदी चांगलं बोलू लागलो.नागपूर बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेत मी विदर्भ बोर्डात मेरीट मध्ये 9 वा तर आलोच पण इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेत मला प्राविण्य म्हणजे डिस्टिंक्शन मिळालं. माझ्या मुलाच्या एका मित्राच्या बद्दलही मला हे पाहायला मिळालं. माझा मुलगा अमरावतीला ज्ञानमाता हायस्कूलमध्ये शिकायचा. पहिल्यापासून तो वर्गात पहिला दुसरा असायचा. तो सहाव्या वर्गात असताना त्याचा एक वर्गमित्र आमच्याकडे यायला लागला. तो आमच्या घरापासून थोड्या अंतरावरच राहायचा. व्यापाऱ्याचा मुलगा, शिवाय श्रीमंतीत वाढलेला. उनाडक्या करायचा. अभ्यास नीट करायचा नाही. खोड्या करायचा. आमच्या कॉलनीत आमची मुलं व कॉलनीतली इतर मुलं संध्याकाळी खेळायची. तो खेळायलायायला यायला लागला आणि त्याची आणि माझ्या मुला ची मैत्री जमली. मग तो नेहमी आमच्याकडे यायला

लागला. पुढे पुढे तर तो माझ्या मुलाबरोबर आमच्याकडेच अभ्यास करायला लागला. शाळेत अगोदर ढकल पास होत गेलेला तो, चांगले गुण मिळवून पास व्हायला लागला. दहावी-बारावीत ही त्याला चांगले मार्क्स मिळाले. तो आम्हा उभयतांना आई-वडिलांसारखंच मानायला लागला. आम्ही त्याला मुला प्रमाणे वागवायला लागलो. त्याच्या स्वभावतः खूप विनयशीलता आली. हा मुलगा पुढे एकाच प्रयत्नात चार वर्षात इंजिनीयर झाला व पुढे यशस्वीरित्या दोन वर्षात त्याने एम. बी. ए. केलं. आता तो चांगल्या नोकरीवर आहे. मित्रांचा, संगती चा असा चांगला परिणामही मी जवळून अनुभवला आहे.

मला आठवतं, मी दहावी झाल्यानंतर प्रि युनिव्हर्सिटी या वर्गात विदर्भ महाविद्यालय अमरावती येथे प्रवेश घेतला. तिथे मी वेस्ट हॉटेल म्हणजे पश्चिम वस्तीग्रहा मध्ये प्रवेश घेतला. नवीन आलेल्या आमच्या आठ दहा जणांचा एक चांगला ग्रुप झाला. त्यात काही बुलढाणा जिल्ह्याचे, काही यवतमाळ व काही अकोला जिल्ह्या चे होते. आम्ही काही मॅथेमॅटिक्स , काही बायलॉजी चे विद्यार्थी होतो. मग चांगले मित्र झालो.संध्याकाळी खेळतांना ,मेसमध्ये, नेहमी बरोबर असायचो. आम्ही सात-आठ मित्र महिन्यातून एकदा सिनेमा पाहायला जायचो. त्यावेळी विदर्भ महाविद्यालय अमरावती च्या होस्टेल पासून, गावात चित्रा टॉकीज किंवा प्रभात टॉकीज किंवा श्याम टॉकीज ला जायला काहीच साधन नव्हतं. तेव्हा सिटी बसेस,

ऑटो रिक्षा, सायकल रिक्षा काही उपलब्ध नव्हत्या कॉलेजच्या जवळपास. मग हे साधारणता तिन ते चार किलोमीटर अंतर आम्ही पायी चालत जायचो. साधारण 40 मिनिटे तरी लागायची. जास्तच पण कमी नाही. आमच्यापैकी एकाकडे ही सायकल सुद्धा नव्हती. मग आम्ही सर्वांनी ठरवलं की जाताना किंवा येताना एक तर्फे सर्वांनी फक्त इंग्रजीतच बोलायचं. चुकीचं बोललो तरी चालेल पण बोलायचं. मात्र इंग्रजीत न बोलता जो दुसऱ्या भाषेत बोलेल, त्याला सर्वांना चहा पाजावा लागेल. उद्देश हा की आम्हा सर्वांना इंग्रजी बोलायची सवय झाली पाहिजे, आमचं इंग्रजी सुधारलं पाहिजे. आणि आम्ही खरच ते पाळायचो. ज्यांना अगदी बोलायचं नाही ते सुरुवाती सुरुवातीला गुपचूप चालायचे. पण पुढे पुढे ते चुकीचं का होईना , बोलायला लागले. पुढे आमच्या आयुष्यात आम्हा सर्वांना याचा फार उपयोग झाला. हे सगळं चांगल्या संगतीने घडू शकतं हे इथं आवर्जून सांगावसं वाटतं. वाईट संगतीनं तर अनेक मुलं महाविद्यालयीन जीवनातच व्यसनाधीन होतात. पुढे या व्यसनातून मुक्त व्हायला आयुष्यात फार प्रयत्न करावे लागतात. केवळ वाईट मित्रांच्या संगतीत राहिल्यामुळे आमच्याच विभागाचा एक विद्यार्थी रॅगिंग मध्ये प्रत्यक्ष भाग न घेता शिक्षापात्र ठरविण्यात आला व त्याला प्राचार्यांना एक वर्षासाठी रस्टिकेट करावं लागलं. प्राचार्यांनी त्याला रस्टिकेट केलं पण पुढे तो त्यातून सावरला. आणि शेवटी चांगल्या प्रकारे पास झाला. हे आणि असे अनेक किस्से

मुलांच्या संगती बद्दल मला माहित आहेत. मला अनेक पालक भेटतात.त्यातल्या काहींची मुलं आठवी दहावी बारावी या वर्गाचे असतात. मी त्यांना नेहमी सांगतो तुम्ही फक्त त्यांचे मित्र कोण, संगत कशी याच्यावर ह्या वयात लक्ष ठेवा.ते अभ्यास आपोआप करतील. मुलगा असो वा मुलगी असो कोणाबरोबर, कुठे जाते, कुठे जातो या वयात, तुम्ही लक्ष द्या. म्हटलं आहेना--

सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो

कलंक मतीचा झडो विषय सर्वथा नावडो.

यापैकी विषय सर्वथा नावडो हा भाग पुढचा. म्हणजे गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यानंतर चा. पण त्या आधीच्या वयात, पहिल्या तिनही गोष्टी, सुसंगती, सुजन वाक्य,(घडो,पडो) आणि मतीचा कलंक म्हणजे अवगुण(झडो) या महत्त्वाच्यागोष्टी आहेत. आणि मी म्हटल्याप्रमाणे जर मित्राची निवड केली तर नक्कीच चांगल्या गोष्टी आपल्या हाती येतात, आणि सगळ्या वाईट गोष्टींपासून आपण परावृत्त होतो.मुक्त होतो.

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष

# डॉ. बं. न. जाजू यांचं हे पहिलं पुस्तक.

डॉ. बंकटलाल जाजू हे इंजिनियरिंगचे शिक्षक.१९६६ पासून ते विविध इंजिनियरिंग कॉलेजांत प्राध्यापक व प्राचार्य होते. त्या काळचे ते IIT Doctorate. पण त्यांचा स्वभाव मात्र माणसांत मिळून मिसळून रहाण्याचा आणि सर्वांकडून जे जे मिलेल ते ते शिकण्याचा. इंजिनियरिंग आणि संगीतच नव्हे तर व्यवहारज्ञानही. यातून त्यांना मनुष्य स्वभावाचे व त्यातील गुंतागुंतीच्या व्यवहारांचे जे दर्शन गडले ते त्यांनी आपल्या समर्थ लेखणीतून अक्षरी आणले आणि अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध केले. त्याचे हे अमूल्य पुस्तक ई साहित्यच्या वाचकांसाठी ते विनामूल्य देत आहेत.

डॉ. बंकटलाल जाजू यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३६), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी

देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(१९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(९), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(४), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अरुण कुळकर्णी(११) अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक, मंगेश चौधरी, डॉ. बं न जाजू असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।